म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २८२५
IRBK-0102825
IRBK-0102825
IRBK-0102825



लीला देशमुख



नागपूर प्रकाशन क्र.—२८

ग्रं. क्र. १३३८५
दि. २८।३।५२

# "इंदिरा"

## ( कथासंग्रह )

लीला देशमुख
एम्. ए. बी. टी.

९।४
१९५८
वाचनालय शाखा

प्रस्तावना—श्री. के. क्षीरसागर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. २८२५ नों. दि.
वि. कथा.

IRBK-0102825

किंमत पावणे तीन रुपये

IRBK-0102825

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

प्रकाशक—
दि. मा. घुमाळ,
नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दिनानाथराव दलाल यांचे आहे.

" खरेदी " ही गोष्ट रशियन ले. श्री. व्हॅलेंटाईन काराव्ह
यांची अनुवादित आहे.

१९४७

मुद्रक—
ल. म. पटले,
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सिताबर्डी, नागपूर

“ ज्या ठिकाणीं आईच्या आयुष्याची
अनेक सुख दुःखाची वर्षे गेली
त्या, धाम नदीच्या रम्य तीरावर वसलेल्या
देशमुखांच्या वाढोण्याला अर्पण— ”

# प्रकाशित वाङ्मय

| | | | |
|---|---|---|---|
| १ माझें कादंबरी लेखन | | संपादक—या. मु. पाठक, एम्. ए., एल-एल. बी. | १। |
| २ वीणा | कादंबरी | ( लीला देशमुख, एम्. ए., बी. टी. ) | ३ |
| ३ दोन घडीचा डाव | ,, | ( ,, ,, ,, ) | २॥ |
| ४ लढवय्ये | कथासंग्रह | ( गं. ल. देवपुजारी, बी.एस-सी. ) | ३ |
| ५ शककर्ता शालिवाहन | कादंबरी | ( ना. के. वेहेरे, एम्. ए; बी. एस-सी; एल्. टी. ) | २॥ |
| ६ प्रमद्वरा | ,, | ( ग. त्र्यं. माडखोलकर ) | २॥ |
| ७ परामर्श | टीकासंग्रह | ( ,, ,, ) | ३ |
| ८ द्राविडी प्राणायाम | कादंबरी | ( भा. वि. वरेरकर ) | २। |
| ९ अमावास्या | ,, | ( शं. वा. शास्त्री, बी. ए. ) | २॥ |
| १० कंगाल | ,, | ( ,, ,, ,, ) | २। |
| ११ अडेल तट्टू | ,, | ( ,, ,, ,, ) | ३। |
| १२ प्रत्यय | ,, | ( शरच्चंद्र टोंगो, बी. ए. ) | २॥ |
| १३ पुन्हां एकदां ! | ,, | ( ,, ,, ,, ) | ३। |
| १४ माझी शीला | ,, | ( के. ग. केळकर, बी. ए. ) | १। |
| १५ म्हणे लढाई संपली | ,, | ( बी. रघुनाथ ) | १॥ |
| १६ तेरी चूप मेरी चूप आणि इतर गोष्टी | | ( सौ. कमला, फडके, एम्. ए. ) | २ |
| १७ लांब लांब सावल्या आणि इतर गोष्टी | | ( वायू. बी. ) | २ |
| १८ मृगाचा पाऊस आणि इतर गोष्टी | | ( पद्माकर निमदेव, बी. ए. ) | २. |
| १९ सन् १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचें स्वरूप | | ( ह. वा. देशपांडे ) | ॥ |
| २० दोन प्रख्यात युद्धतंत्रें | | ( ,, ,, ,, ) | २ |
| २१ सखी | कादंबरी | ( वि. वि. बोकील ) | २॥। |
| २२ नवीं मूल्यें | लेखसंग्रह | ( पु. य. देशपांडे ) | ३। |
| २३ सावलीच्या उन्हांत | कादंबरी | प्रा. श्री. ह. अत्तरदे ) | ३ |
| २४ जीवन प्रवाह | ,, | ( द. ग. प्रधान ) | २॥ |
| २५ हंसदूत | | (प्रा. म. श्री. वैद्य) | २। |
| २६ मार्क्सवादी अभ्यासक्रम | | ( इंदु शिराली बी. ए. ) | १॥ |

**नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.**

# प्रास्ताविक

आज कालच्या विविध लेखनप्रकारांत, पैदास आणि लोकप्रियता यांच्या बाबतींत लघुकथेची बरोबरी दुसरा कोणताहि लेखनप्रकार करूं शकेलसे वाटत नाहीं, बहुसंख्य वाचक नकळत लघुकथेकडेच प्रथम नजर टाकतात; आणि बहुतेक तरुण लेखक लघुकथेच्याच दालनाकडे प्रथम पाऊल वळवतात. पण यामुळेंच या विविध आणि विपुल वाङ्मयप्रकारासंबंधीं दोन शब्द लिहिणें, आणि या प्रकारांत नांव कमावूं इच्छिणाऱ्या एखाद्या बुद्धिमान युवतीस तिची जागा दाखवून देणें थोडें अवघड झालें आहे.

सुमारें तेरा वर्षांमागें, विविध वाङ्मयीन क्षेत्रांत नांव कमावलेल्या एका पोक्त लघुकथा लेखकाच्या संग्रहाची ओळख करून देण्याचें काम मजकडे आलें होतें. मी तेव्हांहि मराठींतील फारसें कथा वाङ्मय वाचीत नसें; आणि आज तर त्याहूनहि कमी वाचतों. आणि तरीहि व्यवसाय, व्यवहार आणि मित्रऋण या दृष्टीनें अधून मधून जें कथावाङ्मय नजरेखालून घालावें लागतें; तेंहि थोडें नसतें. तेरा वर्षांपूर्वीं प्रस्तावनालेखक या संबंधी जें म्हणावे लागलें त्याहून फारसें वेगळें आज १९४७ सालीं म्हणावें लागेलसें वाटत नाहीं. याचें कारण या तेरा वर्षांत काळ डुलकी घेत होता हें नसून, तो ठरलेल्या पाऊल वाटेनेंच जात होता हें होय. आनंदाची गोष्ट ही कीं तेव्हां मी ज्या लेखकाची वाचकाशीं गांठ घालून दिली, तो त्या प्रवाहांतून थोडा बाजूला उभा होता; आणि आज मी ज्या तरुण लेखिकेची आणि मराठी वाचकांची गांठ घालून देत आहे, तीहि प्रवाहांतून डोकें वर काढून आपलें वैशिष्ट्य राखणारीच आहे.

लघुकथा आणि कादंबरी या दोन्ही क्षेत्रांत आज मराठी लेखकांनी कांहीं विशिष्ट मजल मारली आहे अशी सार्वत्रिक कल्पना आहे. या कल्पनेचें व्यक्त स्वरूप कधीं तंत्रशुद्धतेच्या अभिमानांत दिसतें; तर कधीं तंत्राच्या हेटाळणींतहि दिसतें. पण तंत्रपूजक आणि तंत्रविरोधक दोन्हीहि पक्ष आपण जुन्या जमान्यांतून बाहेर पडलों, याबद्दल मात्र स्वतःला मुक्त आणि धन्य मानीत असतात. बिचाऱ्या

नवथर लेखकाला नव्यांत नवें काय आहे, आणि जुन्यांत जीर्ण असें काय होतें, याचा उलगडा होण्यापूर्वींच तो "नवीनतर" होण्याचा यत्न करूं लागतो.

लघुकथेसंबंधीं चर्चा करणारी मराठींत जी थोडीं पुस्तकें आहेत, त्यांतील एकांत, जुन्या– अर्थात् हरीभाऊ, विठ्ठल सिताराम, यांच्या काळास, "वाचक हो !" चा काळ ठरविलें आहे. गोष्ट खरी आहे, कीं त्या काळचे लेखक कधीं कधीं वाचकांना उघड हांक मारण्याचें धाडस करीत, लांबी, वर्णनें सुरवात, शेवट, विषय, संवाद वगैरेंच्या बाबतींतहि स्थूल फरक दाखविता येणार नाहींत असें नाहीं. पण तें फरक स्थूल आहेत हे त्याबरोबरच ध्यानांत धरलें पाहिजे. लघुकथेच्या प्राणभूत भागांत, लघुकथेच्या गाभ्यांत कांहीं असा फरक झाला आहे काय, कीं ज्यामुळें जुन्या नव्याच्या पिढ्या तुटाव्या, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि जर तसा प्राणभुत (Vital) फरक आढळला, तर त्या फरकानें लघुकथा अधिक सुंदर व सकस झाली, कीं बेढब आणि दुबळी झाली, हाहि प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. पण यापैकीं कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देण्यास लघुकथेचा प्राणभूत भाग कोणता, हें मनाशीं निश्चित करावें लागेल.

मराठींत लघुकथेची चर्चा करतांना कित्येक लेखक प्रबंधकथा, प्रसंगकथा आणि प्रकृतिकथा यासारखे पृथक भेद अद्यापहि पाडतांना दिसतात. (अलिकडेच प्रसिद्ध झालेला 'प्रसाद' मासिकाचा दिवाळी अंक पहावा) आणि असा ढोबळ जाति-भेद शक्य आहे असे मानल्यावर साहजिकच 'प्रबंधकथा' कंटाळवाणी कां होते, याचीहि चर्चा अशा लेखकांना करणें शक्य वाटते; परंतु प्रसंगकथा आणि प्रकृतिकथा (Character-Story) याहि कंटाळवाण्या होऊं शकतात; आणि प्रबंध-कथा (Theme-Story) याहि आकर्षक होऊं शकतात. किंबहुना ज्या कथेंत महत्त्वाचें प्रतिपाद्य नसतें, ती चुरचुरीत झाली तरी प्रभावी आणि चिरपरिणामी होऊं शकत नाहीं असे आढळून येईल.

पण यापैकीं कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देतांना; अगर दोन मतांतील सरस निरस ठरवितांना वाङ्मयांतील मध्यवर्ती प्रश्न सोडविण्याखेरीज गत्यंतर नाहीं. आपण वाङ्मयांत काय शोधीत असतो ? गंजिफा, सोंगट्या यासारखे, दुपार घाल

-विण्याचें साधन, कीं त्याहून अन्य कांहीं ? वाङ्मयाला वेळ घालविण्याचें साधन ठरविणारांनीं काव्य आणि कथा या दोन्ही क्षेत्रांत चुरचुरीतपणाला वाजवीपेक्षा फाजील महत्व आणून ठेविलें आहे तर याउलट या 'मनोविनोद'-संप्रदायाला बिचकलेल्या, पण खोल विचार न करणाऱ्या तद्विरुद्ध संप्रदायानें लगेच उथळ नीति आणि उघड बोध ह्यांच्या वखारी उघडल्या.

अर्थात् या अनवस्थेचा संबंध केवळ लघुकथेशींच आहे असें नाहीं; तर कथावाङ्मयाच्या सर्वच शाखांशीं आहे कादंबरी, लघुकथा किंबहुना नाटक यांच्या द्वारें लेखक काय चितारीत असतो आणि वाचक काय अपेक्षीत असतो, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि मला सांगायला दुःख वाटतें, कीं "वाचक हो !" या हांकेला हंसणारे आणि स्वतःला नव्या जमान्याचे भालदार समजणारेहि कित्येक लोक, या प्रश्नाचें जे उत्तर देतात, तें सुसंस्कृतांना शोभण्यासारखें नसतें. तें उत्तर अगदीं संस्कारहीन—अगदीं "Crude" असतें. एखादी अपवादात्मक, पण चमत्कारिक, घटना हीच लघुकथेची खरी 'नस' आणि खरी 'शोभा', अशी अद्यापहि कित्येक लघुकथालेखकांची आणि टीकाकारांची कल्पना आहे. अनुभवाच्या क्षेत्रांत, कल्पनेच्या राज्यांत, अगर परकीय वाङ्मयाच्या परराज्यांत एखादी चमत्कारिक घटना, चमत्कारिक योगायोग, सापडल्यास लहान मुलांना शिंपला सापडल्याइतका आनंद अद्यापहि आमच्या लेखकांना होतो. व त्यामुळें एकानें दुसऱ्याची कल्पना चोरल्याचीहि भांडणें होतात !

वास्तविक अनपेक्षित योगायोग शोधणें ही जुनेपणाची निशाणी आहे. आणि दैनंदिन व्यवहारांतील अनपेक्षितता, चमत्कृति, आणि विपरीतता (irony) पाहणें ही नवेपणाची खूण आहे. "सध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे" या केशवसुतांच्या उक्तींत या नव्या दृष्टीचेंच बीज आहे. शाकुंतलांत आंगठीमुळें घडलेला म्हणून जेवढा भाग आहे, तेवढाच भाग मी जुनाट समजतो ! दोन स्वतन्त्र आणि मनस्वी मानवांनीं स्वयंस्फूर्तीनें घडवून आणलेल्या, गांधर्व-विवाहासारख्या, महत्तर घटनेचें भवितव्य माशाच्या पोटावर आणि कोळ्याच्या जाळ्यावर अवलंबून असावें, हा शाकुंतल कथेंतील दुर्बलांतील दुर्बल दुवा होय. दुर्दैवाची गोष्ट ही कीं आमच्या

महाकवीनें मूळ कथेत जी भर घातली तिचा बराच भाग या कोळ्याच्या जाळ्यावर आधारलेला आहे ! उलट शाकुंतल नाटकांतील कुमारिकांचे विश्रब्धालाप, अर्भकांचे मुग्धालाप वृद्धमुनींचे करुणालाप, आणि कामी जनांचा प्रणयावेग हा त्यांतील नवीनांत नवीन भाग होय, असें मला वाटते. कारण तो कधींच जुना होण्याचा संभव नाहीं.

विसाव्या शतकांतील कुमारिका प्रियंवदेप्रमाणें खट्याळ चेष्टा करण्याऐवजीं समाजशास्त्र बोलूं लागल्यास; आणि विसाव्या शतकांतील छोटे 'सर्वदमन' पशुपक्ष्यांच्या खोड्या काढण्याऐवजी चाळींतील खोलींत मुकाट्यानें 'मेकॅनो' जुळवीत बसल्यास, तें नावीन्य, अशी मात्र माझी कल्पना नाहीं.

व्यक्तिमत्त्वाच्या भिंगांतून जीवनाचें दर्शन घडविणें, हा कथावाङ्मयाचा हेतु आहे. या दर्शनक्रियेंत अथवा कथनकलेंत अनुभवाचें माहात्म्य अधिक कीं व्यक्तिमत्त्वाचें माहात्म्य अधिक हा प्रश्न मूलभूत आणि मध्यवर्ती आहे. आजच्या जडवादी, यंत्रबद्ध युगात याचें उत्तर नीटसें दिलें जात नाहीं; आणि दिलेंच तर लक्षांत रहात नाहीं. आणि म्हणूनच कधीं कधीं लेखकांना आपल्या अनुभूतीचं क्षेत्र वाढवितां यावें, म्हणून 'गव्हर्मेंट स्कॉलरशिप्स्' ठेवाव्या, असें सुचविण्यांपर्यंत मजल जाते ! पण लांब लांबचे अनुभव गोळा करणें हें महत्त्वाचें नसून जवळच्या अनुभवांतील चमत्कृति पाहणें हे अधिक महत्त्वाचें आहे.

या दृष्टीनें पहातां लेखक आणि वाचक मनोरंजक अणि अद्भुत घटनांच्या शोधांत असण्याऐवजी, दैनंदिन अनुभवांतील अद्भुतता शोधण्याच्या मार्गात असलें पाहिजेत. कथालेखक हा अद्भुत घटना आणि विचित्र माणसें यांचा भुकेला असण्याऐवजी घटनेंतील अद्भुतता आणि मानवांतील विचित्रता यांचा ज्ञाता आणि द्रष्टा असला पाहिजे. या दृष्टीनें श्रेष्ठ वाङ्मयाचा हिशेब केल्यास त्यांत एकच विषय दिसून येईल; आणि तो म्हणजे या संसाराची विचित्रता. इंग्रजींत वरचेवर योजले जाणारे "Life's little ironies" अथवा "Irony of fate" या सारखे शब्दप्रयोग हेंच सूचित करतात. ज्याला मानवी संसारांतील घटनांचे हे 'वक्र' सूत्र हातीं लागले नाहीं, त्याला लघुकथा काय कीं दीर्घ कथा काय, आकर्षक करतां येणार नाहीं. मोहामुळें

प्रत्यक्ष संसार,--मानवी जीवन--सुंदर वाटते; आणि त्या मोहांतील विचित्रता, विसंगति आणि विपरीतता, पाहण्यानें आणि दाखविण्यानें संसाराचें चित्र सुंदर बठत जातें. विरोधी घटना, विनोदी संवाद, विसंगत स्वभाव-घटक, यांच्या छाया-प्रकाशांनीं कथा-लेखक आपलें लेखन आकर्षक बनवितात, असें टीकाकार सांगतील. घटनांतील आणि संवादांतील हा खुसखुशींत खटकेबाजपणा साधण्या-करितां काय क्लुप्त्या कराव्या ते केवळ 'कसबा' संबंधीं ( Craft संबंधीं ) लिहिणारें एखादें 'प्रतिभा-साधन' सांगेल पण या सर्व छायाप्रकाशाचें मूळ, जीवनांत आणि जीवनदृष्टींत आहे हें तत्ववेत्ताच सांगू शकेल.

या दृष्टीनें पोरकट सामाजिक योगायोगाहून ( happy accident हून ) मानवी भवितव्यांतील खोल विचित्रतेंतच कथावाङ्मयाच्या आकर्षकतेचा अनंत उगम आहे, असें दिसून येईल. आणि या मुळेंच जुनी लघुकथा आणि नवी लघुकथा असें फरक करण्याऐवजीं, श्रेष्ठ कथा आणि क्षुद्र कथा असें फरक करणे अधिक युक्त होईल. लांब वर्णनें आणि आखुड वर्णनें, वाचकाचें अस्तित्व मान्य करून त्यांना संबोधणें, आणि वाचक नाहींतच असा बहाणा करून जणूं आत्मनिवेदन करणें, यांतील भेदावरून कथेची श्रेष्ठता ठरत नसून तिजमधील विषयावरून तिची श्रेष्ठता ठरत असते.

या श्रेष्ठ आणि सनातन विषयाच्या चित्रणानें लघुकथा काव्याशीहि कशी स्पर्धा करूं शकते याचें प्रत्यंतर म्हणून मी दोनच गोष्टींचा निर्देश करीन. रवींद्र नाथ यांची काबुलीवाला ही लघुकथा जगाच्या वाङ्मयांतील सर्वश्रेष्ठ लघु-कथा होय, या माझ्या मताला बाध आणणारी लघुकथा मला अद्याप तरी आढ-ळली नाहीं. या कथेच्या उदात्त प्रतिपाद्यासंबंधी आणि निरुपम कथनपद्धती संबंधी स्वतंत्र पुस्तकहि लिहिणें शक्य आहे. त्या एका कथेच्या विश्लेषणांतून तंत्रासंबंधीं आणि विषयासंबंधी शास्त्रच्या शास्त्र निष्पन्न होणें अशक्य नाहीं. पण त्या शास्त्राच्या पठनानंतर एखादा तशी गोष्ट लिहूं जाईल तर मात्र ते शक्य नाहीं. बुद्धिमान बंगाली ब्राम्हणाची क्रूर आणि अस्वच्छ पठाणा-संबंधीची प्राथमिक कल्पना; त्याच्या पत्नीच्या संकुचित पण सावध अशा समजुती; छोट्या मिनीचे मोहक अज्ञान; काबुलीवाला रहिमान याच्या

पहाडी अंतःकरणांत गुण्या गोविंदानें नांदणारे, वात्सल्य आणि क्रौर्य यासारखे,' सर्वथा विरुद्ध धर्म, या सर्वांचें दर्शन त्या ' प्रथम पुरुषी ' निवेदकास ज्या क्रमानें होतें त्याच क्रमानें त्रयस्थ वाचकांसहि होतें. अगदी जवळच्यांच्या आणि अगदीं दूरच्यांच्या मनोरचनांचें आश्चर्ययुक्त ज्ञान हा त्या गोष्टीचा संकलित परिणाम होय, किंबहुना ' आश्चर्य ' हें तंत्र होय; आणि 'पूर्वकल्पनांचा निरास' हा परिणाम होय.

ही 'प्रबंधकथा' म्हणायची की 'प्रसंगकथा' समजायची कीं ' प्रकृतिकथा ' मानायची ? 'ओ' हेन्रीच्या 'मॅगीची देणगी' या कथेची आणि काबुलीवाला या कथेची, तुलना करण्यासारखी आहे. दारिद्र्यांतहि तडपणारे भाबडें हृदय, हा दोहोंतील समानधर्म म्हणून सांगतां येईल. पण त्याच विषयाला रवींद्रांच्या उन्नत तत्त्वदृष्टीनें राष्ट्रातीत मानवी मनाच्या उच्च पातळीवर नेले आहे; तर ओ हेन्रीनें भावनावशतेला हंसणाऱ्या आधुनिक प्रवृत्तीचा सूर वठवून आपल्या नायक–नायिकांना पोरकट बनविलें आहे. शिवाय केशकलापासारखा सौभाग्या-लंकार उतरून ठेऊन सौभाग्य–नायकाचें संतर्पण करण्याची कल्पना, भारतीय मनाला ओंगळ वाटते ती वेगळीच !

अलेक्झॅंडर क्यूप्रिन् या रशियन लेखकानें आपल्या एका कथेंत तर 'भवितव्य' हाच कथा–विषय बनविला आहे. (गोष्ट मला ह्या क्षणीं उपलब्ध नाहीं. पण आठ वर्षांपूर्वीच्या स्मृती ती गोष्ट अगदीं लहान आहे असें सांगतात. गोष्टीचें इंग्लिश नांव Temptation

भीषण भवितव्याला आपण मर्त्य माणसे आपल्या उतावीळपणामुळेंच कधीं कधीं निमंत्रण देतो, याची एक हृदयविदारक आठवण या गोष्टीचा प्रथम पुरुषी निवेदक कथन करीत आहे. " भवितव्य म्हणून कांहीं नाही, असें कसें म्हणतां येईल ? "––असा, तात्त्विक चर्चेला शोभेसा प्रश्न प्रारंभीच उपस्थित करून निवेदकानें स्वतःला भेटलेल्या एका रेल्वे प्रवाशाची शोककथा सांगितली आहे. सदर प्रवासी आपल्या पत्नीला भेटण्याकरतां चालला होता; त्याच्या बोलण्यांत तिच्या वर्णनाखेरीज विषयच नव्हता; प्रत्येक मोठ्या स्टेशनवरून तो " प्रिय + + तूं या वेळीं काय करीत आहेस ? " एवढेंच

विचारून घेण्याकरितां बायकोला तार करीत होता. "मॉस्को स्टेशन येतांच तिची मी तुम्हांला ओळखच करून देतो,—म्हणजे कळेल तुम्हाला !—" असे तो आपल्या त्या अल्पपरिचित श्रोत्याला पटवीत होता. अखेर स्टेशन आलें. पूर्ववर्णनाबरहुकूम खुपसूरत अशी ती प्रिय पत्नीहि प्लॅटफार्मवर दिसूं लागली. प्लॅटफार्मवर उतरतांच, आपला हा विचित्र आणि मनमोकळा सहप्रवासी तिची ओळख करून देणार—एवढ्यांत "चेंगरला ! काढा ! गाडी थांबवा !" असा एकच ओरडा झाला.

अपघात आणि अपवाद यांना आधुनिक कथेंत गौण स्थान असावें असें मी प्रारंभी प्रतिपादिलें आहे. पण या विलक्षण रशियन लघुकथेंत अपवादात्मक अपघात हाच मुख्य विषय केलेला असला, तरी त्या त्रुटित आणि अकल्पित घटनेच्या द्वारें, लेखकानें मानवी मन आणि दैवाची गति यांच्या परस्पर संबंधावर जो भेसुर प्रकाश पाडला आहे, त्याची प्रतीति अशा भीषण भवितव्याच्या क्षणींच यायची !

अशा गोष्टींचें विषय, जीवनांतील कांही विशिष्ट क्षणांतूनच ठरतात; अशा गोष्टींचे तंत्रहि त्या विषयामुळें आणि त्या तद्रूप क्षणांमुळेंच ठरत असतें. त्या तंत्राचा अभ्यास करतां येणार नाहीं असे नाहीं; पण तशा क्षणांच्या अभावीं तशा तंत्राचा उपयोग करणें मात्र व्यर्थ होय !

भवितव्य आणि मानवी मन यांचे संबंधींची ही दृष्टि प्रत्येक लेखकास येईलच असें नाहीं. तरुण लेखकास ती न आली तर आश्चर्यच नाही.

पण त्याच्या खालोखालच्याहि एका दृष्टीमुळें लघुकथेचा विषय आणि लघुकथेचें तंत्र ठरत जातें आणि आकर्षकहि होतें. ती दृष्टि म्हणजे 'आश्चर्याची आणि कौतुकाची' दृष्टि. नित्य व्यवहारांत येणारे अनुभव आणि भेटणारी माणसें यांच्या संबंधी कुतूहल आणि आश्चर्य वाटण्याची शक्ति हेंच कलाभिव्यक्तीचे मूळ आहे. ज्याची आश्चर्यभावना लुप्त झाली--मग ती वार्धक्यानें होवो कीं वास्तववादानें होवो !—त्याची कला निर्जीव बनली म्हणून समजावे. "Sense of wonder" आणि "Capacity to be thrilled" या सौंदर्यास्वादाच्या आणि सौंदर्यनिर्मितीच्या गंगायमुना होत. या दोन

शक्तीच नष्ट झाल्यावर तंत्रशास्त्र पचवून कथालेखन करतां येईल, ही कल्पना चुकीची आहे.

मराठींतील तरुण आणि बुद्धिमान स्त्री-पुरुषांचे कथावाङ्मय हें माझ्या मतें या दुसऱ्या वर्गाच्या कसोटीनें पारखावयास हवें. जीवनाचा संकलित (Synthetic) ठाव घेऊन त्यांतील विचित्रता रंगविणाऱ्या रवींद्राची अथवा क्यूप्रिनची कसोटी, या वाङ्मयांस लावणें गैर होईल. पण व्यक्ती आणि घटना यांच्यासंबंधी स्वतंत्र आणि जिवन्त असें कुतूहल, तरुणांच्या कथावाङ्मयांत दिसतें कीं नाहीं, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. तीव्रबुद्धि आणि प्रबळ रागलोभ या गोष्टी प्रतिभेइतक्या दुर्मिळ नाहीत. या दृष्टीनें अनेक तरुण स्त्री-पुरुषांच्या कथावाङ्मयांत स्वतंत्र बुद्धीनें आणि उत्कट वृत्तीनें रंगविलेली जीवनचित्रें सापडण्यास फारशी पंचाईत पडूं नये. आणि आजकालच्या मराठी कथावाङ्मयांत प्रतिभेचेच केवळ नव्हे, तर स्वतंत्र बुद्धि आणि जीवन्त मन यांचेहि दुर्भिक्ष दिसत असेल, तर त्याला कारण मात्र प्रसिद्ध लेखकांचे निर्जीव अनुकरण हेंच होय.

आनंदाची गोष्ट ही कीं ज्या थोड्या तरुण स्त्रीपुरुषांचें हस्तलिखित कथावाङ्मय मित्रकार्य म्हणून मला वाचावें लागलें, त्यांच्या ठिकाणीं मला सहजलभ्य आणि तरीहि दुर्लभ अशा या स्वतंत्र बुद्धीचा प्रत्यय आला. प्रो. लीला देशमुख यांच्या कथा-संग्रहांतहि मला निर्देशनीय गोष्ट हीच वाटली. त्यांची प्रत्येक लघुकथा, लघुकथेच्या साच्यांत बसेल कीं नाहीं या प्रश्नापेक्षांसुद्धां, कथालेखनाची पूर्व तयारी म्हणून जी शक्ति वर सांगितली, ती त्यांच्यांत आहे कीं नाहीं या प्रश्नाला मी अधिक महत्त्व देतों. आणि त्यांचा प्रस्तुत कथा-संग्रह वाचतांना, व तत्पूर्वींहि त्यांचें इतर लेखन वाचतांना, मला त्यांच्या ठायीं ती शक्ति असल्याचें दिसून आलें.

लीला देशमुख यांच्या लेखणींत कांहीं स्वतंत्र आणि प्रभावी गुण आहेत; व त्या बरोबरच त्यांच्या वयाला आणि चालूं जमान्याला स्वाभाविक असे कांहीं दोषहि आहेत. त्यांचें लेखन वाचूं लागतांच माझा अगदीं पहिलाच जर कोणता ग्रह झाला असेल, तर तो म्हणजे हीं तरुण कथालेखिका जेव्हां पूर्वस्मृतींत दंग

होते, तेव्हां सरस्वतीची तिजवर विशेष कृपा असते! किंबहुना एकदा पूर्वस्मृती कडे तोंड करून ही लेखिका लिहूं लागली, कीं तिला व वाचकांना तंत्राचेंहि विस्मरण होतें. लेखिकेची पहिलीच कथा 'इंदिरा,' ही कथा म्हणून लिहिली आहे असें लेखिकेचेंहि म्हणणें नसेल. ती नुकत्याच सोडून गेलेल्या आईची आठवण आहे. या आठवणींत लेखिकेनें श्रीमंतीच्या रेशमी पडद्याआड—व संकोचशून्य सार्वजनिक दृष्टीपलीकडे!—लपलेल्या एका तेजस्वी पण मर्यादित चरित्राचें चित्र रेखाटलें आहे. त्यांत घराण्याचा अभिमान आहे; आई-विषयींची भक्ति आहे; भावंडांची चित्रें आहेत; दडवूनहि न दडणारा स्वतः विषयींचा अभिमान आहे; फार काय विदर्भाच्या एका पिढीचें आणि महा-राष्ट्राच्या एका गर्भ-श्रीमंत कुटुंबाचें त्यांत चित्र आहे. लघुकथा नसली तरी ती कुटुंबकथा आहे. आणि लेखिकेनें ती इतक्या तन्मयतेनें लिहिली आहे कीं अखिल महाराष्ट्रीय वाचकांना तिजमध्यें आपलेपणा वाटावा! ही 'कथा' नसली तरी तिला कोणतेच तंत्र संभाळावें लागलें नाहीं, असें मात्र नाहीं. आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या दोन विरोधी प्रान्तांच्या धोकेबाज सरहद्दीवरून लीला देशमुख यांनीं या कथेंत आपलें आत्मकथन मोठ्या शिताफीनें पैलथडीला नेलें आहे.

'पन्नास मिनिटें' या कथेचेंहि असेंच आहे. आधुनिक जीवनप्रवाहाच्या धारेंत सांपडलेल्या आणि त्यांतूनच डोकें वर काढून डोळे उघडे ठेवून आपल्या प्रवाहपतित सहचरांकडे पाहणाऱ्या जिवंत मनाचें आंतलें दालन येथें पन्नास मिनिटेंपर्यंत वाचकांना खुलें करण्यांत आलें आहे. ही विचित्र कथा म्हणजे कोंडलेल्या पण स्वतंत्र अशा एका तरुण स्त्रीहृदयांतील पन्नास मिनिटांच्या Reverie चें—तंद्रीचें चल चित्र आहे असें वाटतें. वरवर पाहतां त्यांत एक सूत्र नाहीं; कथानक नाहीं; किंबहुना कलात्मक उद्देश (motif) हि नाहीं. त्याच त्या प्रोफेसरांच्या तासाला कंटाळलेली आणि रिकाम्या तासाला तर त्याहूनहि कंटाळलेली एक प्रातिनिधिक कॉलेजकन्या, येथें जीवनाच्या नीरसते-बद्दल गाऱ्हाणें गात आहे. त्या अनुषंगानें तिनें कांहीं आठवणीहि सांगितल्या आहेत; खाजगी कबुल्याहि दिल्या आहेत; समोरच्या मुलींचीं चित्रेंहि काढलीं आहेत; पलिकडच्या ग्राऊंडवर दिसणारीं दृश्येंहि रंगविलीं आहेत. पण या सर्व 'पासिंग शो' वर तिनें जीवनाच्या 'अरुचींचा' धूसर प्रकाश फेकला आहे.

हा रंग—ही अरुचि--हीच त्यांतील एक-सूत्रता होय! ही कथा नव्हे; हें शब्द चित्रहि नव्हे; हा लघुनिबंधहि नव्हे. पण यांतील 'अरुचि' (किंवा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या भाषेंत सांगायचें तर 'अरति'!) मात्र खरीहि आहे; आणि संसर्गकारीहि आहे! वाचकांनाहि ती वाचतांना क्षणभर चालू जीवनांतील आणि शिक्षणांतील रटाळ चाकोरी ऐकू येऊं लागते!

या संग्रहातील एका गोष्टींत मात्र मला लघुकथेचे छत्तीसहि गुण आढळले. ती कथा म्हणजे "भाभीचं माहेर." यांतील उनाड पण आकर्षक भाभी; प्रेमळ आणि अल्लड मदनभय्या; असहाय आणि 'ओळखीचाच' मोहनभय्या यांची चित्रें सफाईदार आणि ठसठशीत आहेत. लहान गोष्टींनींच माणसें सुखी होतात; आणि लहान गोष्टींनींच माणसें सुख बिघडवून बसतात. भाभीच्या संसाररोपावर माहेरच्या वायफळ अभिमानाचें सांवट पडलें होतें. लाडांत वाढलेल्या पोरसवदा स्त्रीचा स्वाभाविक मूर्खपणा पोटांत घालण्याइतपत मोहनभय्या 'मोठा' नव्हता. छोटा मदन मात्र समवयस्क वहिनीवर खूष होता! पण दादा आणि वहिनीच्या धुसफुसीनें त्याच्या बालसुखाचा विरस होत होता. शाळेंत असूनहि न शिकतां बाहेर पडलेल्या या उत्तर हिंदुस्थानी भाभीचें चित्र अगदीं जिवंत वठलें आहे. यांतील अकृत्रिम पण लव्हेवाईक अशा स्त्री-स्वभावाचें चित्र; आणि लहान पण भेदक वाक्यांनीं धारदार झालेले संवाद, यामुळें ही कथा सिद्धहस्त बंगाली कथा लेखकांचें स्मरण करून देतें. या कथेचा शेवट, सुलभ 'हृदय-परिवर्तनांत' झाला नसता, तर तिला सर्वथा निर्दोष देखील म्हणतां आलें असतें.

'वठलेला वृक्ष' या लघुकथेंत वर्णनें आहेत; संवाद आहेत; गूढ वातावरण आहे पण ती कथा कोणत्याहि एका रोखानें चालली आहे असें दिसत नाहीं. व संकलित आणि स्पष्ट परिणाम करीत नाहीं. चालू जमान्यांतील लोकप्रिय लकबा आणि हमखास दोष यांचें दर्शन या गोष्टींत मला जितकें घडलें तितकें या लेखिकेच्या दुसऱ्या कोणत्याच गोष्टींत घडलें नाहीं. लेखिकेची भाषा सर्वत्र सफाइदार आणि टोकदार असली, तरी आजकालच्या कथा वाङ्मयांत (प्रसिद्ध लेखकांचें नांव सांगून!) फुकट जागा अडवणारे कित्येक उडाणटप्पू शब्द या पुस्तकांतहि भेटतील. 'खूपखूप' 'उल्हासानें' 'कटाक्षानें' वगैरे

शब्द वेळीं अवेळीं न पेरणारा तरुण लेखक आजकाल दुर्मिळच. त्या मानानें प्रो. लीला देशमुख यांनीं, शब्द आणि रचना यांच्या चलनी लकबांपासून स्वतःला बरेच अलिप्त ठेवलें आहे! क्वचित् वाक्प्रचार आणि शब्द यांचें उपयोग घाईत सदोष झालेले दिसतात. 'आकर्षणीय वस्तु' असें लिहिलेलें वाचून, मला हिंदींतील 'ग्राम्यकन्येची' आठवण झाली! (आणि मला वाटतें, हिंदींच्या वाचनानेंच अलिकडे कांहीं तरुण लेखक संकृत विशेषणांच्या उपयोगांत घोटाळा करीत असावे.)

पण आज "आद्यतन शैली" व "कल्पना मांडण्याची धृति"......... यासारखे शब्दप्रयोग करून साने-चोरघडे आणि मंडळी जी बेचंदशाही माजवीत आहेत, तिचा इतपतहि संपर्क होऊ न दिल्याबद्दल लेखिकेचें अभिनंदन केलें पाहिजे.

कारण आज तंत्र आणि शैली यांच्या क्षेत्रांत मोकाट सुटलेल्या कित्येक अर्थशून्य लकबांपासून स्वतःचा बचाव करण्यास देखिल तरुण लेखकांच्या आंगीं पुष्कळच सामर्थ्य आणि स्वत्व असावें लागतें! खऱ्याखुऱ्या लघुकथेची चर्चा थोडी बाजूला ठेवून आजकालच्या लोकप्रिय आणि लोकमान्य लघुकथेची चर्चा करायची म्हटल्यास, अनेक छांदिष्टपणांची यादी करावी लागेल निरगांठ, सुरगांठ समरप्रसंग आदिकरुन कृत्रिम अंगोपांगाचें स्तोम माजविल्यानंतर जणूं प्रतिक्रिया म्हणून मराठी लघुकथेनें दुसऱ्या टोकाला डडी घेतली. आणि आज 'लघुकथा म्हणजे काय?' असा प्रश्न विचारल्यास आजच्या मराठी लघुकथेकडे पाहून तरी, लघुकथा म्हणजे "काय हवें तें!" असें उत्तर द्यावें लागेल. तिजमध्यें कृत्रिम आणि यांत्रिक योगायोगांना स्थान आहे; निरर्थक वर्णनांना स्थान आहे; घटनाहीन स्वभाववर्णनाला स्थान आहे; स्वभाव आणि घटना दोहोंचाहि पत्ता नसतां केलेल्या दृश्य-चित्रणाला स्थान आहे; अर्धवट शब्द, रेघा, फुल्या, टिंबें सर्वांची लघुकथेच्या मालगाडींत रेलचेल आहे!

कित्येक प्रसिद्ध लघुकथा-लेखक लघुकथा म्हणून लघुनिबंध पदरांत घालतात! पाठ्य पुस्तक म्हणून लागलेल्या एका पुस्तकांत संपादकांनीं स्वतःचा एक लघुनिबंध लघुकथा म्हणून निवडून दिला आहे (स्वतः संपादकाचेंच मत मिळाल्यावर तो निबंध कोणत्याहि जागेकरितां निवडून आल्यास नवल नाहीं!)

लघुकथा आणि दीर्घकथा यांतील फरक सांगणें तितकेसें सोपें नाहीं हें खरें आहे. लघुकथेंत एकच ठळक, आणि कथाहेतूस पोषक, अशी घटना असतें, असें स्थूलमानानें म्हटलें जातें. पण एखाद्या कथेंतील कोणती घटना ठळक आणि कोणती पुसट हें पुन्हां तिच्या अंतिम हेतूवरूनच ठरायचें असतें. दीर्घकथेंत अथवा कादंबरींतहि '**शिखरीभूत**' अशी एक अन्तिम घटना असतेच, पण कादंबरी ही अनेक शिखरांनीं आणि पठारांनीं; दऱ्याखोऱ्यांनीं आणि घाटमाथ्यांनीं, बनलेल्या सह्य-विंध्यादि पर्वतमालिकेसारखी असते; तर लघुकथा एका पृथक आणि स्वयंपूर्ण अशा टेकडी सारखी असते. कादंबरी अनेक टप्प्यांनीं आपल्या मुक्कामास पोहोचणाऱ्या काफिल्यासारखी असते; तर लघुकथा ही जवळच्याच आणि एकाच मुक्कामांच्या रोखानें तडक निघलेली 'एक्स्प्रेस' असल्याप्रमाणें भासते. पण दोहोंतील फरक बाह्य लक्षणांपेक्षा अन्तःपरिणामावरूनच अधिक कळेल. एकच, पृथक, आणि एक-जातीय परिणाम घडविण्याकरितां लघुकथा लिहिलेली असते. आणि तो परिणाम म्हणजे 'विधिघटना' किंवा 'मानवी स्वभाव' यांच्या विचित्र गतीचें दर्शन !

लघुनिबंधाच्या बाबतींत असें म्हटलें जातें कीं जितक्या व्यक्ती तितक्या त्याच्या प्रकृती होऊं शकतील. कारण तो 'व्यक्तिगत' अथवा personal असाच लेखन-प्रकार आहे. लघुकथेच्या बाबतींत असें म्हणतां येईल कीं जितके विषय अथवा लेखन हेतु तितके तिचे तंत्रप्रकार होऊं शकतील. लेखकाला आपला जो क्षण, आणि जे क्षणिक जीवनदर्शन चित्रित करायचें असेल, त्याच्या प्रमाणें तो प्रारंभ, पात्रें, घटना, आणि पर्यवसान यांना आकार देतो.

आज लघुकथेंत जी स्वैरता दिसतें, ती 'स्वैर' म्हणून हास्यास्पद आहे असें नाहीं; तर ती हेतुशून्य आहे म्हणून हास्यास्पद आहे. मुंबई विद्यापीठानें कॉलेज करितां निवडलेला एक कथासंग्रह शिकवितांना मला असें दिसून आलें कीं त्या संग्रहाचा लेखक सूक्ष्मवर्णनें करण्यांत पटाईत होता; पण त्या वर्णनांचा रोख कुणीकडे म्हणून पहावे तर बहुधा अगदीं क्षुद्र घटनेकडे-नाही तर कोणीकडेच नाहीं ! इंग्रजींत All-dressed up and no where to *go* !" असें म्हणतात; म्हणजे--"जामानिमा अगदीं नखशिखान्त झालेला; पण जायचें कुठें याचा मात्र पत्ता नाहीं !"

गूढ वातावरण, प्रतिकात्मक दृश्यें, जीवनविषयक सुभाषितें यांचेंहि असेंच आहे. गोष्टीचें हे अंतिम उद्दिष्ट क्षीण अगर क्षुद्र असल्यास या असंबद्ध रेशमी ठिगणांचा उपयोग कांहीच नाही, हें कित्येक प्रसिद्ध लेखकहि ध्यानीं घेत नाहीत. स्वभावचित्रात्मक लघुकथा असूं शकते, पण नुसतें स्वभाव-वर्णन म्हणजे लघुकथा नव्हे, हेंही पुष्कळजण विसरतात. एखाद्या अर्थपूर्ण अन्तिम घटनेमुळें स्वभाव-वैशिष्ट्य स्पष्ट केलेलें असल्यास, आणि कथेंत तें स्वभाव-वैशिष्ट्य चित्रित करणें हाच प्रधान हेतु असल्यास, ती कथा स्वभाव-चित्रात्मक होईल. पण त्याच स्वभावावर मध्यवर्ती घटनेच्याद्वारे प्रकाश पडण्याऐवजीं केवळ शाद्बिक वर्णनावर भागविलें असल्यास ती लघुकथा नसून स्वभावचित्र होय. एखाद्या प्रसंगाच्या शब्दचित्राचीहि गोष्ट तीच आहे. त्याच प्रसंगांतील वेगवेगळ्या भागानीं परस्परांचे पोषण केलेलें असेल आणि सर्वांचा 'स्फोट' अंतिम घटनेत झाला असेल, तरच त्या चित्राला कथेंचें स्वरूप येईल. आणि या विविध भागांतून आणि अंतिम घटनेंतून मानवी जीवनाची दिशा सूचित होत असेल तरच त्या कथेला श्रेष्ठ कथेची पदवी प्राप्त होईल. लांब हकिकती पैकीं लहानसा भाग म्हणजे लघुकथा, असे नसून जीवनाचा अर्थपूर्ण आणि प्रतिनिधिक तुकडा ( slice ) म्हणजे लघुकथा होय.

व्यवहारांतील अथवा स्वानुभवांतील प्रसंगांना 'लघुनिबंधा'त हक्काचें स्थान आहे. पण त्या प्रसंगाचा एकमेकाशीं पूर्वापर संबंध, आणि त्यांतीलच एका प्रसंगांत लेखाचें पर्यवसान, अशी स्थिति असूं शकत नाहीं. त्यांतील प्रसंग दृष्टांतासारखे असतात. आणि त्याचे मुख्य सूत्र लेखकानें, एका विशिष्ट वृत्तीनें आणि शैलीनें सांगितलेल्या आवडी, निवडी, अनुभव आणि मतें यांत सापडतें. लघुनिबंधाच्या आरंभी अथवा शेवटीं एखादी घटना सांगितलेली आढळली एवढ्यावरून ती लघुकथा होऊं शकत नाहीं. 'लेखकाचे व्यक्तिमत्व' या एकाच सूत्रानें लघुनिबंधाचे विविध भाग एकत्र आवळलेलें असतात; तर शिखरीभूत, मध्यवर्ति, अथवा प्रधान घटना, ही लघुकथेच्या सर्व भागांना-घटना, पात्रें वर्णनें दृष्टांत, अर्थान्तरन्यास यांना एके जागीं ठेवतें.

या दृष्टीनें आजच्या गाजलेल्या लघुकथालेखकांच्या लघुकथेची इमारत दोहीकडून पडूं लागल्याचें दिसेल. त्यांना जो जीवनार्थ सांगावयाचा असतो तो

जीर्ण आणि ठराविक असतो; आणि तो सांगण्याकरितां त्यांच्या लघुकथेंत त्यांनीं ज्या अंगोपांगांचा उपयोग केलेला असतो, त्यांचा मध्यवर्ति घटनेशीं संबंध नसतो. दुर्बल भावनावशता, अनावश्यक उपमा दृष्टांत; आणि असंबद्ध पण सूक्ष्म वर्णनें हे आजकालच्या प्रसिद्ध लेखकांच्या लघुकथांचे ठराविक भाग होऊन बसले आहेत. या दोषांची सुरवात य. गो. जोश्यांच्या लेखनानें झाली कीं कुमार रघुवीर यांच्या कथांनीं झाली हें मी नक्की सांगू शकणार नाहीं. पण या दोषांचा कडेलोट साने आणि खांडेकर यांनी केला एवढें मात्र मी म्हणूं शकेन. य. गो जोशी यांच्या लघुकथांत हे दोष अल्प प्रमाणांत, आणि कित्येक प्रभावी गुण मोठ्या प्रमाणांत असतात, हें मान्य केलें पाहिजे. पण त्यांच्या उत्तमांतील उत्तम गोष्टींतहि कलात्मक संयमाचा अभाव असतो. हें त्यांच्या अत्यंत रुचकर अशा 'शेवग्याच्या शेंगा' वरूनहि दिसून येईल. वर्णनें दृष्टांत आणि अश्रुपूर्ण भावनावशता यांचा पाऊस पाडणें म्हणजे प्रभावी लेखन अशी अनेक विख्यात लेखकांची कल्पना दिसते !

मुख्य गोष्ट ही आहे कीं लेखकाला कांही जिवंत, ज्वलंत आणि अर्थपूर्ण अनुभव सांगण्याची उत्कटता हवी; आणि असेच अनुभव आपल्याहुन प्रतिभावान् पूर्वसुरींनीं कसे सांगितलें आहेत, याचे त्यानें तन्मयतेनें आणि सहेतुक परिशीलन केलेलें हवे. या दोन प्राणभूत घटकांचा मिलाफ झाल्यावर तंत्राचीं पुस्तकें न वाचतां, आणि कोणाही लेखकाचें अंध अनुकरण न करतां लेखक आपल्या हृद्गताला साजेसें तंत्र निर्माण करूं शकेल.

पण आजच्या मराठी वाङ्मयात जर कशाची वाण असेल तर जीवन-दृष्टि प्राप्त झालेल्या लेखकांची;-इतकेंच काय पण भल्याबुऱ्या अनुभवांचा अर्थ डोळसपणें शोधणाऱ्या लेखकांची देखील ! जीवनाकडे पहाण्याची आनंदमय आणि प्रेममय ( म्हणजेच सौंदर्यवादी ! ) दृष्टि प्राप्त झाल्यास साध्या सुध्या कथांनाहि कसें काव्यमय रूप येतें हें पहावयाचें असल्यास रवींद्रांच्या कित्येक कथा पहाव्या. कडवट आणि रोगट जीवन-दृष्टी प्राप्त झाली, तरी ती देखील स्वतंत्र आणि समर्थ असल्यास लघुकथा किती प्रभावी बनते, हें मोपाँसाँच्या लघुकथां-वरून दिसेल; जीवनार्थासंबंधी बुद्धसदृश मौन पत्करणाऱ्या पण मानवी राग-लोभासंबंधीं अगाध अनुकंपा धारण करणाऱ्या महर्षींच्या कथा किती गूढ आणि

रम्य होतात हें पहावयाचें असल्यास शरश्चंद्रांच्या आणि कांहीं रशियन महर्षींच्या कथा पहाव्या. अर्थात पाश्चात्यांतीलहि सर्वच प्रसिद्ध लेखकांना जीवनासंबंधी खोल दृष्टि प्राप्त झालेली असतें असें नाहीं. बेनेट आणि वेल्स यांच्या सारख्या लोकप्रिय लेखकांच्या संकुचित आणि उथळ जीवनदृष्टीसंबंधी मिसेस् वूल्फ या तितक्याच प्रसिद्ध लेखिकेनें आश्चर्य व्यक्त केलें आहे! ज्या संसारचित्रांतून संसाराच्या पलीकडील रहस्य सूचित होत नाहीं ते संसारचित्र उथळच म्हटलें पाहिजे.

पण असें महर्षी आपल्या प्रसिद्ध लेखकांत दिसत नसलें, तरी दैनंदिन अनुभवाकडे धीटपणें आणि शोधकपणें पाहून त्याचा अर्थ आकर्षक आणि प्रभावी भाषेंत सांगणाऱ्या तरुणतरुणींची संख्या दिवसेंदिवस अधिक दिसत आहे. त्यांच्या मार्गांत धोंड काय ती निर्जीव परंपरेची आणि नेभळ्या विचार संप्रदायांची आहे. भाषेंतील सीधा भेदकपणा, आणि स्वानुभवाशीं सचोटी, हे गुण तरुणांनीं लिहिलेल्या कथांपेक्षां तरुणींनीं लिहिलेल्या कथांत अधिक आढळतात असा माझा अनुभव आहे. कदाचित् तो मला उपलब्ध झालेल्या साहित्यापुरताच मर्यादित असल्यानें 'अव्याप्त' हि असेल. पण तरुणांच्या लेखनांत मला तल्लख अनुकरणाचा भाग अधिक दिसतो.

तें कसेंहि असलें तरी उद्यांच्या कथावाङ्मयाचें भवितव्य धीट, डोळस, चौकस, आणि अनुकरणापासून अलिप्त अशा प्रामाणिक तरुण तरुणींच्या हातीं आहे असें मला वाटतें. कु. लीला देशमुख यांच्या कथालेखनालाहि त्यांच्या विद्यालयीन व्यासंगापेक्षां आणि प्रचलित वाचनापेक्षां वरील गुणांचाच अधिक उपयोग झाला आहे. त्यांचें पुस्तक वाचीत असतां मला एका धीट, चौकस आणि बुद्धिमान् विदर्भकन्येच्या अन्तरंगाचा परिचय घडून नव्या पिढीशीं आणि भिन्न प्रांताशीं समरस होता आलें हा मी लाभच समजतों. माझे सर्वच विचार कु. लीला देशमुख यांना मान्य होतील असें नाहीं. कदाचित् माझ्या प्रस्तावनेंत नकळत त्यांच्या कित्येक आवडत्या लेखकांचा अधिक्षेपहि घडला असेल. या संभाव्यतेमुळें मी हे काम पत्करण्यास थोडा भीतच होतो. पण त्यांच्या स्वतःच्या आग्रहामुळें आणि आम्हां उभयतांचे सुहृद श्री. गोपीनाथ तळवलकर यांनीं कु. देशमुख यांच्या निर्व्याज आणि निकोप वृत्तीसंबंधीं दिलेल्या निर्वाळ्यामुळेंच मी हें काम पत्करलें.

या थोड्या लांबलेल्या प्रस्तावनेच्या योगानें कु. लीला देशमुख व त्यांच्याच वयाच्या लेखकलेखिका यांना त्यांनीं आक्रमिण्यास प्रारंभ केलेल्या प्रांताचा थोडाफार अंदाज आल्यास, आणि यशाची थोडी अधिक उमेद आल्यास, मला माझ्या श्रमाचें सार्थक झाल्यासारखें वाटेल.

२४-११-४७
तुकाराम आश्रम,
टिळकवाडी, पुणें २.

श्रीकृष्ण के. क्षीरसागर.

# इंदिरा ........................................ १

एकोणिसाव्या शतकाच्या अगदीं शेवटीं शेवटीं खानझोड्यांच्या घराण्यांतील एकुलत्या एका मुलीनं वाढोण्यांच्या देशमुखांच्या घरांत, त्यांची सगळ्यांत वडील सून म्हणून प्रवेश केला. वय जेमतेम बारातेरा वर्षांचं, गौरवर्ण नाजूक आणि ठेंगणा बांधा, रेखीव व नीटस नाकडोळे ह्यामुळें विनायकराव उर्फ तात्याजी देशमुख ह्यांनीं आपल्या वडील मुलांकरतां त्या मुलीची मनापासून निवड केली. दोन्हीं घराणीं आपआपल्या परीनं श्रेष्ठ, त्यांतल्यात्यांत श्रीमंत मालगुजार म्हणून तात्याजींचा लौकिक वऱ्हाड आणि नागपूर चांद्यापर्यंत पसरलेला. अशा मानाच्या घरांत आपली एकुलती एक मुलगी पडली म्हणून वधूच्या पित्यानं स्वतःला धन्य मानून घेतलं आणि जेवढ्या थाटामाटांत मुलीची सासरी रवानगी करतां येईल तेवढ्या थाटांत केली.

लहानपणींच आई गेलेली. लग्न होईपर्यंतचा काल मामांच्याकडे काढलेला, अगदी मायेचं असं म्हणायला फक्त एकुलता एक सख्खा भाऊ. आई नसल्यामुळें आणि घरांत एकटीच मुलगी त्यामुळें लहानपणीं लाडही भरपूर झालेले. अशा वातावरणांतून एकदम जबाबदारीच्या वातावरणांत इंदिरेनं प्रवेश केला. परंतु सासरीही मायेचं वातावरण होतं. घरांत सगळीच मुलं, त्यामुळें मुलींची हौस असलेल्या सासुबाईंनीं—दादीबाई त्यांचं नांव; आपली सगळी मुलींची हौस मोठ्या सुनेवर भागवून घेतली. सुनही मनासारखी मिळालेली. अति नम्र आणि विनयशाली. सासुच्या म्हणण्याबाहेर एक शब्दही जायचा नाही.

हळूं हळूं उरलेल्या तीन मुलांची लग्न झाली आणि चौघी जावा मैत्रिणी-सारख्या सासुच्या जवळ राहूं लागल्या. घरांत माणसं पुष्कळ. बाकीचे तीन दीर धट्टेखोर आणि मोकळेपणानं वागणारे, घरांत जितका दरारा तितकीच आस्था

आणि जिव्हाळा. त्यांतून १९०३ साली इंदिरेनं पहिल्या मुलाला जन्म दिला आणि देशमुखांचा पहिल्या सुनेचा, पहिला मुलगा म्हणून सासुसासऱ्यांनीं कौतुकही मनापासून केलं.

माहेरी असतांना मामानी हौसेनं जी काय चार पुस्तकं इंदिरेला शिकविली असतील तेवढंच इंदिरेचं शिक्षण. पण लग्न झाल्यानंतरही शिकण्याची ही तिच्या ठिकाणची हौस कमी झालीं नाही. बरोबरीचे दीर कॉलेजांतून शिकत होते. मुद्दाम मुलांच्या शिक्षणासाठीं म्हणून वाढोणा सोडून नागपुरला बिऱ्हाड केलेलं होतं. घरांतलं वातावरण सुसंस्कृत आणि थोडसं सुधारक वळणाचं होत चाललं होतं. दोन दिरापैकीं एक; गोविंदराव देशमुख बॅरिस्टरीसाठीं व दुसरा गोपाळराव देशमुख डॉक्टरीसाठीं इंग्लंडला गेले. अशा त्या शैक्षणिक वातावरणांत घरच्या कामांतून वेळ होतांच किंवा विश्रांतीच्या कालांत इंग्रजीची प्राथमिक पुस्तकं आणून इंदिरेनं शिकण्याचा प्रयत्न करावा. तिच्या ह्या हौसेच्या प्रयत्नाला पुस्तक आणून देण्याची मदत कधीं पती तर कधीं दीरहि करीत. त्यावेळी हरिभाऊ आपट्यांच्या मन वेधून घेणाऱ्या आणि घराघरांतून वाचल्या जाणाऱ्या एकापेक्षां एक सरस कादंबऱ्या बाहेर पडत होत्या. "पण लक्षांत कोण घेतो. जग हे असे आहे, मी," इत्यादी कादंबऱ्या व दुसऱ्या सगळ्या कादंबऱ्या आणि केसरीचे अंक इंदिरेनं मनापासून वाचून काढले आणि त्यावेळीं निर्माण झालेली ही वाचनाची हौस तिच्या आयुष्याच्या उत्तरार्धातही कायम होती.

अशा ह्या जिव्हाळ्यानं आणि प्रेमानं भरलेल्या वातावरणांतून एकोणीसशे दहा साली आईच्या ठिकाणीं असलेली सासू निघून गेली आणि घरांतली सगळी जबाबदारी वडील सून म्हणून इंदिरेच्या अंगावर पडली. तिनें ती तत्परतेनं उचलली आणि ती पार पाडण्याची कुशलता ही सिद्ध केली. ह्या वेळेपावेतों इंग्लंडमध्ये गेलेले दोन्ही दीर परत आले. आणि दोघांचीहि, एकाचं मुंबईला आणि दुसऱ्याचं नागपुरला, बिऱ्हाडें थाटल्या गेली. मालगुजारी पाहण्याची सगळी जबाबदारी

इंदिरेच्या पतीनं स्विकारली त्यामुळें नागपूर सोडून इंदिरा वाढोण्याला कायमची राहण्यास आली.

अर्थात हेही काम कमी जबाबदारीचं नव्हतं. मालगुजारीतल्या गडी माणसां-पासून तर वरच्या प्रत्येक व्यक्तीचं अंतःकरण इंदिरेच्या प्रेमळ व गोड वागणुकीमुळें तिच्या ठिकाणी नम्र होत असे. ती सगळ्यांची " आई " बनली. कोणत्याही अडचणीच्या आणि संकटाच्यावेळीं आई आपल्या मदतीला धांवून येईल अशी त्यांची तिच्या ठिकाणीं श्रद्धा होती आणि तिनं ती कधीहि खोटी ठरूं दिली नाही. सकाळीं घरच्या अंगणांत म्हशी दोहून झाल्यानंतर दुधाचे हंडे चुलीवर चढले जात. त्याचवेळी गावांतल्या मुलांची आणि स्त्रियांची दाराजवळ रीघ लागलेली असे. शेवटचा एखादा मुलगा अगर बाई; "दुध संपलं" असं गड्यानं सांगितलं तर आंत असलेल्या ' आई ' जवळ येऊन दुध न मिळाल्याची तक्रार सांगे आणि लगेच घरांत वापरण्याकरतां आणून ठेवलेल्या दुधांतून त्याचा पेला भरला जाई, जी गोष्ट दुधाच्या बाबतींत तीच भाजीपाला, औषधं, इत्यादी बाततींत होती. आपली लुगडी तर कित्येकच गरीब स्त्रियांना ती देत असे

लहाणपणापासूनच बुद्धी अतिशय तल्लख, कल्पकता भरपूर आणि वाचन-च्याही हौसेला मोल नाही. घरांत वर्तमानपत्र पुष्कळ येत. केसरीचं वाचन तर नियमीत होतं. ते दिवस जहाल राजकारणाचे,टिळकांच नांव प्रत्येकाच्या तोंडांत. इंदिराही आपल्यापरीनं त्या परिस्थितीशी समरस होण्याचा प्रयत्न करी. आपण स्वतः केसरीच वाचन केल्यानंतर घरीं बसायला येणाऱ्या बायकांच्या जवळ किंवा मैत्रिणींच्या जवळ टिळकांच्या एकेक हकिगती इंदिरा तन्मयतेनं सांगत असे.

पुढें घरांतलीच मंडळी राजकारणांत पडली. तिच्या नागपूरच्या दिरानं—गोविंदराव देशमुख ह्यांनी; हजारोंच्या प्रॅक्टीसला लाथ मारून राजकारणांत उडी घेतली, आणि नागपूरच्या घरीं; नेहरूं पिता पुत्र, सुभाषचंद्र बोस, दास इत्यादी बड्या पुढाऱ्यांची पायधुळ झडली. घरांतच राजकारण शिजूं लागलं. तो

ही काल इंदिरेनं उत्कंठतेनं पाहिला. नागपुरचे आणि मुंबईचे दीर; एक बॅरिस्टर देशमुख म्हणून, तर दुसरे डॉ. देशमुख म्हणून आपआपल्या प्रांतांत गाजत होते. बहुधा दर उन्हाळ्याची सुटी ती मुंबईला आपल्या दिराकडे काढीत असे; त्यावेळीं त्यांचे; वहिनीशी गप्पा करतांना अनेक विषय निघत, चर्चा होत, आणि बदलणाऱ्या परिस्थितीपासून आपण फार दूर नाही ह्या जाणिवेनं इंदिरेला आनंद होत असे. कुठल्याही गोष्टीशी जमवून घेण्याची तिच्या मनाची वृत्तीच होती. बदलणाऱ्या राहणीप्रमाणें तिनंही आपल्या वेषांत बदल केला. चोळी आणि इरकली लुगड्या ऐवजी पोलकीं आणि पातळं ती वापरूं लागली. क्वचित् मुंबई फॅशनचे दागिने घडविण्याची हौसही ती भागवित असे. आपल्या प्रेमळ स्वभावामुळें दिरांच्याही वहिनी कांहीं कमी लाडक्या नव्हत्या. त्यामुळें एखाद्या बहिणीसारखं दिरही इंदिरेचं करीत.

इंदिरेचे पतीहि नारायणराव उर्फ आबा साहेब तिच्या बाबतींत सहसा ढवळाढवळ करीत नसत. घरांतील सारी सत्ता इंदिरेच्या हातांत होती. तिच्या हुकमाशिवाय घरांतली काहीहि हलत नसे. परंतु त्या दोघांचा स्वभाव मात्र कमालीचा भिन्न होता. इंदिरा जितकी भावनाप्रधान व हळवी तितकेच ते तापट. मी म्हणेन तसं झालंच पाहिजे ही वृत्ती त्यांच्यांत जास्त होती. हळव्या स्वभावामुळें एवढी तेवढी क्षुल्लक गोष्ट मनाला लावून त्यासाठी कुढण्याची संवय इंदिरेच्या ठिकाणीं पुष्कळ होती. मन उघड करून दाखविण्याचाही तिचा स्वभाव नव्हता. त्यामुळें ह्या सगळ्या गोष्टींचा तिलाच त्रास होई तरीहि स्वभावांतली ती भिन्नता शक्यतोंवर दूर करून परस्परांशी पटवून घेण्याचा त्या दोघानींही प्रयत्न केला. इंदिरा जितकी देवभक्त तितकेच तिचे पती नास्तिक पण इंदिरेच्या देवाच्या भक्तींत त्यांनीं कोणतीहि उणीव कधीं भासूं दिली नाहीं. वाढोण्यापासून दीड दोन मैलांवर असलेल्या सिद्धेश्वराच्या पुजेसाठीं ब्राह्मण होता. घरांतले सगळे सणवार थाटांत होत आणि दक्षिणाहि इंदिरेच्या मर्जीस येईल तेवढी दिली जात असे. ब्राह्मण जेऊं घालण्याची हौस तर तिला मनापासून होती. गाय दान करण्याचंही पुण्य तिनं भरपूर संपादलं.

तिचा वाचनाचा व्यासंग भरपूर असला तरी आपलं शिक्षण झालेलं नाही ह्याचं तिला मनापासून वाईट वाटे. त्यावेळच्या पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे ह्यांचा उल्लेख करून मलाहि माझ्या वडिलांनीं असंच शिकविलं असतं तर मी ही कांहींतरी करून दाखविलं असतं " असे उद्गार नेहमीं ती काढीत असे. त्यावेळीं जी जी मासिकं निघत उ. गृहलक्ष्मी, मनोरंजन, नंतर रत्नाकर, चित्रमय जगत, त्या सगळ्यांची ती एकनिष्ठ वाचक होती. आपण शिकलों नाही तर निदान आपल्या मुलांनीं तरी शिकावं अशी तिची अत्यंत इच्छा व ती तिनं पारहि पाडली. वाढोण्याच्या शाळेंत मराठी चार वर्ग झाले कीं मुलं नागपुरला नाहीं तर मुंबईला काकांच्याजवळ शिकायला जात. तिचा दुसरा मुलगा तर तीन चार वर्षांचा असतांनाच तिला सोडून नागपुरला राहूं लागला होता. शिक्षणासाठीं म्हणून मुलांना इतक्या लहानपणीं स्वतःपासून दूर करण्याची आपल्या मनाची तयारी तिनं केली. तिच्या इच्छेप्रमाणें तिची पांचही मुलं शिकली. तिचा दुसरा मुलगा बाबा; डॉक्टर होऊन एफ्. आर. सी. एस. साठीं इंग्लंडला गेला आणि मुलींच्यापैकीं एकीचं जरी लवकर लग्न झालं तरी तिच्या हयातींतच दुसरी मुलगी कुसुम एल्.एल्. बी. ची आणि धाकटी एम्. ए. झालेली तिनं पाहिली. तिची शिक्षणाची हौस, तिच्या मुलींनी, तिच्याजवळ नेहमीं राहण्याचा मोह आवरून पूर्ण केली.

ह्या खेरीज तिनं स्वतःचंही वळण त्यांना लावलं. दिवाळीच्या सुट्टींत सगळी मुलं घरी जमत. त्यांतल्या त्यांत धाकटी मुलगी इतर भावंडांच्यापेक्षां तिच्याजवळ जास्त राहिलेली. दिवाळीच्या सुट्टी खेरीज उन्हाळ्याचीहि सुट्टी ती आईजवळच काढीत असे. रोज संध्याकाळी नियमानं एखादी तरी गोष्ट तिला सांगण्याचा इंदिरेनं नियम ठेवलेला होता. अनेक धार्मिक व सामाजिक गोष्टी तिच्या धाकट्या मुलीनं तिच्याकडून ऐकल्या. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या तिनं स्वतः वाचण्या-पूर्वी त्यांच्या कथानकांची गोडी इंदिरेनेच तिच्या ठिकाणी उत्पन्न केली. आपल्या मुलांना बरोबरीची समजून त्यांचं मन समजाऊन घेऊन वागण्याची इंदिरेची पद्धत होती. त्यामुळें मुलांनाही आई अगदी आपल्या बरोबरीची वाटत असे. विहीरींचं

पाणी काढतांना, रात्री जेवण संपल्यावर, चांदण्यांत अंथरूणावर पडलेलं असतांना ह्या सान्या गोष्टी ती ऐकवित असे. गोष्टी सांगण्याची तिची पद्धत अतिशय मनोवेधक, चेहऱ्यावरचे भावनूभाव उठवून दाखविणारी त्यामुळे स्वतः बरोबरच बाकीचीहि ऐकणारी मंडळी तल्लीन होऊन जात.

तिच्या सान्निध्यामुळेंच तिच्या धाकट्या मुलीलाहि वाचनाची विलक्षण गोडी लागली. इंदिरेची कल्पनाशक्ति बऱ्याच अंशीं तिच्या मुलींत उतरली आणि इंदिरेनं स्वतः त्याची नीट जोपासना केली. "आपणाला लिहीतां आलं असतं तर किती बरं झालं असतं" असं तिला नेहमी वाटत असे. "कादंबऱ्या लिहायला आपल्याजवळ कितीतरी कथानकं आहेत पण लिहायचं कसं तेच समजत नाही." असे उद्गार ती अनेकदां काढी. तिची ही इच्छा तिच्या धाकट्या मुलीनं तिच्या हयातींतच पूर्ण करून दाखविली. इंदिरेकडून मिळालेल्या नैसर्गिक देणगीमुळें वयाच्या नवव्या दहाव्या वर्षापासूनच तिला लिहायचा नाद लागला आणि आईवडिलांच्याकडून मिळत गेलेल्या उत्तेजनांमुळें वयाच्या एकोणीसाव्या वर्षी तिनं पहिली कादंबरी लिहून आपल्या आईवडिलांना अर्पण केली.

आपल्या श्रमाचं सार्थक इंदिरेला कदाचीत् वाटलंहि असेल पण बोलून दाखविण्याचा तिचा स्वभावच नव्हता. मुलीनं भेट म्हणून दिलेली कादंबरीची प्रत ट्रंकेच्या तळाशी तिनं जपून ठेवली.

तिचा मुलांच्या वर अतिशय जीव. तिचा इंग्लंडला गेलेला दुसरा मुलगा तिच्या हयातीपर्यंत परत आला नाहीं. येऊं येऊं म्हणतां म्हणतां मध्येंच लढाई उद्भवली हे ना ते अशी कारणं निघून त्याचं येणं लांबणिवर पडलं. तो इंग्लंडला जाते वेळीं त्या दोघांची जी भेट घडली तीच अखेरची. अखेरपर्यंत त्याच्या वाटेकडे तिचे डोळे होते. त्याची प्रॅक्टीस आपण पहावी अशी तिची उत्कट इच्छा पण ह्या सगळ्या गोष्टी न पाहतांच तिला डोळे मिटावे लागले.

ती विलक्षण स्वाभिमानी होती. त्या स्वाभिमानाच्या पोटीच थोडासा हट्टीपणा उत्पन्न झाला. तिचा स्वाभिमान व तिच्या पतींचा करारीपणा ह्यामुळें त्यांच्या दोघांच्या स्वभावांतलं अंतर दुरावत गेलं. तिचा स्वभाव तितकाच हळवा

व प्रत्येक गोष्ट मनाला लाऊन घेण्याचा होता. मनांतल्या गोष्टी बोलून दाखवायच्या नाहींत हा तिचा लहानपणापासूनचा स्वभाव. ह्या अनेक कारणामुळें तिचा मनस्ताप वाढत गेला. आजारीपणांतही तिनं शक्यतोंवर आपलीं कामं, आंघोळ व देवपुजा चुकूं दिलीं नाहीं. क्षमाशीलता तिच्यांत भरपूर होती. कधीं कधीं मला वाटतं, तिच्या अतिप्रेमळपणामुळेंच तिनं दुसऱ्यांच्या करतां स्वतः त्रास करून घेतला.

ह्या उन्हाळ्यांत ती न्युमोनियानं आजारी पडली. शक्यतोंवर दुसऱ्याला त्रास द्यायचा नाहीं हे तिचं धोरण आजारांतही कायम होतं. न्युमोनियातून ती पार पडली पण दुसरंच दुखणं उद्भवलं. अंगातली शक्ति कमी झालेली त्यामुळें ह्या नव्या दुखण्याशीं झगडण्याची शक्ति तिच्या ठिकाणी बिलकूल नव्हती. हृदय अशक्त झालेले;—तरीहि तिची मुळचीच प्रकृती इतकी काटक होती कीं डॉक्टरांना सुद्धां ती इतक्या लवकर जाईल असं वाटलं नव्हतं.

पण २० तारखेला ती गेली, अगदी कसलाही त्रास अगर वेदना न होता. शेवटपर्यंत बोलण्याचं समाधान तिला मिळालं. आपण जाऊं ह्याची तिला आणि घरांतल्यांनाहि कल्पना नव्हती. त्यामुळें विश्रांतीसाठीं म्हणून तिनें जे डोळे मिटलें, ती कायमचीच विश्रांती घेण्यासाठीं. तिच्याकडे पाहिल्यावर कुणालाही वाटलं असतं अजून झोपलेलीच आहे, केव्हां जागी होईल अन् हांक मारेल ह्याच्या नेम नाहीं—

दुसऱ्या दिवशीं त्या नाजूक, ठेंगण्या गौरवर्ण, देहाची दोन मुठी राख झाली. तिच्या देव्हाऱ्यांत महादेवाच्याच मूर्ती जास्त होत्या किंवा आयुष्यभर ती मनोभावें देवाचीं पुजा करीत आली होती म्हणून ही कदाचीत् असेल, ती राख, आणि अस्थी महादेवाच्या पठारांतून वाहण्याऱ्या आणि महादेवाच्या नित्य सान्निध्यांत असणाऱ्या धेनु आणि नर्मदा ह्या पवित्र नद्यांत शिरविल्या गेली.

बाजूनं असणारे सातपुड्याचे उंच पहाड, आजूबाजूला रम्य वनश्री आणि त्या पहाडांतून वळणांवळणानं नर्मदेला भेटण्यासाठीं जाणाऱ्या धेनुनदीचं विशाल पण एकीकडे, निवांत असणारं पात्र ह्यापुढें कायमचं राहण्यासाठीं तिनं निवडलं आणि तिचं श्राद्ध झालं ते सुद्धां जटाशंकर नांवाच्या अतिरम्य, वनश्रीनं मुसमुसलेल्या

आणि उंच पहाडांनीं वेढलेल्या अशा शंकराच्या पवित्र निवास स्थानी. " ह्या बाईची पुण्याई फार मोठी होती असे उद्गार खुद्द ब्राम्हणालाहि काढावे लागले. "

कांहींकांही सुंदर सुंगधी नाजूक फुलं माणसांच्या दृष्टीपासून दूरकुठें उगवतात. त्याचा सुगंध त्याच्या जवळच्या मातीच्या कणांना तेवढा लागतो. कांहि दिवस ती फुलतात आणि जगाच्या दृष्टीला न पडतांच सुकून जातात. त्यांच्या अंगच्या तो मोहक सुगध पाकळ्यांच्या बरोबरच मातींत मिसळतो. इंदिरेच्या आयुष्याचं तसंच झालं. तिच्या अंगचे अनेक गुण व कर्तबगारी घराच्या चार भितींतच नष्ट झालीं. आपणाला शिकायला मिळालं असतं तर बरं झालं असतं असं तिला कितीदां वाटत असे. तसं झालं असतं तर तिची दृष्टी ह्या चार भिंतींच्या पलीकडे पोहचली असती, ती अधिक विशाल झाली असती, आणि त्या गुणांचा सुगंध जवळच्या मातीच्या कणांनाच न लागतां आणखीही आसमंतांत मिसळला असता.

इ. स. १८८५ सालीं सुरूं केलेली जीवनयात्रा, इंदिरेनं. २० मे १९४७ सालीं पूर्ण केली. तिच्यापासून जीवन मिळालेले पांच प्रवासी ह्या वेळेपर्यंत तिच्या प्रेमाच्या पंखाखाली आयुष्याचा मार्ग चालत होते.—त्यांचा व पतीचा निरोप घेऊन ती दुसऱ्या वाटेनं निघून गेली. तिच्या शिवाय; त्यांचा प्रवास सुरूं झाला पण तिला अखेरचं वंदन करतांना, " हीच आई आम्हांला जन्मोजन्मी लाभूं दे, " अशी प्रार्थना त्यांच्यापैकीं प्रत्येकानं केली.

अशा स्वाभिमानी, कर्तबगार इंदिरेची धाकटी मुलगी म्हणवून घेण्याचा मान मला मिळाला. माझ्या आयुष्यांत जे कांहीं चांगलं मला मिळालं ते सगळं तिच्याच श्रमाचं फळ आहे. आईच्या प्रेमाची फेड होणं अशक्य पण तिची आठवण म्हणूंन ह्या कथासंग्रहाचं नांव मी ' इंदिरा ' ठेवलं आहे. ज्या वाढोण्यांत देशमुखांची वडील सून व त्यांच्या वैभवाची लक्ष्मी म्हणून हिनं प्रवेश केला, जिथं गोरगरिबांपासून ती सगळ्यांची आई झाली, आणि ज्या ठिकाणीं तिच्या वैयक्तिक सुखदुःखाची अनेक वर्षे गेली त्या धाम नदीच्या रम्य तीरावर वसलेल्या देशमुखांच्या वाढोण्याला हा कथासंग्रह अर्पण केला आहे.

२० जून १९४७ लीला.

# एक होता राजा.................................. २

" रविंद्रनाथ टागोरांच्या " once upon a time there was a king " ह्या गोष्टीचा अनुवाद "

**त्या रात्रीं सोन्याच्या पलंगावर पांढरीं फुलं पसरून तरुण पत्नीनें शय्या तयार केली;' आतां आयुष्यांतलं गोड गुपित ती त्याला सांगणार होती. त्याला स्वर्गीय आनंद उपभोगायला मिळाला असता, पण... ...**

" एकदां, एक होता राजा. "

आम्हीं जेव्हां लहान मुलं होतों तेव्हां ह्या गोष्टींतला राजा कोण होता हें सांगण्याची गरज नव्हती. त्याचं नांव शिलादित्य असलं किंवा शालिवाहन असलं तरी त्याला आमची हरकत नव्हती, आणि तो काशीला राहत असला किंवा कनोजला राहत असला तरी त्याच्याशीं आम्हांला कांहीं करायचं नव्हतं. सात वर्षांच्या छोट्या मुलाचं हृदय आनंदानं नाचूं लागेल असं फक्त एकच सत्य होतं, अगदीं खरं सत्य आणि तें म्हणजे ' एक होता राजा. '

परंतु आधुनिक काळांतील वाचकांनीं एखाद्या गोष्टीची अशी सुरुवात केलेली ऐकली कीं ते एकदम त्याबद्दल साशंक होतात. इतिहास आणि शास्त्राचा आधार घेऊन विचारतात, " कोणता राजा ? "

अर्थात् मग गोष्ट सांगणारेही जास्त हुषार बनतात. ' एक होता राजा ' एवढ्याच पूर्वीच्या वाक्यावर संतुष्ट राहण्याची त्यांची तयारी नसते, तेही विद्वत्तेचा आव आणून म्हणतात; " एकदां अजातशत्रु नांवाचा एक राजा होता. "

पण आधुनिक वाचकाची उत्सुकता एवढ्यावरच थाबत नाहीं. गोष्ट सांगणाऱ्याकडे तो अगदीं रोखून पाहतो आणि विचारतो, "कोणता अजातशत्रु ?"

आम्हीं जेव्हां लहान होतों तेव्हां ह्या सगळ्या गोष्टींतली माधुरी आम्हांला कळत होती. आमच्या मनाच्या शास्त्राच्या आधारें अशा पऱ्यांच्या गोष्टींतला गोडा पणा आहीं चटकन् ओळखूं शकत होतों. ज्ञानासारख्या क्षुल्लक गोष्टींची आम्ही कधीं पर्वा केली नाहीं फक्त त्यातलं सत्य काय आहे एवढंच पाहत होतों. आमच्या निष्कपटी साध्या मनाला सत्याचा स्फटिकाचा राजवाडा कुठें आहे हें माहित होतं आणि त्या राजवाड्यापर्यंत आम्हीं पोचूं शकत होतों. परन्तु आज 'एक होता राजा' एवढं साधं सत्य सांगण्याकरतां शेंकडों पानं लिहिण्याची आणि हजार गोष्टींची यादी देण्याची आम्हांला आवश्यकता वाटते.

मी लहान असतांना कलकत्त्याला एका संध्याकाळी अशाच एका गोष्टीची सुरुवात झालेली मला स्पष्टपणें आठवते. त्या दिवशीं दिवसभर पाऊस पडत होता, सगळ्या शहरभर पाणी झालेलं होतं. आमच्या गल्लींत तर गुडघ्याएवढं पाणी सांचलं होतं. आणि त्या संध्याकाळी माझी अगदीं नक्की खात्री झाली कीं, आज आपले शिकवणीचे मास्तर कांहीं येत नाहींत. व्हरांड्याच्या एका कोपऱ्यात बसून मी गल्लीकडे पाहूं लागलों आणि माझ्या हृदयाचे ठोके जलद पडूं लागले. प्रत्येक मिनिटाला माझे डोळे वरून मुसळधार कोसळणाऱ्या पावसाच्या सरींकडे जात होते. मी मनाशीं प्रार्थना करीत होतों, 'हे परमेश्वरा आणखी साडेसात वाजेपर्यंत असाच मुसळधार पाऊस पडूं दे.' माझी अशी पक्की खात्री झाली होती कीं. कलकत्ता शहरांतल्या अमुक एका कोपऱ्यांतल्या गरीब बिचाऱ्या एका मुलाला त्याच्या मास्तरच्या तावडींतून सोडविण्यासाठींच संध्याकाळीं इतका मुसळधार पाऊस पडत होता.

माझ्या प्रार्थनेचं फळ म्हणून म्हणा अगर निसर्गाचा कांहीं नियम असेल म्हणून म्हणा त्या दिवशीं पाऊस कांहीं थांबला नाहीं. पण हरे राम ! मास्तरांनीं सुद्धां यायचं सोडलं नाही.

अगदीं बरोबर नेहमीच्याच वेळेला गल्लीच्या कोपऱ्यावर मी त्यांची छत्री बघितली. मास्तर येणार नाहींत, अशीं जी आशा होती ती पार नाहिशी होऊन माझ्या छातींत धडकी भरली. एखाद्या गुन्हेगाराला मेल्यानंतर जर खरोखर शिक्षा मिळत असेल तर माझे मास्तर माझ्या जागी जन्मावे अन् मी त्यांच्या, एवढीच प्रार्थना मी त्यावेळीं केली असेल.

मास्तरांची छत्री पाहिल्याबरोबर मी आईच्या खोलींत धूम ठोकली. दिव्याच्या प्रकाशांत आई अन् आजी समोरासमोर बसून पत्ते खेळत होत्या. आईच्या शेजारी बसलेल्या पलंगावर मी उडी घेतली आणि म्हणालों,

" आई, मास्तर आले आहेत, अन् माझं तर डोकं भयंकर दुखत आहे आज शिकलों नाही तर चालण्यासारखं नाहीं का !

मला वाटतं मी ही गोष्ट सांगतों आहें खरी; पण कृपाकरून तिचा कुणी दुरुपयोग करावा अगर उदाहरण म्हणून ती डोळ्यासमोर ठेवावी अशी माझी मनापासून इच्छा नाहीं. कारण मी जें केलं तें खरोखर वाईट होतें, आणि त्याबद्दल मला कांहीहि शिक्षा मिळाली नाहीं. उलट माझी ती वाईट विनंती मान्य करण्यांत आली.

आईनं म्हटलं " ठीक आहे." आणि मग नोकराकडे वळून ती म्हणाली, " मास्तरांना सांग, म्हणावं तुम्ही घरी जा."

अर्थात् डोकं दुखण्याचं जें सोंग मी घेतलं होतं त्यावर तिचा विश्वास नव्हता हें उघड होतं. कारण नोकराला सांगितल्यावर माझ्याकडे लक्ष न देतां ती पत्ते खेळण्यांत गर्क झाली. आणि उशींत डोकं खुपसून मी मनाशीं खूप हंसलों. आई आणि मी, आम्ही दोघंही परस्परांना किती बरोबर ओळखून होतों !

परंतु सात वर्षांचा मुलगा आजाराचं हें ढोंग किती वेळ चालू ठेवील हे सर्वांनाच माहित आहे. आणखी एक दोन मिनिटांनी मी आजीचा पदर धरला अन् म्हटलं, ' आजी, एक गोष्ट सांग ना. '

आजीला मला खूपदां सांगावं लागलं. आई आणि आजी पत्ते खेळण्यांत इतक्या दंग झाल्या होत्या कीं आजी मुळीं माझ्याकडे दुर्लक्षच करीत होती. अखेरीस आईनं म्हटलं, "कायरे सारखा त्रास देतोस असा! थांबून जा आमचा खेळ संपेपर्यंत" परंतु मी मात्र 'आजी एक गोष्ट सांगना', असं सारखं म्हणत राहिलों. मी आईला सांगितलं, "तुमचा खेळ उद्यां संपवा. परंतु आजीनं मला आत्तांच्या आत्तां एक गोष्ट सांगितलीच पाहिजे."

अखेरीस आईनं पत्ते खालीं टाकले अन् म्हटलं, "सांगून टाका त्याला एकदाची गोष्ट. खरंच मोठा त्रासदायक आहे तो." बहुतेक तिला कदाचित् आठवलं असावं कीं आतां मास्तरही नाहींत अन् ह्या पोराला अभ्यास करायला पाठवितां यायचं नाहीं.

आईनं म्हटल्याबरोबर मी आजीचा हात पकडला; आणि नाचत तिचा हात ओढीत माझ्या पलंगाकडे घेऊन आलों. मच्छरदाणीचा कांठ धरून खालीवर उड्या मारल्या. आणि आनंदाचा भर थोडासा ओसरल्यावर म्हटलं, "हं आजी, आतां कर सुरवात."

आजीनं सुरवात केली. "आणि राजाला एक राणी होती." वा! सुरवात तर फार छान झाली होती. राजाला फक्त एकच राणी होती!

नाहीं तर नेहमीं गोष्टींतल्या राजांना वाटेल तेवढ्या राण्या असतात. राजाला दोन राण्या होत्या असं ऐकल्याबरोबर माझ्या मनाची निराशा होत असे. कारण त्या दोघींच्यापैकीं एक नक्की नावडती असणार आणि तिचा पुढं दुःखांत शेवट होणार. परंतु आजीनं सुरवात केलेल्या गोष्टींत अशी कांहीं भीति नव्हती. ह्या राजाला फक्त एकच राणी होती.

आजीच्या पुढच्या गोष्टीचा भाग असा कीं त्या राजाला मुलगा नव्हता. अर्थात् सातव्या वर्षी, माणसाला मुलगा नसला तर दुःख करण्यासारखं कांहीं आहे असं मला वाटणं शक्य नव्हतं. उलट मुलगा असतां तर राजाला अडथळाच झाला

असता, तेव्हां मुलगा व्हावा म्हणून राजा तपश्चर्या करायला रानांत गेला हें ऐकूनही मला कांहीं आनंद झाला नाहीं. मी जर रानांत गेलों असतों तर फक्त एकाच गोष्टी साठीं. आणि ती म्हणजे मास्तरांच्या तडाक्यांतून सुटावं म्हणून !

राजाच्या मागें त्याची राणी आणि एक छोटीशी राजकन्या राजधानींत राहिली. बारा वर्षं निघून गेलीं. राजकन्या वाढली आणि एक सुंदर तरुणी दिसूं लागली; परंतु राजाला मात्र तप करतांना तिची बिलकूल आठवण राहिली नाहीं. राजकन्येच्या लग्नाची वेळ आली पण राजा अजूनपर्यंत आला नव्हता. तेव्हां राणी दुःखानें म्हणूं लागली, " माझी सोन्यासारखी मुलगी अशीच लग्नावांचून राहणार आहे काय ? हाय, हें नशीब माझं !"

शेवटीं राणीनं राजाच्या शोधार्थ माणसं पाठविलीं आणि त्याला फक्त एका रात्रीसाठीं येऊन राजवाड्यांत जेवण्याची विनंती केली. राजानं कबूल केलं.

राणीनं मोठ्या काळजीपूर्वक जेवण तयार केलं. चंदनाच्या लांकडाचा पाट ठेवला आणि सोन्याच्या ताटांत व चांदीच्या पेल्यांत निरनिराळे पदार्थ वाढले. मोराच्या पिसांचा पंखा हातांत घेऊन राजकन्या पाटामागें उभी राहिली. बारा वर्षांनंतर राजा राजवाड्यांत आला. राजकन्येच्या सौंदर्याचा प्रकाश जिकडेतिकडे पसरलेला पाहून तो अगदीं चकित झाला. राजकन्येच्या मुखाकडे त्यानें दृष्टि टाकली आणि आपल्याला जेवायचं आहे हें सुद्धां विसरून गेला ! शेवटीं त्यानं राणीला विचारलं, " एखाद्या अप्सरेसारखं जिचं सौंदर्य आहे अशी ही मुलगी कोण आहे ?"

राणीनं कपाळावर हात मारला आणि म्हटलं, "किती दुर्दैव माझं ! स्वतःच्या मुलीलासुद्धां तुम्हांला ओळखतां येत नाहीं ?"

कांहीं वेळ राजा आश्चर्यानं चकित होऊन स्तब्ध राहिला आणि मग म्हणाला " काय ? माझी लहान मुलगी एवढी सुंदर स्त्री झाली आहे ?"

राणीनं निश्वास सोडून म्हटलं, " नाहीं तर काय ? बारा वर्ष लोटून गेलीं हें तुम्हांला माहित नाहीं काय ?" राजानं विचारलं, " मग तूं तिचं लग्न कां केलं नाहींस ? " राणीनं उत्तर दिलं, " तुम्हीं इथं नव्हता. मग तिच्याकरतां योग्य असा वर कोण शोधून काढणार ?"

तेव्हां राजानं निश्चय केला, कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं जो माणूस प्रथम आपल्या दृष्टीस पडेल त्याच्याशीं राजकन्येचं लग्न लावून द्यायचं.

राजकन्येनं कांहीं न बोलतां पंखा हलविण्याचं काम चालू ठेवलं आणि राजानं आपलं जेवण संपविलं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, राजवाड्याच्या बाहेर सात वर्षांचा ब्राह्मणाचा मुलगा राजाच्यादृष्टीस पडला. रानांत काटक्या गोळा करण्याकरितां तो जात होता.

राजानं म्हटलं, " ठीक आहे. ह्याच्याशींच मी माझ्या मुलीचं लग्न लावून देईन."

राजाची अवज्ञा कोण करणार ? लगेच त्या मुलाला राजवाड्यांत आणण्यांत आलं आणखी राजकन्येशीं त्याचं लग्न लावून देण्यांत आलं."

आजीनं एवढं सांगतांच मी तिच्या आणखी जवळ सरकलों आणि उत्सुकतेनं विचारलं, " पुढें काय झालं ?"

कोण जाणे, पण मनांतल्या मनांत मला सारखं वाटत होतं कीं, सात वर्षांचा तो ब्राह्मणाचा मुलगा मी असतों तर किती बरं झालं असतं ! त्या रात्रीच्या वेळीं पावसाच्या थेंबांचा आवाज स्पष्टपणें ऐकायला येत होता. माझ्या बिछान्या-शेजारचा तेलाचा दिवा सावकाशपणें जळत होता. ह्या सगळ्या परिस्थितीमुळें माझ्या मनांत कुठें तरी अशी एक कल्पना उत्पन्न झाली कीं, कुठल्या तरी पहाटेच्या प्रहरीं कोणातरी राजाच्या राज्यांत मी काटक्या गोळा करतों आहें, आणि क्षणांत देवीसारख्या सुंदर असलेल्या राजकन्येशीं माझं लग्न लागलं. तिच्या कपाळावर सोन्याची बिंदी आहे, कानांत हिऱ्याच्या कुड्या आहेत. गळ्यांत सांखळी, हातांत

बांगड्या, आणि कमरेला मोत्यांचा कंबरपट्टा आहे. पाय उचलतां क्षणींच पायां-तल्या पैंजणाचा मधुर नाद होतो आहे. माझी आजी जर एखादी लेखिका असती तर ह्या गोष्टीकरतां तिनं कितीतरी कारणं उदाहरणं खचित दिलीं असती. पहिल्या प्रथम तो राजा रानांत बारा वर्षं कां राहिला हा प्रश्न सहजच कुणीही विचारला असतां; आणखी दुसरं असं कीं, राजाच्या राजकन्येनं इतके दिवस अविवाहित राहण्याचं काय कारण होतं? असला निष्कारण घालविण्यांत आलेला वेळ अर्थातच मूर्खपणाचा मानला असता.

परंतु समजा, टीकाकाराशीं एक शब्दही न भांडता आजी गोष्टीच्या एवढ्या मुद्यापर्यंत सहज आली असती तरीसुद्धां लग्नाच्या बाबतींत टीकाकारांनीं अर्थातच ओरड केली असती. पहिली गोष्ट अशी कीं, असं होणं शक्य नाही. दुसरी गोष्ट अशी कीं एखाद्या राजाची राजकन्या व भिक्षुकाचा एक छोटासा मुलगा ह्यांच्यांत लग्न होणं कसं शक्य आहे? माझ्या आजीच्या वाचकांनीं हें ऐकल्याबरोबर असं खचित म्हटलं असतं कीं ही लेखिका समाजाचे जे नियम आहेत त्याच्या विरुद्ध पुरस्कार करते आहे; आणि म्हणून निरनिराळ्या वर्तमानपत्रांत पत्र व लेख लिहून त्यांनीं टीकेचं एकच वादळ उठवून दिलं असतं.

तेव्हां मी मनांतल्या मनांत अशी इच्छा करतों कीं माझी आजी परत आजीच्याच जन्माला यावी. आणि दुर्दैवानं तिच्या कमनशीबी नातवाच्या जागीं येऊं नये.

अतिशय आनंदानं व उत्सुकतेनं मी आजीला विचारलं, "पुढं काय झालं?"

आजीनं सुरवात केली, "राजकन्या आपल्या छोट्याशा नवऱ्याला घेऊन गेली. तिनं एक सात पंखाचा मोठा राजवाडा बांधला व त्यांत त्याला वाढवूं लागली."

मी बिछान्याच्या खालीं ताडकन् उडी मारली. आजीचा गुडघा अगदीं घट्ट पकडीत म्हटलं, "मग पुढें काय?" आजी सांगूं लागली. "तो लहान मुलगा पुढं शाळेंत जाऊं लागला. आपल्या मास्तरांच्याजवळ पुष्कळ धडे शिकला. तो

जसजसा वाढूं लागला तसतशीं त्याच्या वर्गांतील मुलं विचारूं लागलीं, सात पंखाच्या राजवाड्यांत तुझ्याबरोबर राहणारी ती सुंदर राजकन्या कोण आहे ?"

ती कोण आहे हें कळण्याची त्या ब्राह्मणाच्या मुलालाही उत्सुकता होती. त्याला एवढंच आठवत होतं कीं, एक दिवस तो रानांत काटक्या गोळा करण्याकरतां जात होता, पुढें कांहीं तरी घडलं; परन्तु काय तें मात्र त्याला नीटसं कळलं नाही.

अशा तऱ्हेनं चारपांच वर्षं लोटलीं. त्याचे मित्र त्याला नेहमींच विचारींत, "त्या सात पंखाच्या वाड्यांत राहणारी ती सुंदर बाई कोण आहे ?" मग ब्राह्मणाचा मुलगा शाळेंतून घरीं आल्यावर खिन्न होऊन त्या राजकन्येला विचारीत असे; "माझे मित्र नेहमीं मला विचारतात कीं, त्या सात पंखाच्या राजवाड्यांत राहणारी बाई कोण आहे ? आणि त्यांच्या प्रश्नाचं मला कांहीं उत्तर देतां येत नाहीं. तेव्हां मला खरंच सांग तूं कोण आहेस ?"

राजकन्येनं म्हटलं, "आजचा दिवस जाऊं दे. मी पुढें केव्हां तरी सांगेन." प्रत्येक दिवशीं त्या ब्राह्मणाच्या मुलानं विचारावं, "तूं कोण आहेस ?" आणि त्या राजकन्येनं उत्तर द्यावं, "आजचा दिवस जाऊं दे. पुढें केव्हांतरी सांगेन." असं करतां करतां आणखी चारपांच वर्षं लोटलीं.

असेरीस तो ब्राह्मणाचा मुलगा फारच उत्सुक झाला आणि म्हणाला, "हे सुंदर स्त्रिये, तूं कोण आहेस हें जर मला आज सांगितलं नाहींस तर हा सात पंखाचा राजवाडा सोडून मी आतांच्या आतां निघून जाईन !"

दुसऱ्या दिवशीं शाळेंतून घरीं आल्याबरोबर त्या ब्राह्मणाच्या मुलानं म्हटलं "आतां खरंच सांग, तूं कोण आहेस ?" राजकन्येनं म्हटलं, "रात्रीं जेवण झाल्यावर तूं अंथरुणावर झोपशील त्यावेळीं मी कोण आहें हें तुला सांगेन."

ब्राह्मणाच्या मुलानं कबूल केलं. रात्र केव्हां येते ह्याची तो वाट पाहूं लागला. राजकन्येनं सोन्याच्या पलंगावर पांढरीं शुभ्र फुलं पसरलीं. सुवासिक तेल

भरून सोन्याचा दिवा लावला, तिनें आपले केस सजविले, निळीं वस्त्रें परिधान केलीं आणि ती देखील रात्रीची वाट पाहूं लागली.

त्या संध्याकाळीं ब्राह्मणाच्या मुलाचं धड जेवणाकडेसुद्धां लक्ष नव्हतं. जेवण संपल्यावर ज्या खोलींत फुलं टाकलेला सोन्याचा पलंग होता त्या खोलींत तो आला आणि स्वतःशीं म्हणाला, "ह्या सात पंखाच्या राजवाड्यांत राहणारी ही सुंदरबाई कोण आहे हें मला नक्की कळेल."

नवऱ्याच्या ताटांत जें शिल्लक राहिलेलं होतं तेंच राजकन्येनं खाल्लं; आणखी हलकेच ती खोलींत शिरली. सात पंखाच्या राजवाड्यांत राहणाऱ्या सुंदर राजकन्येचं गुपित आज रात्रीं तिला उघड करायचं होतं. त्याला सांगण्याकरितां त्याच्या बिछान्याजवळ म्हणून ती गेली. पण तेवढ्यांत फुलांतून बाहेर पडलेल्या सर्पानं त्या मुलाचा चावा घेतला होता. तिचा छोटासा नवरा, त्या फुलांच्या शय्येवर चेहरा कोमेजलेला असा मृत होऊन पडलेला होता !"

माझ्या हृदयाची धडधड थांबली. अश्रुपूर्ण नेत्रांनीं गुदमरलेल्या आवाजांत मी विचारलं, "मग काय झालं?"

आजीनं म्हटलं, "मग पुढें......"

परन्तु गोष्ट पुढें सांगण्यांत काय अर्थ होता? कारण पुढें कदाचित् अशक्य वाटणाऱ्या आणखीहि कित्येक गोष्टी असतील. सात वर्षाच्या मुलाला अर्थात् हें माहित असणं शक्य नव्हतं कीं, मरणानंतर, "पुढें काय?" असा प्रश्न जरी विचारतां आला तरी त्याचं उत्तर आजीच काय, पण आजीची आजीसुद्धां देऊं शकणार नाहीं !

परंतु लहान मुलाचं मन पराभव पत्करायला कबूल नसतं, पुढें काय घडलं हे पाहण्याच्या उत्सुकतेमुळें एखाद्या वेळीं मृत्यूबद्दलसुद्धां त्याचं मन विचार करायला तयार होईल, पण मास्तर आले नाहींत म्हणून आजीनं सांगायला सुरुवात केलेली गोष्ट अशी एकाएकीं संपून जावी हें मात्र त्याच्या मनाला आवडणार

नाहीं, तेव्हां ह्या जगात कधींही घडूं शकणार नाहीं अशी गोष्ट सुद्धां आजीला पुढें चालू करावी लागते आणि ती सुद्धां इतक्या सहजपणें म्हणते, " तें प्रेत केळीच्या पानांवर नदींतून वाहात आलं–आणि एका साधूच्या दृष्टीस पडलं. " मुसळधार पाऊस कोसळणाऱ्या रात्री, दिव्याच्या मंद प्रकाशांत, मृत्यूबद्दल सगळी भीति मुलाच्या मनांतून नाहींशी झालेली असते; रात्रीं लागलेली गाढ झोप ह्या-खेरीज दुसरा अर्थ त्याला माहित नसतो. ज्यावेळीं गोष्ट संपते, त्यावेळीं थकलेल्या डोळ्यांच्या पापण्या झोपेनं जड झालेल्या असतात. तेव्हां वेळेच्या शांत प्रवाहांत लहान मुलांना झोपेच्या स्वाधीन आपण करतों; आणि उत्साह व आनंद असलेल्या जगांत त्यानं जागं व्हावं म्हणून सकाळच्या प्रहरीं झोपेंतून उठवितांना जादूच्या गोष्टी सांगतों.

---

# पहिली आणि अखेरची ...................... ३

माझ्या मनगटांवरच्या घड्याळांत चारला फक्त दहा मिनीटं उरलेली होती. गाडी प्लॅटफार्मवर आली सुद्धां असेल अशा भितीनं दचकून मी चटकन् रिक्शाच्या खालीं उतरलें आणि आंत शिरलें. नाहीं तरी कलकत्ता मेल अलिकडे इतकी भर-लेली असते की जागा मिळणं मुश्किल व्हावं. स्टेशनवर जिकडे तिकडे खाकी पोशाखांतले रिक्रुटस् उभे होते; हमाल आणि जागा मिळावी म्हणून धांवपळ कर-णाऱ्या इतर लोकांची खुप गर्दी होती आणि त्यांतच ' लेयिये नागपूरी संत्रा ' ' चहा ' इत्यादी ललकाऱ्यांची भर पडलेली होती.

गर्दीतून वाट काढीत मी जागा शोधित होते. प्रवास कांहीं फार करायचा नव्हता मला, पण वर्धेपर्यंत तरी स्वस्थ मनानं जाता यावं ह्यासाठीं त्यांतल्या त्यांत

ऱ्यांपैकी जागा शोधावी असा माझा विचार होता. गाडी सुटायला फारसा वेळ उरलेला नव्हता. आणि मी अजूनही प्लॅटफार्मवर ह्या टोकांपासून तर त्या टोकांपर्यंत चक्कर घालीत होते. बायकांचे डब्बे सुद्धां गच्च भरलेले होते. मी अगदी गोंधळून गेले. काय करावं ते सुचेना मला. पुरुषांच्या डब्यावरनं सरकून पलिकडे बायकांच्या डब्याकडे जागा मिळवायची असा निश्चय करून मी पाऊल उचललं इतक्यांत "जागा मिळत नाही काय ? मी इथं करून देतो तुम्हांला" असे शब्द ऐकतांच मी त्या दिशेनं पाहिलं; त्याबरोबर जो चेहरा माझ्या दृष्टीला पडला तो अगदीच अनोळखी आहे असं मला वाटलं. एकदां माझ्या मनांत आलं की त्याच्या उद्गाराकडे लक्ष न देतां पुढें सरकावं पण वेळ उरलेला नव्हता. आणि दुसरं असे की असेना कां अनोळखी, दोन तासांचा तर प्रश्न आहे. देतो आहे बिचारा जागा, तर नाहीं कशाला म्हणावं !

शिवाय ती गाडी चुकवावी अशी माझी मुळींच इच्छा नव्हती. कारण त्या माझ्या मैत्रिणीनं मला अगदी आग्रह करून वर्धेला बोलाविलं होतं. तिचा माझ्यावर मी गेले नसते तर फार मोठा रोष झाला असता. " तुला कधीं तुझ्या appointments ठेवतां येत नाही असा तिचा मोठा आरोप आहे माझ्यावर. तेव्हां तो आरोप अशंतः तरी दूर करावा ह्या हेतुनं मला आज वर्धेला जायलाच हवं होतं–

तेव्हां मी लगेच आंत शिरलें. त्यानं आपलं पसरलेलं बेडिंग सावरलं आणि मला जागा करून दिली. तो बेडिंग गुंडाळित होता तेव्हांच मी त्याच्याकडे निरखून पाहून घेतलं. कारण इतर वेळीं त्याच्या दृष्टीला दृष्ट देऊन त्याच्याकडे पाहणं शक्य झालं असतं की नाहीं कोण जाणें––

तो पुरा उंच होता. त्याच्या गौरवर्णाला त्यानं घातलेला मिलिटरी पोशाख अगदीं खुलून उठत होता. एखाद्या कादंबरींतील नायकाप्रमाणें त्याच कपाळ भव्य होतं आणि समोरचे केस किंचीत् कुरळे होते. ह्या स्वारीनं बादशाही कमीशन घेतलेलं असावं असा तर्क मी तेव्हांच केला.

पण तरी देखील माझा विशेष चांगला ग्रह झाला नाही त्याच्याबद्दल. त्याचे ते पिंगट डोळे पाहतांच मला एकदम कससंच झालं. घाऱ्या डोळ्यांची माणसं लुच्च्या स्वभावाची असतात असा कांहीं विलक्षण समज आहे माझ्या मनाचा आणि त्या मुळें असल्या डोळ्यांच्या व्यक्ति बघितल्या की माझं मन त्यांच्याशीं बोलायला विशेष खुशींत नसतं.

तरी पण ह्या गृहस्थानं मला जागा करून दिलेली होती. त्याच्याबद्दल माझा कसाही ग्रह झालेला असला तरी तो उघडपणें दाखविणं ठीक नव्हतं. मी खुशाल माझ्या हातातलं वर्तमानपत्र उघडून वाचीत बसलें असते तर माझ्या सभ्यपणाला ते खचित शोभलं नसतं.

गाडी सुरूं झालीं होती. शेताचे मोठमोठे काळसर पट्टे, दुरवर दिसणारे फिक्के जांभळें डोंगर. खुरटलेली झाडं, सगळं कांहीं एका मागून एक डोळ्यासमोरून सरकून जात होतं. मध्येंच कुठल्यातरी पुलांवरनं गाडी गेली त्याचा खड् खड् असा आवाज झाला. त्या पुलाच्या खालचं हिरवटसर पाणीं उन्हांत चमकलं आणि पाण्याच्या काठांवर उभ्या असलेल्या बायकांनीं पाण्यांत घागरी बुडवितां बुडवितां वर बघितलं. त्यांच्या शेजारच्या नागड्या पोरांनीं आरोळ्या ठोकल्या आणि पुल ओलां-डून गाडी पुढें झाली.

काय बोलावं हे ही मला समजेना. कितीदां माझ्या मनांत आलं, त्याला वि-चारावं की तुमचं नांव काय आहे? पण लगेच दुसऱ्यांदा माझ्या मनांत येई, ह्या गृहस्थानं तर आपलं नांव अजून विचारलेलं नाही, आपण प्रथम विचारलं तर तो मनांत असंही म्हणेल. ह्या बाईला विनयाविनय कांहीं आहे की नाहीं? त्यामुळे मनांत हजार प्रश्न जुळवूनही ते ओठांच्या अलिकडेच होतें.

तशा चत्मकारीक मनास्थितींत मी कितीवेळ राहिले असतें कुणास ठाऊक पण समोरचीं निसर्ग शोभा पाहण्याचा त्यालाही कंटाळा आला असावा. मान वळ-वून मांडीवरच्या फ्री प्रेसची घडी उचलीत त्यानं म्हटलं

"वाचला आहे काय?"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
आ. क्र. २८२५ दि.
वि.

मी वर नजर करतींच त्या पिंगट डोळ्यांशी माझी दृष्टभेट झाली. कपाळावरचे वाऱ्यानें उडणारे केस मागेकरीत मी म्हटलं.

" हो वाचला आहे. माझा आवडता पेपर आहे तो. "

त्यावर तो हंसला आणि म्हणाला ' खरं काय ! मला सुद्धां त्यांतले संपादकीय लेख फार आवडतात."

त्याच्या हातांतला फ्रीप्रेस मी माझ्या हातांत घेतला. वरची दोन पानं उलगडल्यासारखी केली पण पुढें काय करावं ते मला समजेना. कारण तो संपादकीय लेख आणि बाकीचा मजकूर, जवळ जवळ सगळं मी आदल्या दिवशींच वाचून काढलेलं होतं.

आपल्या मांडीवरच्या बोटांची किंचीत् चाळवाचाळव करीत तो म्हणाला, "तुम्हीं मला ओळखलेलं दिसत नाही."

त्याचा तो प्रश्न ऐकतांच मी परत त्याच्या चेहऱ्याकडे बघितलं; आणि त्याचे पिंगट डोळे दिसतांच परत माझी नजर बाजूला वळली. कारण आतांपर्यंत दोनदां त्याचे पिंगट डोळे दृष्टीस पडतांच कसंसच होऊन बरोबर उत्तर द्यायचं मी अगदी पार विसरलें होते.

अच्छा ! एकूण ही स्वारी आपल्याला ओळखते म्हणायची, पण त्याची आणि माझी प्रत्यक्ष अशी ओळख त्या क्षणापर्यंत घडलेली नव्हती. त्यामुळें मी त्याला म्हटलं.

" कोण जाणे, मला कांहीं आठवत नाहीं. "

मागं मस्तक टेकवित तो म्हणाला. " तुम्ही सध्या मॉरिसमध्यें असाल नाहीं का !

' हो ' असं उत्तर देतांना—आपल्या वर्गातली तर ही स्वारी नाहींना असं वाटून मी परत त्याच्याकडे बघितलं.

पण छे ! त्याचा चेहरा मला मुळींच ओळखीचा वाटेना. ह्या चार वर्षांच्या सहवासांत वर्गातले कित्येक मुलांचे चेहरे नेहमीच्या संवयीनं माझ्या परिचयाचे झाले होते खरे पण त्यातला हा चेहरा खास नव्हता. त्याचं नांव विचारावं असं आतापर्यंत अनेकदां माझ्या मनांत येऊन गेलं पण तो प्रश्न विचारण्याची हिंमत मला कांहीं केल्या होत नव्हती. शेवटीं " जाऊं दे, काय करायाचं आहे आपल्याला नांवाशी, असा विचार करून तो प्रश्न विचारण्याचा नाद मी सोडून दिला.

पुढचे प्रश्न कसे विचारावेंत ह्याचा तोही बहुधा विचार करीत असावा, कारण थोड्या वेळानं त्यानं म्हटलं, " तुम्ही ज्या वर्षी इंटरला होता त्या वर्षी मी बी. ए. ला होतो. " असं म्हणतांना हा आपल्या वर्गातला नाहीं तर एकूण असं वाटून मी निश्वास सोडला.

त्यानं तीन प्रश्न आंतापर्यंत मला विचारलें होते. शिष्टाचाराप्रमाणं मी देखील त्याला एखादा प्रश्न विचारायला हवा होता, त्यानं बादशाही कमीशन घेतलं असावं हे माहीत असूनही मी म्हटलं " कमीशन घेतलं आहे वाटतं ! "

' हो ' नंतर माझ्या चेहऱ्याकडे लक्ष जातांच त्या प्रश्नावरून कांहीतरी गैरसमज झाला असावा असं त्याला वाटलं की काय कोण जाणे, कारण तो लगेच म्हणाला, " कां ? आमच्या लोकांबद्दल तुम्हांला विशेष सहानुभूति नाहीं काय ? "

सरकारी नोकरी करणाऱ्या माणसांबद्दल मला फारसा जिव्हाळा वाटता नाहीं असं मला मनांतून वाटत असलं तरी अर्थातच उघडपणें बोलतां येण्यासारखं नव्हतं; म्हणून मी म्हटलं " छे, छे, तसं कांहीं नाहीं. उगीच आपलं."

तो हंसला आणि हलकेंच म्हणाला , B. A. झाल्यावर एक वर्ष बेकारींत काढलं आणि अखेरीस कमीशन घेऊन Air force मध्यें दाखल झालों."

मी हंसले आणि तो देखील हंसला.

गाडीचा वेग मंदावला होता. खिडकींतून घरांची छपरं, आणि लाल कौलं दिसत होतीं. डोळ्यापुढून सरकून जाणाऱ्या रस्त्यामधून सायकली आणि टांगे

त्यांची गर्दी दिसत होती. कुठल्यातरी सिनेमाची जाहिरात गाजत वाजत चालली होती त्याचे देखील सूर मला स्पष्टपणें ऐकायला आले.

गाडी वर्धेच्या स्टेशनांत शिरायला अवकाश नव्हता म्हणून मी पातळ साफ-सुफ केलं आणि चटकन् उठलें.

मी खालीं उतरतांच दाराजवळच्या पितळी दांड्यान वर हात ठेऊन तो म्हणाला, "आतां ओळख ठेवाल ना ! परत "ओळखतां कां असं विचारायला प्रसंग येणार नाही ना ! परत सुट्टी घेऊन आलो तर तुम्हांला अवश्य भेटेन."

मी हंसून म्हटलं. "अवश्य पुढच्या वेळी आलांत की जरूर या आमच्याकडं." त्यानं जरूर जरूर असं म्हणून मान हलविली.

"वर्धा जंक्शन असा मोठा बोर्ड ज्या ठिकाणीं लावलेला होता त्यापासून थोड्या दूर उभी असलेली अनिताची निळसर पातळांतली प्रसन्न आणि हंसतमुख आकृती मला दिसली. मला पाहतांच ती गर्दीतून पुढं झाली.

तिचा हात पकडून मी म्हटलं, 'बघ आले की नाहीं ! "

तर ! तर ! असं म्हणत तिनं माझा हात दाबला आणि आम्हीं दोघीहीं प्लॅटफार्मवरून आंत जायला वळलो. जाण्यापूर्वीं मी त्याला नमस्कार केला. दोन्ही हात जोडतांना माझी नजर परत त्याच्या चेहऱ्याकडे गेली; आणि त्याच्या पिंगट डोळ्यांशीं दृष्टभेट झाली. बाजूच्या पितळी दांड्यांना आपल्या मजबूत बोटांनी पकडून तो दारांत उभा होता. चालत्या गाडीतील वाऱ्याच्या झोतामुळें त्याचे नीट बसविलेले कुरळे केस बरेच विसकटले होते; तथापि खाकी पोशाखांतली त्याची पुरी उंच अन् देखणी आकृती रूबाबदार दिसत होती ह्यांत शंका नाही.

मी नमस्कार करतांच त्यानंही उलट हंसून मला नमस्कार केला. मी अन् अनिता जाण्यासाठीं वळलों. पुलांवरून चढतां चढतां अनिता मला म्हणाली, "तूं ज्याला नमस्कार केलास तो आनंद साठे ना ? " त्यावरोबर मी म्हटलं, " खरं ! तर ह्या क्षणापर्यंत त्याचं नांव सुद्धां माहित नव्हतं."

त्यावर आपले मोठे टपोरे डोळे माझ्याकडे रोखीत ती म्हणाली, "चल ! काय सांगतेस ग, तूं त्याच्या बरोबर इथं येईपर्यंत गप्पा केल्यास आणि..."

तिला पुढें न बोलूं देतां मी म्हटलं, "अगदीं खरं अनिता शपथ मला त्याचं नांव माहित नव्हतं."

नांवापेक्षां ते पिंगट डोळेच माझ्या जास्त लक्ष्यांत राहिले होते. पण ह्यानंतर ते मला कधींही दिसणार नाहींत अशी त्या क्षणाला कल्पनासुद्धां आली नाही. परंतु मानवी जीवनाचा डाव चमत्कारीक आहे हेच खरं.

त्या दिवशीं फिलॉसफीचा दुसरा तास असल्यामुळें मी जरा उशीरांच कॉलेज मध्यें गेलें. सायकल स्टॅन्ड मध्यें अडकविली; आणि पायऱ्या चढून कॉमन रूमकडे वळले. नेहमीप्रमाणेंच नोटीस बोर्ड समोर मुलींचे घोळके किलबिलाट करीत होते. पलीकडच्या विहीरीवर चारपांच मुली विविध विषयांवर नेहमी सारख्या गप्पा करीत असाव्या. कॉमन रूममध्यें फार तर दोडशे विद्यार्थीनी असतील पण पांच हजार लोकांच्या गर्दीत जेवढा गोंगाट ऐकूं येणार नाहीं तेवढा, कॉमन रूम समोरच्या व्हराड्यांत ऐकूं येत होता.

पण मला आश्चर्य वाटलं ते हे की नेहमींचे तुला लीला देसाई आवडते की काननबाला ? चाफेकरांच्या दुग्ध मंदिरांतला दोसा छान असतो की मद्रासी हॉटेल मधला ! जे कळून बसतं त्याला प्रेम म्हणतात की जे नकळत बसतं त्याला ! 'ह्या सारखे अनेक वादविवादांनी मिश्रित झालेले वाद न ऐकूं येतां कांहींतरी विलक्षण चमत्कारीक आवाज माझ्या कानांवर पडत होता, पलिकडच्या दारांजवळ उभ्या असलेल्या मुलीं म्हणत होत्या, "वा ! वा ! आपल्याच कॉलेजांत होता तो बिचारा किती देखणा होता ग दिसायला." तर टेबलाजवळ उभ्या असलेल्या घोळक्यांतून "अरेरे ! किती लहान वयांत गेला ग स्वर्गात." असे उद्गार निघत होते.

त्या कुणाविषयीं बोलताहेत ह्याचा मला कांहीं उलगडा होईना. कुणाला तरी विचारावं ह्या उद्देशानं मी पुस्तक टेबलवर टाकली. तेवढ्यांत बाहेर उभ्या

असलेल्या मुली " हे काय ग, सबंध दिवसाची सुट्टी द्यायला हवी होती; पण चला सुट्टी नाहींतर हॉलमध्यें शोकप्रदर्शनाची सभा तर आहे." असं म्हणत दारावरचा चिकाचा पडदा बाजूला करून आंत शिरल्या. त्यांच्या पैकीच एकीला मी म्हटलं, " काय भानगड आहे ? कुणां करतां सभा आहे हॉलमध्यें ? "

त्याबरोबर चॉकलेटी रंगाचं फुलांफुलाचं पातळ नेसलेली एक मुलगी म्हणाली, " अय्या ! तुला माहीत नाही. आपल्या कॉलेजचा ex-student तो आनंद साठे परवां विमानाच्या अपघातांत ठार झाला. "

तिचे ते शब्द ऐकतांच कांहींतरी विचित्र भावनेची लाट माझ्या मनांत सरकून गेली. एखाद्या तरूणाची आणि माझी आयुष्यांत फक्त एकदांच भेट घडावी आणि लगेच त्याच्या मरणाची बातमी माझ्या कानांवर यावी ह्यासारखी चमत्कारिक गोष्ट दुसरी कोणती असेल ? कदाचीत् त्याची अन् माझी भेट घडली नसती तर त्याच्या अपघाताचं अगर मरणाचं मला फारसं वाटलं नसतं. माझ्या भोंवतालच्या मुली जशा क्षणासाठीं हळहळत होत्या, तशीच मी देखील 'अरेरे ! बिचारा' असे उद्गार काढून नंतर ती गोष्ट विसरले देखील असते. पण आतां ती गोष्ट अशक्य होती.

एकच भेट कां असेना, पण त्या एका तासांत त्याच्याशीं मी जे जे काय बोलले होते ते सर्व परत माझ्या मनांत घोळूं लागलं, माझ्या मनांत आलं, केवळ एका भेटीसाठीं, एकाच तासांसाठीं तो माझ्या आयुष्यांत येवां आणि नंतर त्याच्या मरणाची बातमी ऐकून मला चुटपूट लागावी ही घटना किती चमत्कारिक होती.

मुलींच्या घोळक्यांत हॉलकडे जातां-जातां माझ्या मनांत आलं केवळ कांहीं तासां करतांच ह्याचा आपल्या आयुष्याशी संबंध होता काय ? की मनुष्याच्या नशीबांत अमुक घडलं पाहिजे असं लिहीलं असतं म्हणून केवळ त्या गोष्टी घडतात. किती विचित्र हे सारं ! त्याची आणि आपली पहिली भेट व्हावी, त्याच्या मरणाची आणि क्षणभर सहवासाची आठवण अखेरची भेट म्हणून राहावी असंच आपल्या नशीबांत लिहीलं असेल काय ? ह्या व्यक्तीची आणि माझी तेवढीही भेट घडली

नसती तर आतां मला त्याच्याबद्दल जितकी सहानुभूती वाटत होती तितकी खचीत वाटली नसती; पण त्याला माझी तेवढी सहानुभूती वाटावी, ज्या भेटीचा मी कधी विचार केला नसता त्या भेटीची आठवण मला आतां दीर्घकाल राहावी, आणि ती देखील पहिली आणि अखेरची म्हणून, अशी जर विधीघटना असेल तर-ती केवढी क्रूर म्हटली पाहिजे. हॉलमध्यें कॉलेजच्या ज्या विद्यार्थ्यांना बादशाही कमीशन मिळालेलं आहे, त्यांची नावं असलेला मोठा फळा टांगलेला आहे; त्या नांवाच्या यादींत त्याच्या नांवावर माझे डोळे खिळले की ती अक्षरं अस्पष्ट होत जाऊन त्या ठिकाणीं मला त्याचे दोन, टपोरे आणि हंसरे पिंगट डोळे दिसूं लाग तात पण त्यावेळी मात्र बाजूला नजर फिरवावी असं मला चुकूनही वाटत नाही, उलट डोळ्यांच्या कडा ओल्या होऊन दिसेनासं होई पर्यंत त्या पिंगट डोळ्यांकडे मी नजर लावते.

---

# शरद् ऋतूंतील संध्याकाळ....................४

( **मॅक्झिम गॉर्कीचा** परिचय कुणाला नाही ! 'आई' ह्या कादंबरीने गॉर्कीच्या साहित्यिक कीर्तीचा कळस गाठला. दारिद्र्यांतील क्षुल्लक पण उठावदार भावनांची पकड घेणारीं दृश्यें रेखाटण्यांत गॉर्कीची लेखणी किती कुशल होती, ह्याचा परिचय त्याच्या कादंबऱ्या वाचतांना तर येतोच, पण लघुकथा वाचतांनाही येतो. प्रस्तुत गोष्ट 'An Autumn Evening' ह्या लघुकथेचा अनुवाद आहे. दारिद्र्याच्या पार्श्वभूमीला निसर्गाची उत्तम जोड घालून ह्या उदासवदार परिस्थितींत भावनांचं किती मार्मिक आणि पकड घेणारं दृश्य गॉर्कीनं रेखाटलं आहे, ह्याचा प्रत्यय ही कथा वाचतांना खचित येईल. )

शरद् ऋतूंतल्या एका संध्याकाळीं मी मोठ्या विचित्र संकटांत सांपडलों. खिशांत एक कवडी नव्हती आणि गावांत कुठे रहावं म्हटलं, तर त्या ठिकाणीं मी नुकताच आलों असल्यामुळे मित्रांच्या घरीं उतरण्याचीहि शक्यता नव्हती.

पहिले कांही दिवस माझ्या जवळचें कपडे विकून मी कांही दिवस घालविले. नंतर त्या शहराचा युटसे नांवाचा एक छोटासा भाग होता, तिकडे गेलों. त्या ठिकाणीं जहाजांचे मोठमोठे धक्के होते. ज्यावेळीं त्या ठिकाणीं एखादं जहाज असे, त्या वेळीं तो सबंध भाग गजबजून गेलेला असावयाचा. परंतु आता आक्टोबरचे अखेरचे दिवस असल्यामुळे सगळीकडे शांत होतं. धक्क्याच्या अलीकडे खलाशी लोकांच्या करितां जीं तात्पुरतीं घरं बांधलेली होतीं, त्या घरांच्या जवळ उभं राहून अन्नाचे कण कुठे दिसतात का, हें मी शोधूं लागलों. माझ्या मनांत आलं, " भरलेलं पोट असणं ही किती सुखाची गोष्ट आहे !

देशाच्या अशा आर्थिक परिस्थितीमध्ये माणसाला एकवेळ अंतःकरणाची भूक भागवितां येईल, पण पोटाची ? तुम्हीं एखाद्या रस्त्यावरून जाऊं लागलांत, आजूबाजूला ज्यांची बाहेरची बाजू चांगली दिसते आहे अशीं घरं असलीं की, साहजिकच आंतलाहि भाग चांगला असला पाहिजे; असा तुमचा तर्क होतो. चांगले कपडे घातलेलीं माणसं तुम्हांला भेटतात, परंतु आमच्यासारखे लोक दृष्टीस पडले की, त्यांना टाळण्याकरतां तुम्हीं एका बाजूला होतां !

हलके हलके संध्याकाळ होत होती. पाऊस पडत होता. अंगावर शहारे उभे करील असा वारा उत्तरेकडून वाहत होता. रिकाम्या असलेल्या घरांच्या मधून, दुकानांमधून, हॉटेलच्या उघड्या खिडक्यांमधून 'सुंऽऽ' असा आवाज करीत तो आंत शिरत होता. वाऱ्याच्या त्या सोसाट्यामुळें नदीच्या लाटा वर उंच उसळून किनाऱ्यावरच्या वाळूवर आदळत होत्या. पाण्याचे पांढरे शुभ्र तुषार अंधारांत क्षणभर चमकून लगेच नाहीसे होत. किंबहुना, नदीलासुद्धा लवकरच येणाऱ्या हिवाळ्याची भीति वाटत असावी. आकाश गच्च भरलेलं होतं. आणि हळू हळू पाऊस जोरांत पडत होता. ज्यांचीं नुसती खोडं शिल्लक आहेत, अशा दोन विलो वृक्षांच्या--

मुळे त्या जागेची भयाणता आणखीच वाढली होती. त्या खोडांच्या बुंध्यांशी उलटी करून ठेवलेली एक होडी होती. त्या बोटीचा तळ फुटका होता. तळ फुटलेली बोट ज्यांचीं पानं हिवाळ्यांतल्या वाऱ्यानं हिरावून घेतलीं आहेत अशीं तीं जुनाट झाडं, —सगळंच जणूं काय मोडकं, उदास, भयाण ! आणि त्याच्याच भरीला आकाशहि अश्रु ढाळीत होतं. माझ्या आजूबाजूचा सगळा प्रदेश ओसाड होता. जणूं त्या सगळ्या थंड निर्जीव वस्तूंमध्ये जिवंत असा मीच काय तो होतों आणि माझ्याकरतांहि मृत्यु वाट पहात होता.

मी त्या वेळीं सारा सतरा वर्षांचा होतों. म्हणजे आयुष्यांतली फार चांगली वेळ।

त्या थंड ओलसर वाळूवरून मी चालत होतों. थंडीनं आणि भुकेनं माझे दांत करकर वाजत होते. अन्नाचा कुठंहि शोध लागत नाही असा विचार करीत मी एका पडक्या दुकानाजवळ आलों. आणि नवलाची गोष्ट ही की, त्या दुकानाच्या बाहेरच्या बाजूला एका स्त्रीची खाली वाकलेली अंधूक आकृति माझ्या दृष्टीस पडली. तिचे सगळे कपडे पावसानं ओले झाले असावे. पाण्याचे ओघळ तिच्या दोन्ही खांद्यांवरून खाली वाहत होते. तिच्या मागे उभं राहून ती काय करते हें पाहण्याचा मी प्रयत्न केला. दुकानाच्या फळीच्या खालीं ती दोन्ही हातांनी खळगा करीत होती.

मी थोडासा वाकलों अन् म्हटलं, " तूं कशासाठी करते आहेस हें ? "

माझा आवाज ऐकतांक्षणीच ती अस्पष्टपणे ओरडली. आणि उडी मारून बाजूला झाली. विस्फारलेल्या, घाऱ्या पण घाबरलेल्या नजरेनं ती जेव्हां माझ्याकडे पाहूं लागली, तेव्हा माझ्या लक्ष्यांत आलं की, ती माझ्याच वयाची आहे—आकर्षक चेहरा, पण त्यावर तीन डाग होते. त्या डागांच्यामुळे तिच्या चेहऱ्याला कांहीसी कुरूपता आली होती खरी. दोन डाग तिच्या दोन्ही डोळ्यांच्या खालच्या बाजूला होते आणि एक मोठासा डाग दोन भिवयांच्या मध्ये होता. त्या मुलीनं थोडा वेळ माझ्याकडे पाहिलं आणि मग तिच्या डोळ्यांतली भीति हलके हलके निघून

गेली. हाताची वाळू झटकली, डोक्यावरचा रुमाल नीट सरकविला आणि खांदे जरासे उंच करीत तिनं म्हटलं, "तुला सुद्धा भूक लागली आहे ना ? ठीक–हा खळगा पुढं खण तूं. माझे हात मघापासून थकले आहेत—" दुकानाकडे पाहून तिनं मान हलविली आणि पुढे म्हटलं—"त्या ठिकाणी अन्न असलं पाहिजे, तें दुकान अजूनहि उघडं आहे."

मी खणायला सुरवात केली. ती थोडा वेळ थांबली आणि मग मला मदत करूं लागली. आम्ही दोघंहि एक शब्द न बोलतां खणीत होतों. आपण कांहीतरी विचित्र करतों आहों, अशी कल्पना सुद्धा माझ्या मनांत आली नाही. हा खळगा खणतां खणतां आपल्याला काय सापडेल, ह्या विचाराखेरीज दुसरा कोणताहि विचार माझ्या मनांत नव्हता. संध्याकाळ संपून जिकडे तिकडे रात्रीचा दाट काळोख पसरला. लाटांचा आवाज कानांत शिरत होता. आणि पावसाचे शिंतोडे दुकानाच्या फळीवर ताडताड् वाजत होते.

"खाली दगड आहे का ?" तिने हलकेच विचारलं, ती काय विचारते आहे, हें मला कळलं नाही त्यामुळे मी कांहीच बोललों नाहीं.

"ह्या दुकानाच्या फळीच्या खालीं फरशी आहे का ? जर असेल, तर आपण उगीच खणीत आहों. समजा, आपण खणलं आणि आंतल्या बाजूला जर मोठी लाकडी फळी असली, तर ती बाजूला करून आंत कसं जायचं ? मी म्हणतें, कुलुप फोडाला काय हरकत आहे ? कुलुप फोडणं म्हणजे कांही फारशी कठीण गोष्ट नाही—"

उपयुक्त अशी कल्पना बायकांच्या डोक्यांत एखादे वेळींच येते. पण येते एवढं मात्र खरं. अशा कल्पना मला नेहमीच आवडतात आणि मी शक्य तोंवर त्यांचा भरपूर फायदा घेतों.

कुलूप सापडल्यानंतर तें फोडणं फारसं कठीण नव्हतं. त्याला एक झटका देऊन ठोसा दिल्याबरोबर दाराची फळी मागे झाली. माझ्या मागे उभं राहून तिनं म्हटलं,

" छान."

बायकांनी एखादा देखील स्तुतिपर शब्द उच्चारला, तर पुरुषांना त्याची फार मोठी किंमत वाटते. परंतु माझं त्याकडे बिलकुल लक्ष नाही, असं दाखवीत मी तुटकपणे पण काळजीच्या स्वरांत विचारलं—

" आहे का कांही ? "

मोठ्या उत्साहानं तिनं शोधायला सुरुवात केली.

बाटल्या ठेवलेला एक खोका, रिकाम्या पिशव्या, एक छत्री, एक लोखंडी घागर.

ह्यांपैकी एकहि वस्तु खाण्याची नव्हती. आज आपलं पोट कांही भरत नाही असा विचार माझ्या मनांत येतो न येतो, तोंच ती उत्साहानं ओरडली.

" सापडलं हं."

" काय ! "

" ब्रेड, एक मोठा तुकडा. थोडासा ओला झाला आहे—पण चालेल.हं,घे."

तिच्या हातांतून ब्रेड घेऊन त्याचा एक तुकडा मी तोंडांत टाकला आणि चघळूं लागलों.

" ए, मला दे की !—हें बघ आता ह्या ठिकाणी आपण राहतां कामा नये.

पण जायचं कुठं !"—त्या समोरच्या काळोखांत तिनं चारी बाजूला वळून पाहिलं .

"हं, चल. असं म्हणून आम्ही निघालो. जातां जातां ब्रेडचे तुकडे तोडून तोंडांत कोंबीत होतो. पाऊस आणखीच जोरांत येत होता. नदी मोठ्यांदा आरोळ्या ठोकीत पुढे जात होती. जणूं शरद ऋतूंतल्या ह्या भयाण, घाणेरड्या संध्याकाळचे आम्ही दोघं पराक्रमी वीर होतों. तुकडे चघळल्यामुळें माझ्या छातींत दुखूं लागलं होतं पण मी खाणं तसंच चालू ठेवलं होतं. ती देखील माझ्या डाव्या बाजूनं चालत तुकडे खात होती.

कां कोण जाणे, पण मी एकदम तिला विचारलं.

"तुझं नांव काय?"

चघळत चघळत तिनं म्हटलं "नॉटश्या."

मी तिच्याकडे पाहिलं. माझ्या अंतःकरणांत कळ आली. माझ्या समोर पसरलेल्या काळोखांत मी दृष्टि टाकली. मला वाटलं जणूं काय माझं नशींच थंडपणानं, उपहासानं माझ्याकडे पाहून हसत आहे.

× × ×

बोटीवर देखील पावसाच्या सरी जोरांत आदळत होत्या. त्या आवाजानं माझं मन खिन्न झालं खालच्या फुटक्या तळांतून वारा आंत शिरत होता. किनाऱ्यावर लाटा आदळत होत्या. त्या आवाजामुळें जिकडे तिकडे निराशा, दुःख आणि शोक पसरलेला होता, जणूं काय, ती सगळी परिस्थिति थकलेली होती; आणि ह्या सगळ्या भयाणतेंतून तिला पळ काढायचा होता. ओसाड वाळूवरून वारा सोसाट्यानं वाहत होता; आणि नदी शोक करीत होती!

त्या बोटीच्या खालीं आम्ही कसेबसे बसलों. आम्ही दोघंही पावसानं चिंब झालों होतों. बोटीच्या फुटक्यातळांतून थंड पाण्याचे थेंब आंत गळत होते आणि त्यामुळे विलक्षण थंडी वाजत होती. मला झोपायला हवं होतं. बोटीच्या कडेला पाठ टेकून नॉटश्या बसली. ऊब यावी म्हणून गुडघ्यावर तिने फुंकर घातली. त्यावर आपली हनुवटी टेकली; आणि समोरच्या नदीकडे ती पाहूं लागली. फिक्का चेहरा, खालचे डाग—ह्यामुळे तिचे डोळे विलक्षण वाटत होते. डोळ्यांची पापणी न हालवितां ती सारखी टक लावून बसत होती; त्यामुळे मला तिची भीति वाटली. तिच्याशी बोलावं, अशी खूप इच्छा झाली. पण कशी सुरूवात करावी, तें कळेना.

पण तिनेच सुरुवात केली.

जणू, मनाशीं कांही तरी ठरवून बोलल्यासारखे ती एकदम उद्गारली "वा! काय छान आयुष्य चाललं आहे!

असे उद्गार काढण्यापूर्वी तिने खूप विचार केला असावा आणि अखेरीस त्या विचारांचा असा निष्कर्ष काढला. तिचे उद्गार खोटे ठरविण्याचं मलाहि कांही कारण नव्हतं; म्हणून मी गप्प बसलों. मी तिथे बसलों आहे, ह्याची तिला मुळीच जाणीव नसल्यासारखी ती पुढं बोलूं लागली.

" खरंच, मला मरण येईल, तर किती बरं होईल ! "

तिने तसं कां म्हणावं, हें मला कळलं नाही. आयुष्याचा तिने खूप विचार केला असावा. ह्या जगांत आपलं नक्की स्थान कोणतं आहे, ह्याचा शोध घेतला असावा; आणि मग आयुष्यांत खरोखरच काय करतां येण्यासारखं आहे; असा विचार करतांना मरणाखेरीज आणखी काय शिल्लक आहे, असा विचित्र विचार मनांत येऊन ती तसं बोलली असावी ! परंतु तिचे ते शब्द ऐकून मला अतिशय वाईट वाटलं. आणखी कांही वेळ जर स्तब्धतेंत गेला असता, तर मला खात्रीनं रडूं कोसळलं असतं. एखाद्या स्त्रीसमोर पुरुषानं रडायचं म्हणजे किती विलक्षण! आणि तेंहि तिच्या स्वतःच्या डोळ्यांत पाण्याचा एक थेंबहि नसतांना! तेव्हा कांही तरी बोलावं, म्हणून मी म्हटलं. " कुणी मारलं तुला ? "

अगदी निर्विकारपणें तिने उत्तर दिलं, " तो सगळा पाशकाचा दोष होता. "

" पाशका म्हणजे कोण ? "

" माझा प्रियकर– "

" तो तुला नेहमी मारतो काय ? "

" होय ! जेव्हा जेव्हा दारू पितो, तेव्हा तेव्हा नेहमीच. " बोलतां बोलतां ती चटकन् माझ्या जवळ सरकली. आणि मग स्वतःबद्दल, पाशकाबद्दल दोघांचं नातं काय त्याबद्दल सगळ्या गोष्टी सांगायला तिनं सुरवात केली. ती एक वेश्या होती. आणि तिचा प्रियकर पाशक्–त्याच्या लालभकड मिश्या होत्या–आणि त्याला पेटी फार चांगली वाजवितां येत होती म्हणे—तो नेहमी किंमती कपडे वापरीत असे म्हणून ती त्याच्या प्रेमांत पडली आणि तो तिचा प्रियकर झाला.

एकदा असं नातं जोडल्यानंतर दुसऱ्या लोकांनीं तिला दिलेले पैसे दाबायचा धंदा त्यानं सुरू केला; आणि त्या पैशावर दारू पिऊं लागला. परंतु एवढ्यावरच थांबता, तर ठीक, पण अखेरीस तिच्या डोळ्यादेखत तो दुसऱ्या बायकांच्या नादीं लागला.

"ह्या गोष्टीचा मला राग येणार नाही काय? त्या बायकांच्यापेक्षा मी खचित वाईट नाही. तो निर्दय मला चांगला बनवितो आहे. काल मी त्याच्या घरीं गेलें, तर तो खुशाल दुसऱ्या कुणाबरोबर दारू पिऊन धुंद पडला होता। मी एकदम त्याच्यावर ओरडलें, 'पक्का दारूडा आहेस तूं–' तर त्यानें मला ठोकायला सुरवात केली! माझे केस धरून ओढले. मी काय करूं शकणार होतें? माझं नवं जाकीट सुद्धा त्यानं फाडलं..."–बोलतां बोलतां तिचा आवाज अस्पष्ट होत गेला आणि अखेरीस ती गप्प बसली.–

वारा आणखीच जोरांत वाहूं लागला. त्याचा थंडपणा अंगावर शहारे उभे करीत होता. माझे दांत वाजूं लागले आणि ती देखील थंडीमुळें कापूं लागली. ती अगदी माझ्याशेजारीं होती आणि अंधारांत सुद्धा डोळ्यांतली चमक मी ओळखूं शकत होतों.

"खरंच, तुम्ही सगळे पुरुष कसे पशु असतां! तुमच्यावर कधी दया करूं नये, असं वाटतं. तुमच्यापैकी जर एखादा मगायला टेकला, तर रागानं त्याच्या तोंडावर थुंकेन मी. तुम्ही म्हणजे भयंकर आहांत! स्तुती करतां, फसवितां, एखाद्या कुत्र्यासारखं पायाशीं घोटाळतां, आणि एकदा का तुमच्या मनासारखं करण्या-इतक्या आम्ही मूर्ख बनलों, की झालं, आमचं आयुष्य संपलंच! तुम्हीं अगदीं आमच्यावर उघड हल्ला करतां......तुमचा खरं म्हणजे कांहीं उपयोग नाही."

ती रागारागानें शिव्या देत होती खरी, पण तिच्यांत कांहीं शक्ति नव्हती. तिच्या तोंडांतून शब्द तुटकपणें बाहेर पडत होते. अगदी थंडपणें—त्यांत रागाचा त्वेष नव्हताच परंतु तरीहि त्या शब्दांचा माझ्यावर फार परिणाम झाला. एखादं दुःख

ऐकण्यापेक्षा तें प्रत्यक्ष डोळ्यासमोर दिसत असलं, तर त्याचा परिणाम नेहमीच फार खोल होतो.

मला अगदी संताप आला. थंडीचा तर आलाच होता, पण नॉटशाच्या शब्दामुळें आणखी कशाचा संताप आला होता कोण जाणे. मी स्वतःशीच कण्हूं लागलों.

तितक्यांत मला दोन छोट्याशा हातांचा स्पर्श झाल्यासारखा वाटला. एका हाताचा स्पर्श मानेला; आणि दुसऱ्या हाताचा चेहऱ्याला—त्याबरोबर अगदी मृदु, जिव्हाळ्याच्या स्वरानं तिनं विचारलं,

" काय झालं ? "

नॉटशा बोलत नसून दुसरंच कुणीतरी प्रश्न विचारतं आहे, असं मला वाटल. नुकत्याच तिनं पुरुषांना शिव्या दिल्या होत्या...पण तीच आता काळजीच्या स्वरांत विचारीत होती.

" काय झालंय अंऽऽ? थंडी वाजते काय ! किती लहान आहेस रे तूं ? एखाद्या भ्यालेल्या पाखरासारखा थरथर कांपतो आहेस—तुला थंडी वाजते आहे, असं कां सांगितलं नाहीस ? ये—झोप असा—मी सुद्धा निजतें—आणखी जवळ सरक, म्हणजे तुझ्या अंगांत ऊब येईल—ही रात्र कशी तरी काढायची आहे—इकडे बघ ! तूं सुद्धा पितोस काय ?—पण पीत असलास, तरी हरकत नाही. "

ती माझी समजूत घालीत होती आणि उत्साह देत होती. खरंच, मला धिक्कार असो ! खरं म्हणजे ह्यांत माझी काय वाईट परिस्थिति होती ? ज्या वेळी माणसाचं नशीब असं कां असतं, ह्या विषयीं मी विचार करीत होतों; सगळी सामाजिक व्यवस्था बदलून कशी टाकतां येईल, ह्याविषयीं मला स्वप्नं पडत होतीं;—राजकीय क्रांतीची मी दिशा ठरवीत होतों;—मी—ज्यानं कित्येक पुस्तकें वाचलीं होतीं—ज्याच्या विचारांचा त्या पुस्तकांच्या लेखकांना सुद्धा थांग लागला नसता—ज्या दिवसांत मी स्वतःला उत्साही, एक प्रेरक शक्ति बनविण्याचा प्रयत्न

करीत होतों,—आणि इथं एक दुःखी, भुकेली, कशाच्या तरी शोधांत असलेली, निरुपयोगी, जिला आयुष्यांत कांहीं स्थान नाही अशी;—मला खरोखर मदत करीपर्यंत जी मला मदत करूं शकेल, ह्यावर माझा विश्वास नव्हता;—आणि माझ्या मनांत असूनहि मी जिला मदत करूं शकलों नाही—

ठीक! जणूं हें सगळं स्वप्नांत घडत आहे, असं मी समजत होतों—कसलं तरी विचित्र स्वप्न, परंतु स्वप्न आहे, असं कसं म्हणूं! कारण पावसाचे थंड थेंब माझ्या अंगावर पडत होते. एका स्त्रीच्या स्पर्शामुळें माझ्या अंगांत ऊब आली होती तिचा श्वास माझ्या गालांवर पडत होता. ज्या श्वासांत व्होडकाचा अस्पष्ट वास येत होता–पण त्यामुळें उत्साह ही वाटत होतं......वाऱ्याचा 'सूं ऽऽ' असा आवाज कानांवर पडत होता; पावसाच्या धारा बोटीवर थाड्थाड् वाजत होत्या. लाटा किनाऱ्यावर आदळत होत्या. आणि आम्ही दोघं थंडींत कुडकुडत एकमेकांना चिकटून बसलों होतों. हें सगळं खरं होतं—पण ह्या गोष्टी प्रत्यक्ष सत्यसृष्टींत घडत आहेत, ह्यावर माझा विश्वास नव्हता.

मृदु आणि सहानुभूतिपूर्ण आवाजांत फक्त बायकाच बोलूं शकतात. नॉटशा बोलत होती, ती असल्याच आवाजांत. तिच्या प्रेमळ जिव्हाळ्याच्या शब्दांनीं मला किती तरी बरं वाटलं.—हृदय भरून आलं—

माझ्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. कांहीं तरी वाईट, कांही तरी मूर्खपणा, आणि ह्या रात्रीपूर्वी घडलेलं असं कांहीं तरी अनिश्चित–इत्यादि सगळ्या गोष्टी माझ्या हृदयांत एकदम उसळल्या. नॉटशा माझं समाधान करूं लागली, "किती वेड्यासारखं करतोस! पुरे कर पाहूं तुझं रडणं...छे, छे, तूं असं रडतां कामा नये. परमेश्वराच्या इच्छेनं तुझं सगळं कांहीं ठीक होईल–तुला चांगली जागा मिळेल.—"

माझ्या आयुष्यांत प्रथमच आलेल्या ह्या स्त्रीचा निकट स्पर्श—पण तो स्पर्श चांगला होता. कारण पुढे माझ्या आयुष्यांत ज्या ज्या वेळी स्त्रियांशीं वागण्याचे असे प्रसंग आले, त्या त्या वेळीं मला फार मोठी किंमत द्यावी लागली. आणि माझा स्वतःचा मात्र कवडीचाहि फायदा झाला नाही.

" कसा विचित्र मुलगा आहेस तूं ! कुठं जाऊं शकत नसलास, तर मी उद्या तुला मदत करीन." तिचे ते कोमल, सहानुभूतिपूर्ण शब्द सुद्धा कुठल्या तरी स्वप्नांत मी ऐकतों आहे, असं मला वाटत होतं.

प्रभात होईपर्यंत आम्ही दोघं तसेच बसलों होतों. दिवस उजाडल्यावर बोटीच्या खालून निघून शहरांत गेलों. तिथं एकमेकांचा निरोप घेतला. आणि, तेव्हापासून ह्या घटकेपर्यंत भेटलों नाही. जवळ जवळ सहा महिने, ज्या गोड नॉटशाच्या सहवासांत मी शरदृतूंतलि एक संध्याकाळ काढली, त्या नॉटशाला शोधण्यासाठीं सगळं शहर पालथं घातलं.

आणि, ती जर खरोखर मेली असेल-असेल, तर फार बरं झालं म्हणायचं. —तिच्या आत्म्याला शांति मिळो ! आणि, ती जर जिवंत असेल, तर—तिच्या हृदयाला सुख मिळो ! ती ज्या परिस्थितीला जाऊन पोचली होती. तिची तिला जाणीव न होवो—कारण, ती झाली, तर पुढच्या आयुष्यांत दुःख, वेदना—ह्या सेरीज आणखी काय आहे !...

# पृथ्वी गोल आहे..........................५

गाडी चालूं झाली तेव्हां डब्याच्या समोर जमलेल्या घोळक्यांतले एकेकांचे चेहरे अदृश्य होत गेले. त्यांनीं हवेंत उडविलेले हातरुमाल डब्याबाहेर किंचित् डोकावून पहाणाऱ्या अनुग्रहांना कांहींसे अस्पष्ट दिसले. त्यांच्या डोक्यावरच्या गांधी टोप्या ठिपक्याप्रमाणें भासल्या. गाडी झपाट्यानं प्लॅटफॉर्म सोडूं लागली. गाडीनं प्लॅटफॉर्मचा शेवटचा कांठ सोडला, त्या कांठावरून डब्याकडे झेंप घेणारा मोठा कुत्रा अनुग्रहांच्या दृष्टीस पडला. त्याचा मालक सांखळी ओढून त्याला परतवि-

ण्याचा प्रयत्न करीत होता. पण तो परत मागे वळून पाही. त्या गाडीत त्याची कुणीतरी आवडती व्यक्ति खास असली पाहिजे. येरवी गाडीकडे त्यानें एवढ्या उत्सुकतेनं झेंप घेतली नसती.

अखेर तो कुत्राही दिसेनासा झाला. स्टेशनच्या बाजूला केलेला छोटासा बगीचा झरकन् मागे सरकला आणि मग गाडी वेगानं धावूं लागली. अनुग्रह खिडकीपासून दूर झाले. बांकावर-बसून बसल्या बसल्या कां होईना पण विश्रांति घेण्याइतकी जागा त्या डब्यांत खचित् होती. आणि विश्रांतीची त्यांना खरोखरच जरूर होती. गेल्या दोन दिवसापासून ते कमालीचे थकून गेले होते. सारखी व्याख्यानं आणि कार्यक्रम. गेल्या दोन दिवसांत रात्री बारा, साडेबारा वाजल्या-नंतर सकाळीं साडेचारपर्यंत त्यांना जी झोप मिळाली असेल तेवढीच. एरवी त्यांच्या भोंवती कुणी ना कुणी तरी असायचंच. तुरुंगांत असतांना एकटं राहण्याचा त्यांना जो कंटाळा आला होता त्याची भरपाई आतां भरपूर होत होती. इतकी कीं हे सगळं सोडून-खरोखरच एकांतांत कुठंतरी निघून जावं असं अलिकडे त्यांच्या मनाला वाटूं लागलं होतं. आणि गेल्या दोन दिवसापासून तर त्यांच्या मनाची ही तिव्रता आणखीच वाढली होती.

गांधींचं अर्थशास्त्र ह्या विषयावर व्याख्यान देण्यासाठीं त्यांना मुद्दाम ह्या ठिकाणाहून निमंत्रण आलं होतं. परक्या गांवीं व्याख्यानासाठीं आलेली निमंत्रणं ते सहसा नाकारीत नसत आणि अलिकडे तर गांधींचं तत्वज्ञान सांगण्यासाठीं जितक्या संधी त्यांना चालून येत तितक्यांचा ते फायदा घेत—

आणि येतेवेळीं त्यांना जाणीवही नव्हती कीं, त्यांचं मन अस्वस्थ करून टाकणारी घटना ह्या दोन दिवसांत घडणार आहे. आणि ती घटनाही इतकी चमत्कारीक की, जिचा त्यांचा आयुष्यांशी किती निकटचा संबंध होता......

अनुग्रह आतां जागेवर येऊन बसले होते. त्यांचं सामान अगदींच थोडं होतं. खादीच्या मोठ्या पिशवींत त्यांनीं कपडे, दाढीचं सामान ठेवलं होतं. त्या पिशव्या त्यांनीं बाकाखाली ढकलल्या आणि हातांतला पुष्पहार; त्याचं काय करावं

तें त्यांना क्षणभर कळलं नाहीं; त्यांनीं दोन्हीं हातांनीं उचलून तो नाकाशीं नेला. ती पांढरी फूलं कसली होती कोण जाणे, पण त्यांना नीट सुवासहि नव्हता. वरून दिखाऊपणा पण आंत अंतःकरणाचा ओलावाहि नाहीं, अशा व्यक्तीसारखा तो हार त्यांना वाटला. देणाऱ्यांनीं तरी किती प्रेमानं दिला आहे कोण जाणे असा विचार मनांत येऊन ते किंचीत् हंसले आणि त्यांनीं वर मान केली, तोंच समोरच्या बांकावर कोपऱ्यांत बसलेला एक छोटासा मुलगा त्या हारांतील चमकणाऱ्या कलाबतूंच्याकडे कमालीच्या उत्सुकतेन पहात होता. कलाबतूंनीं शोभिवंत दिसणारा हार धरणाऱ्या अनुग्रहांचा त्याला कदाचित् मनांतून हेवाही वाटत असेल. त्याची दृष्टि वारंवार त्या हाराकडे आणि त्याच्या शेजारी बसलेल्या त्याच्या आईच्या चेहऱ्याकडे वळत होती. अनुग्रहांच्या बाकावर मळकटसं मुंडासं गुंडाळून बसलेला वयस्क माणूस कदाचित त्याचा बाप असेल.

त्या मुलानं दोनदा 'मायऽऽव' असा उद्गार काढून त्या हाराकडे बोट दाखविलं. पण तो हार आपल्या मुलाला देणं अगदीं अशक्य आहे हे ओळखूनच तिनं त्याला 'गप् नाहीं बसत का' असं म्हणून चूप बसविण्याचा प्रयत्न केला. अनुग्रहांना त्याची गंमत वाटली. ज्या हाराचं काय करावं असा त्यांना विचार पडलेला होता त्या हाराची किंमत त्या छोट्या मुलाच्या दृष्टीनं केवढी होती !

त्यांनीं त्या मुलाला हांक मारली. पण ज्याच्या हातांत हार आहे त्या माणसानं आपल्याला हांक मारली आहे ह्या गोष्टीवर त्याचा खरोखरच विश्वास बसला नाहीं. त्यानं गोंधळून आईच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. त्याच्या आईनं जेव्हां खरोखरच त्याला हात देवून खालीं उतरविलं तेव्हां भीत भीत पावलं टाकीत तो अनुग्रहांच्या जवळ आला. जणूं तो हार जवळून पहायला मिळाला तरी त्याला समाधान वाटणार होतं—

त्याच्या चेहऱ्यावरच्या त्या भावांचीं अनुग्रहांना गंमत वाटली. किती निष्पाप जीव होता तो ! आयुष्यांतल्या कोणत्याच दुःखाची झळ त्याला लागलेली नव्हती.

अनुग्रहांनीं त्याचा हात धरून त्याला जवळ ओढलं आणि तो हार त्याच्या हातांत दिला. स्वर्गीय आनंद गवसल्याचं चिन्ह त्याच्या चेहऱ्यावर झळकलं. जणू हा हार आपल्याला मिळणार आहे अशी त्याला स्वप्नांतसुद्धां शंका आली नसावी. अनुग्रहांनीं त्याच्या मस्तकावरून हात फिरवीत म्हटलं,

" तुझं नांव सांगतोस ? "

अनुग्रहांच्यावर तो कमालीचा खूष झालेला होता. त्यांनीं कांहींहि सांगितलं तरी ते करायची त्याची तयारी होती. त्यानं म्हटलं,

" शिवा "

अनुग्रहांना तो कमालीचा मुग्ध आणि निर्व्याज्य वाटला. त्यांच्या मनांत आलं; लहानपणासारखंच कदाचित् सरळ, कसलाहि संघर्ष उत्पन्न न होतां ह्याचं आयुष्य जाईल ? हे संघर्ष, बौद्धिकवाद, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या वेदना, विरह हे फक्त बुद्धिजीवि लोकांनाच जाणवायचे काय ?

त्याविचारांनीं त्यांचं मन अस्वस्थ झालं. किंबहुना ते अस्वस्थ होण्यासारखी भडक पार्श्वभूमि गेल्या दोन तीन दिवसांत घडली होती. हार घेऊन शिवा आपल्या जागेवर जाऊन बसला आणि विचारांनीं अस्वस्थ झालेल्या अनुग्रहांनीं खिड-कीच्या कडेला टेकून डोळे मिटले.

दोन दिवसांपूर्वी ते ज्यांच्याकडे उतरले होते त्यांच्या घरीं त्यांची ओळख नव्हती. ज्या समाजानं त्यांना आग्रह करून बोलाविलं होतं त्याचे हे सेक्रेटरी होते म्हणून अनुग्रह त्यांच्याकडे उतरले. त्यांच्या घरांत कोण कोण आहेत ह्याचीहि अनुग्रहांना जाणीव नव्हती. रात्रीं जेवतांना त्या गृहस्थाच्या मुलानं अनुग्रहांशीं आपण ओळख करून घेतली. तो एक उद्योन्मुख कवि होता. त्याच्या कवितांचा संग्रह लवकरच प्रसिद्ध होणार होता, हे त्याच्याच बोलण्यावरून त्यांना कळलं. अनुग्रहांना त्या दोन दिवसांत जेवढा जेवढा म्हणून रिकामा वेळ मिळाला तेवढ्या वेळांत तो अनुग्रहांशीं साहित्याबद्दल बोलला होता. त्याच्या बोलण्यावरून, विचारां-

वरून अनुग्रहांनीं अंदाज केला कीं ही स्वारी खरोखरच अति काव्यमय वृत्तीची स्वप्नाळु, भावनाप्रधान आणि प्रसंगानं भावनाविवश होणारी असली पाहिजे. खरो-खरच तो कविराज शोभत होता खरा—

पण हे गुण मानायचे कीं दुर्गुण ? कारण नेमक्या ह्याच गुणामुळें म्हणा, किंवा गुण कसले, ज्यांच्यामुळें त्यांच्या जीवनाच्या प्रारंभीच जी चमत्कारिक घटना घडली त्यांना गुण कसं मानतां येईल ! निदान अनुग्रहांचे विचार त्या बाबतींत एकमत होत नव्हते. त्या कवीच्या जीवनांत जी विलक्षण घटना घडली ती नेमकी अनुग्रह तिथें असतांना. मुक्कामाच्या दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं, अन् रात्री भरगच्च कार्यक्रम झाल्यामुळें ते अगदी थकून गेले होते. जेवण झाल्याबरोबर आतां कुणाशींहि चर्चा न करतां स्वस्थ झोपायचं असा त्यांनीं विचार केला. पलं-गावर पडण्यापूर्वी ते खिडकीशीं उभे राहिले. लिंबाच्या फांद्याआडून अस्पष्ट दिसणारी चंद्रकोर आभाळांत वर आली होती. बागेंत फुलांचा सुटलेला संमिश्र सुगंध रात्रीच्या त्या निस्तब्ध शांततेंत त्यांच्या मनाला फार प्रसन्न वाटला. इतका वेळ थकलेलं त्यांचं मन कांहींसं प्रसन्न झालं—आणि ते पलंगाकडे पावलं वळविणार तोंच खिड-कीच्या बाजूनं झुडपा पलिकडे कसलीशी कुजबूज चाललेली त्यांच्या कानावर आली.

ते किंचित् खिडकीबाहेर वांकले. बोलणाऱ्या व्यक्तीचा आवाज त्यांना स्पष्टपणें ऐकूं आला. त्यांपैकीं एक आवाज स्त्रीचा होता. "तूं म्हणतोस ते खरं. पण तुझी मैत्रीण म्हणून तुझ्या आयुष्यांत रहावं आणि पत्नि म्हणून तुझ्या जीविताचीं सूत्रं हातांत घेणं ह्या दोन गोष्टी फार वेगळ्या आहेत. म्हणूनच मला माफ कर—" दुसरा आवाज त्यांना कांहींसा भावना-विवश झालेला वाटला. अति अधिरतेनं ती व्यक्ति म्हणत होती, "माया, माया, किती कठोर आहेस ग तूं. तुझ्या माझ्या एकत्र जीवितावर मीं किती स्वप्नं रचली. ती सारी तूं धुळींत मिसळणार याचा जरा विचार कर आणि उत्तर दे ! खरोखर बुद्धीच्या आहारी जाऊन तूं इतकी निष्ठुर बनली असशील ह्याची मलों कल्पनाच नव्हती."

तो आवाज कुणाचा हे त्यांनीं ओळखलं होतं.

त्या स्त्रीचा आवाज पुन्हां त्यांच्या कानांवर आला, "माफ कर, मी आतां कठोर अंतःकरण केलं तरच आपल्या दोघांच्याहि सुखाच्या दृष्टीनें ते परिणामी मोलाचं ठरणार आहे. तूं आहेस इतका जर भावनाप्रधान, स्वप्नाळुवृत्तीचा नसतास तर कदाचित् तुझ्या आयुष्यांत कायमचं यायला माझ्या मनाची तयारी मी केली असती. पण तसा तूं नाहींस. तुझ्या आणि माझ्या मनोवृत्ती कमालीच्या भिन्न स्वरूपाच्या आहेत, त्या एकत्र आल्यातर कधींहि त्यापासून तुला अन् मला, दोघां-नाही सुख व्हायचं नाहीं; तूं अगदीं भावनेच्या आहारी गेला आहेस म्हणूनच स्थीर दृष्टीनं हा विचार करूं शकत नाहींस! विचार कर म्हणजे तुझं तुलाच कळून येईल!"

"माया अखेर तूं ऐकत नाहींस तर–!"

"नाहीं, नाहीं–माफ कर–!"

त्यांच्या मनांत विलक्षण कालवाकालव झाली. त्यांचा थकवा कुठल्याकुठें उडून गेला आणि मनांत एक विचित्र भावना वर उफाळून आली.

ते तसेंच खिडकीच्या चौकटीवर मस्तक टेकवून उभे राहिले! ह्या घटनेनं त्यांचं मन फार मागे जाऊन पोहचलं. त्यांच्या जीविताच्या ह्याच टप्प्यावर अशीच कलाटणी देणारी घटना घडली होती. ज्या व्यक्तीनं त्यांचं जीवित पूर्णपणें बदलून टाकलेलं होतं ती व्यक्ति ह्या क्षणी कुठें असेल कोण जाणे—

ही माया आणि अनुग्रहांच्या जीवितांत महत्वाचं स्थान पटकावणारी बागेश्री ह्या दोघींचीहि अंतःकरणं एकाच साच्यांतून घडविली होती कीं काय कुणास ठाऊक. दहा वर्षांपूर्वी बागेश्रीची जी भूमिका होती तीच भूमिका आज मायेनं पत्करली. ह्या दहा वर्षांत स्त्रीच्या अंतःकरणांत कसलाहि बदल झालेला नसेल-कीं स्त्रिया भावनेच्या भूमिकेवरून विचारच करूं शकत नाहींत? पुरुष ध्येय-निष्ठ आणि स्त्रिया व्यवहारनिष्ठ म्हणतात ते खरोखरच खरं मानायचं काय?

अनुभवाच्या दृष्टीनं पाहिलं तर ते खरं समजायला काय हरकत होती? माया आणि बागेश्री दोघींनीहि भावनेची भूमिका अजिबात सोडून केवळ विचार आणि वृत्ती जुळतील किंवा नाहीं हीच बौद्धिक भूमिका पत्करली होती–नाहीं कां?

बागेश्रीची ती ठेंगणीशी सांवळी व रेखीव नाक डोळ्यांची आकृति त्यांच्या समोर उभी राहिली. ती गोरी नव्हती, पण तिचा सांवळा वर्णच फार तेजस्वी होता. काळ्याभोर डोळ्यांची, प्रतिभाशाली, खानदानी घराण्यांत जन्मलेली आणि श्रीमंतीत नाजुकपणें वाढलेली बागेश्री त्यांच्या हृदयांत अगदीं मध्यभागीं सिंहासनावर जाऊन बसली होती. अंतर होतं ते त्यांच्या बौद्धिक पातळीत नव्हे-कारण तसं पाहिलं तर अनुग्रहच बागेश्रीपेक्षां कांकणभर जास्त बुद्धिमान ठरले असते, किंबहुना त्यांच्या बुद्धीच्या तेजानंच आकर्षित होऊन बागेश्री त्यांच्या जवळ आली होती नाही कां ?

मघाशीं गाडीच्या डब्याकडे झेप घेणारा तो कुत्रा त्यांच्या एकदम दृष्टीसमोर उभा राहिला. असल्याच एका देखण्या अन् विप्पाड कुत्र्याच्या मध्यस्थीमुळें अनुग्रहांची आणि बागेश्रींची ओळख झालेली होती. ससाच्या मागे धांवत सुटलेला तो कुत्रा बागेश्रीच्या रागावण्याला मुळींच न जुमानता अनुग्रहांच्या समोरून तिरासारखा धांवत सुटला होता-

बागेश्रीच्या त्या लाडक्या कुत्र्याला त्यांनी तिच्या हवाली केलं आणि ते स्वतःचं मन मात्र गमावून बसले.

आणि नंतर कित्येक संध्याकाळ त्या दोघांनीं चर्चा करण्यांत, गप्पा करण्यांत आणि परस्परांच्या स्वभावाचा परिचय करून घेण्यांत घालविल्या. आर्थिक परिस्थितींत आपण बागेश्रीपेक्षां फार दूर आहोत ह्याची त्यांना जाणीव नव्हती असंही नाही. त्यांनीं बागेश्रीला घरीं बोलावलं होतं, पण त्याबरोबरच ते म्हणाले होते,

"बागेश्री, आज माझ्या घरीं येतांना तुझी ही रेशमी साडी नेसून येऊं नकोस. खुर्चीवरची धूळ झटकायला माझ्या घरीं फडकेंसुद्धां सापडायचं नाहीं तुला."

बागेश्री हंसली. तिनं म्हटलं होतं, "तुम्ही साहित्यीक लोक अतिशयोक्ति अलंकार केव्हां वापराल ह्याचा कांहीं नेम नसतो, खरं ना !"

परंतु अनुग्रहांच्या घरीं गेल्यावर लक्ष्मी आणि सरस्वती ह्यांचं वास्तव्य एका ठिकाणीं होऊं शकत नाही हे बागेश्रीच्या लक्षांत आलं. अनुग्रहांच्या बोलण्यांत

अतिशयोक्ति नसेल असं नव्हतं. पण त्यांत सत्याची पार्श्वभूमि अधिक होती. दोन्ही खोलींत संसारोपयोगी वस्तूंपेक्षां पुस्तकांनींच अधिक जागा अडविली होती.

बागेश्रीच्या आणि आपल्या मनोवृत्तींची जोपासना फार भिन्न पार्श्वभूमिवर झालेली आहे ह्याची त्यांना जाणीव असूनहि राहवेना म्हणून त्यांनीं तिला मागणी घातली. अशाच एका संध्याकाळीं चंद्राची कोर आकाशांत नुकतीचवर आली असतांना–पण बागेश्रीनं म्हटलं होतं, " अनुग्रह,–तुमची मैत्रीण होणं जितकं भाग्याचं आहे तितकंच तुमची पत्नि होणं दुर्दैवीपणाचं आहे. जीविताची जबाबदारी मला घ्यायला नको असं नाहीं. पण तुमच्या व्यवहारिक सामर्थतेचा अंदाज घेतला तर त्या अंदाजांच्या चौकटींत माझ्या जबाबदारीच्या मर्यादा बसूं शकत नाहींत. अनुग्रह, तुम्ही खरोखरच खुप, खुप, मोठे आहांत, तिथपर्यंत माझी मनोवृत्ति पोहचूं शकत नाहीं. "

त्या रात्री कधीं नव्हे ते अनुग्रहांच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं होतं. बागेश्रीपासून दूर होतांना त्यांच्या जिवाची विलक्षण तडफड झाली.

पण त्यांनीं स्वतःला सावरलं. कांहीं कालानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. त्यांच्या सहचारिणीनीं त्यांच्या वेदना कमी केल्या. दोन हंसऱ्या मुलांनीं त्यांचं हृदय परत प्रसन्न केलं; आणि देश व सामाजिक कार्य ह्याच्यांत गढले जाऊन अनुग्रह बागेश्रीपासून पुष्कळच दूर गेले. जीवितांत एकत्र आलेल्या दोन व्यक्ती कांहीं कालानंतर आपापल्या रस्त्यानें गेल्या.

पण बागेश्रीची आठवण त्यांच्या हृदयांत इतकी खोल होती कीं, ती केव्हां उफाळून वर येईल ह्याचा नेमच नसे. बागेश्रीला तिच्या अंदाजाला योग्य चौकटींत बसविणारा नवरा मिळाला असेल आणि ती सुखांत रमली असेल अशी त्यांनीं आपल्या मनाची समजूत घातली. तिच्या आठवणीपासून आपलं मन दूर नेत·

त्यानंतर कित्येक दिवसांनीं एकदां असेच परगांवीं ते परत व्याख्यानासाठीं गेले होते. रात्रीचं व्याख्यान आटोपल्यावर पहाटेच्या गाडीनं ते परतणार होते. रात्री व्याख्यान संपवून ते घरीं परत गेले. तेव्हां साडे अकराचा सुमार झाला

होता. फराळ आटोपतांच ते सरळ झोपायला खोलींत गेले. अंथरूणावर पडले न पडले तोंच त्या घरांतल्या एका छोट्या मुलानं त्यांना उठविलं होतं.

त्यांनीं डोळे उघडले होते आणि म्हटलं होतं, 'कुणाचा निरोप आणला आहेस तूं ? मला झोपूं द्यायचं नाहीं असा बेत आहे काय तुझा ?'

त्या मुलानं ओशाळून म्हटलं, 'कुणीं बाई आल्या आहेत. तुम्हांला पांच मिनीटं तरी भेटायचंच असं म्हणताहेत त्या. पांच मिनिटं तरी भेटा आणि मग जायला सांगा त्यांना.' त्या मुलाचा युक्तिवाद त्यांना पटला म्हणा किंवा त्या बाईचं आपल्याकडे काय काम असावं ह्या उत्सुकतेनं ते खोलीतून उठून दिवाण खान्यांत गेले होते.

प्रथम त्यांनीं त्या स्त्रीला ओळखलं नव्हतं. खादीची निळी साडी परिधान केलेली आणि कांचेची एकेक बांगडी हातांत घातलेली, कांहींशी प्रौढ चेहऱ्याची. ती स्त्री पाहतां क्षणीच त्यांना ओळखता आली नाहीं.

परंतु ते आंत येतां क्षणीच तिनं त्यांना नमस्कार केला आणि हंसून म्हटलं होतं, 'माफ करा तुम्हाला उठवावं लागलं. पण तुमच्याशी एक अक्षर बोलल्या वाचून मला राहावेना. अनुग्रह खरंच खुप खुप मोठे झाला आहांत तुम्ही.

तो आवाज कानावर पडतांच त्यांनीं तिला चटकन् ओळखलं. वास्तविक पाहतां हर्ष भरीत होऊन त्यांनी तिचे हातच हातांत घ्यायचे पण त्यांनीं अत्यानंदानं म्हटलं होतं 'बागेश्री खरोखरच तूं आहेस कां ? किती वर्षांनीं, किती दिवसांनीं आज तूं माझ्या समोर उभी आहेस, ह्यावर माझा विश्वासच बसत नाहीं–बागेश्री ती नाजूक ठेंगणी, छोटीशी बागेश्री.'

तिनं हंसून म्हटलं होतं, 'तुम्ही खूप उंच झाला आहांत, अनुग्रह, पण मी मात्र जिथल्या तिथे आहे म्हणूनच तुम्हांला छोटीशी वाटते.'

त्यावर ते हंसले होते. त्यांची झोप तर कुठल्याकुठे पळून गेली. मनाचा आणि शरिराचा थकवा नाहींसा होऊन त्यांच्या गात्रांवर आणि मनावर ताजेपणाची टवटवी आली होती.

बोलतां बोलतां त्यांनीं म्हटलं होतं, ' बागेश्री; माझी अशी समजूत कीं तूं तुझ्या पतीसह भेटायला येशील.

बागेश्रीनं खिन्नपणानं उत्तर दिलं होतं, " कुणाचीहि पत्नी होण्यापेक्षां तुमची मैत्रीण म्हणून अविवाहीत राहणं माझ्या मनोवृत्तीला जास्त जमण्यासारखं आहे "

बागेश्री ! अनुग्रहांच्या मनांत आलं, स्त्रियांची जात खरोखरच इतकी हट्टी असते कां ? त्यांना मिळण्यासारखं असतं ते नको असतं आणि जे मिळण्यासारखं नाही ते हवं असतं. ह्या असल्या लहरी, त्यागी वृत्तीमुळेंच त्यांचं पुरुषाला कमालीचं आकर्षण वाटतं की काय कोण जाणे ! तो विषय त्यांनीं तिथंच थांबविला होता आणि मग सुखदुःखाच्या गप्पा करतां करतां त्यांनीं म्हटलं होतं. " बागेश्री ज्या ज्या वेळीं विलक्षण एकांताचे प्रसंग तुरुंगांत असतांना माझ्यावर आले, ज्या वेळा माझं जीवित धोक्यांत आहे असं मला वाटलं त्या त्या वेळीं मला तुझी अतिशय आठवण झाली. सुखाच्या प्रसंगापेक्षां दुःखाच्या प्रसंगींच मी तुला आठवत आलो आहे."

त्यांचे उद्गार एकून तिच्या डोळ्यांत पाणी चमकलं होतं. डोळ्यांतले अश्रु एकीकडे पुसतांपुसतां दुसरीकडे हंसून तिनं म्हटलं होतं, "अनुग्रह, तुम्ही माझी योग्यता खरोखर जाणली, या जाणिवेनं मला इतका आनंद झाला आहे कीं आपल्या आयुष्यांत आपण एक फार मोठे दुःख ओढवून घेतलं होतं ह्याची जाणीव मी आज पार विसरले. "

त्यांनीं विचारलं होतं, " कोणतं दुःख बागेश्री ? "

" छे, छे, ह्या आनंदाच्या प्रसंगीं मी तुम्हांला कांहींहि सांगायला तयार नाहीं दुःखाच्या प्रसंगी तुम्ही मला हांक मारता हीच जाणीव इतकी सुखाची आणि आनंदाची वाटते—"

बोलतां बोलतां तिला हुंदका आला होता— त्या शब्दांत तिच्या अंतःकरणांत केवढं दुःख सांठविलं होतं त्याची त्यांना चटकन् कल्पना आली होती आणि भारावलेल्या अंतःकरणानं त्यांनीं तिच्या मस्तकावर हात ठेवला होता—

बागेश्रीची आकृती हलके हलके अस्पष्ट होत जाऊन केवळ फक्त जिचे शब्दच कानांवर पडले आहेत; त्या मायेची आकृती त्यांच्या डोळ्यासमोर उभी राहिली. ती ही अशीच तेजस्वी बुद्धीची, हुषार, देंगणी अन् तडफदार मुलगी असेल काय ? आणि म्हणूनच कर्वे महाशयांच्या स्वप्नाळू आणि अतिभावना प्रधान वृत्तीसाठीं गृहीणीच्या मानाची जागा नाकरण्याची तिनं तयारी दाखविली असेल ?

बागेश्रीची आणि तिची त्याग करण्याची भूमिका कदाचित् फार वेगळ्या स्वरूपाची आहे; कदाचित् दोघींच्या वृत्तीहि कमालीच्या भिन्न असतील, पण मनाची ठेवण आणि अंतःकरणाचा धर्म ह्यांत फार फार साम्य आहे; ह्यांत कसलीहि शंका नाहीं ह्याबद्दल त्यांच्या मनाची पक्की खात्री झाली.

पण त्यांच्या मनाची खात्री होऊन काय उपयोग होता ? कदाचित् त्यांच्या आयुष्यांत जे प्रसंग आले, तेच त्या तरुणाच्या आयुष्यांत येतील. कठोर व्यवहारानं त्याची स्वप्नाळुवृत्ती कदाचित् बदलेलही. आणि मग अशीच कुठे तरी त्यांची आणि मायेची गांठ पडून... पण असे तर्क करण्यांत काय अर्थ होता ? कदाचित् असं घडेल किंवा घडणारहि नाहीं—पुढें तो तरुण त्यांना भेटेल किंवा नाहीं कोण जाणे.

पण आज तर ते त्यांच्या गांवीं परतत होते.

गाडी झपाट्यानं चालली होती. मोकळी जागा, दूरवर पसरलेली शेतं आणि शेतांच्या वरून वाहात येणाऱ्या गार वाऱ्यानं त्यांचं अस्वस्थ झालेलं मन कांहींसं ठिकाणावर आलं, त्यांनीं डोळे उघडून पाहिलं. तो त्या मुलाच्या हातांतला हार त्यानं कंटाळून बाजूला टाकलेला होता; हातांत सारखं धरल्यामुळें त्यांतली फुलं सुकलीं होती. पायाशीं हाराचा गुंडाळा टाकून मांडीवर डोकं ठेवून तो स्वस्थ चित्तानं झोपी गेला होता.

जीवितांत एके काळीं आपलं आकर्षक ध्येय, अशी वाटणारी गोष्ट मनुष्य अशीच अखेर कुठं तरी ठेवतो. आणि स्थिर वृत्तीनं त्यांकडे पाहून विचार करतो. ह्याचं तत्वज्ञानाकडे अखेर वळायचं कां कोण जाणे—

खिडकींतून आंत आलेली गार वाऱ्याची झुळुक इतकी थंड होती कीं अनुग्रहांच्या थकलेल्या डोळ्यांच्या पापण्या आपोआप मिटल्या.

# भावीचं माहेर........................................९

चंद्रपार्क समोरच्या पांढऱ्या दुमजली घरांत राहयला आल्यापासून मदनच्या आनंदाला पारावारच उरलेला नव्हता. घर खुप छान होतं हें तर खरंच पण त्या घरांत तो आणि मोहनभय्याच फक्त पूर्वीसारखें राहणार नव्हते. तर ह्यावेळीं मदनची भावीही आलेली होती. नाहींतर ह्यापूर्वी त्या दोघानींच कुठं तरी दोन तीन खोल्यांत राहयचं, मोहनभय्या अभ्यासासाठीं कॉलेजांत जात असे, संध्याकाळीं तो क्लब मध्यें जाई नाहींतर पुस्तक वाचीत आपल्या खोलींत एकटाच बसून राहयचा आणि दिवसभर अभ्यास आणि शाळा ह्याला कंटाळलेला मदन मधल्या खोलींत खुर्चीवर डुलक्या अन् जांभया देत पडून राही.

परंतु आतां सगळंच कांहीं बदललं होतं. मोहनभय्याचा अभ्यास संपला. तो त्याच्याच कॉलेजांत शिकवूं लागला. पूर्वीचं दोन तीन खोल्याचं घर जाऊन पांढऱ्या मोठ्या दुमजली घरांत ते राहयला आले. एवढं नव्हे तर त्यांच्याबरोबर भाचीही आली. इतके दिवस घरांत मदन आणि मोहनभय्या शिवाय दुसरं कुणीही नव्हतं पण ही तिसरी व्यक्ति भाची—मदनला कमालीची आवडली.

तिचे ते गोरेपान नाजुक हात, ठुमकत चालायची तऱ्हा—माथ्यावरचा पदर किंचित् पुढे ओढून ओठांत हंसत बोलण्याची, पद्धत सगळंच कांहीं त्याला मनापासून आवडलं आणि सोळा वर्षांच्या त्या नव्या भाचीवर तो बेहद्द खुष होऊन गेला. शाळेंत जाण्यापूर्वी आणि शाळेंतून आल्यावरही तो सारखा भाचीच्या मागें असे—आणि भाचीचंही मदनभय्याशिवाय होत नसे.

मात्र आपल्याशीं इतकी छान वागणारी भाची मोहनभय्याशीं कां नीट वागत नाहीं, ह्याचा त्याला कधीं कधीं प्रश्न पडे—केव्हां केव्हां त्याला मोहनभय्याचाच राग येई—कॉलेजांतून आल्यावर चहा झाला कीं मोहनभय्या वर जाऊन वाचीत बसत.—

इकडे खालीं खुर्चीवर बसलेली भाबी दोन्ही हातांनीं आळस देत म्हणे, "मदनभय्या, काय कंटाळा आला आहे पहा—"

मदन चटकन् म्हणे "पत्ते खेळायचे भाबी ?"

पण भाबीनं नकारार्थी मान हलवावी अन् म्हणावं "छे, पत्ते खेळायचा कोण कंटाळा आहे मला. माझ्या माहेरीं मी होते तेव्हां रोज संध्याकाळीं बॅमिंन्टन खेळायला जात असे—पण ह्या घराची तऱ्हाच कांहीं वेगळी आहे." भाबीच्या बोलण्याचं मदनाला आश्चर्य वाटून तो म्हणे "तऱ्हा वेगळी आहे म्हणजे ग काय भाबी ?"

"अरे तऱ्हा वेगळी म्हणजे कुठं जायचं नाहीं, यायचं नाहीं, तुझ्या भय्यांना तर पुस्तकांशिवाय दुसरं कांहीं सुचत नाहीं, आणि मला तर पुस्तकांचा कोण कंटाळा—"

"म्हणजे मग भाबी; तूं अभ्यास कशी करीत होतीस ?"

भाबीनं हंसून म्हणावं, "अभ्यास ! माझी इंग्रजी पांच पुस्तकं झाल्यावर ह्या पुस्तकांना कंटाळून मी अभ्यास सोडून दिला. आपल्या उत्तर हिंदुस्थानी लोकांत मुली इतक्या शिकतातच कुठें ? आणि खरंच कशाला हवं तें शिकणं—"

भाबीचं म्हणणं मदनला अर्थातच पटत नसे. भाबी कमालीची आळशी आहे हें त्यानं पाहून ठेवलं होतं. शेगडीवर उकळत ठेवलेल्या दाळींतलं पाणी संपूनही जाई तरी मागच्या दाराशीं निवारींच्या दिदीशी गप्पा मारण्यांत गुंग असलेल्या भाबीला त्याची दादही नसे. मोठांदा हांक मारली तर वर असलेल्या भय्यांना ऐकूं जाईल म्हणून भाबी जवळ जाऊन हलकेच मदन तिला म्हणे, "भाबी, दाळ खाली लागली बघ."

परंतु भाबी, "आलें, आलें, दाळींत थोडं पाणी घाला मदन भय्या," एवढं म्हणून दाराच्या चौकटीवर हात ठेऊन हंसतां हंसतां अपुरं राहिलेलं वाक्य पुरं करीत असे. आपल्या भाबीवर भय्या रागवेल ह्या भीतीनं मदन दाळींत पाणी घाली—परंतु कित्येकदां भाबीचा स्वयंपाक बिघडून जाई——जेवतांना भाजीचा

घास तोंडांत घालतांच मीठ त्यांत नाहीं अगर तीं करपली आहे असे पाहतांच एकदां मोहन भय्यानं रागावून म्हटलं, " अजून स्वयंपाक सुद्धां करतां येत नाहीं तुला ?"

त्याच्या रागाच्या स्वराला बिलकुल न घाबरतां भावीनं उत्तर दिलं, ', तुनच्याच घरीं आल्यापासून शिकायला लागलें मी. माझ्या माहेरीं मला स्वयंपाक करायची बिलकुल संवय नव्हती."

भावीचं हे बिनतोड उत्तर ऐकून मोहनभय्या रागानंच ' अस्सं ' असं म्हणून गप्प बसले आणि थोड्या वेळानं परत म्हणाले, " मग तुझ्या वडिलांनीं आपल्या सारखाच खुप श्रीमंत आदमी पाहून द्यायची होती तुला—माझ्या घरीं स्वयंपाक करावा लागेल हे काय त्यांना माहीत नव्हतं ?"

परंतु ह्याही उत्तरावर भावी गप्प बसली नाहीं. रागावलेल्या मोहनभय्यांना भावी कशाला उत्तरं देते आहे असं राहून राहून तिथं बसलेल्या मदनच्या मनांत येई.

कारण भावी म्हणाली, " त्यांना माहीत होतं कीं नाहीं हे मला काय माहीत ! तुमच्या पुस्तकांच्या विद्वत्तेवर खुष होऊन त्यांनीं माझं तुमच्याशीं लग्न करून दिलं."

भावीचं हें उत्तर ऐकून मोहनभय्याला मनांत काय वाटलं असेल ते मदनाला अर्थातच कळण्यासारखं नव्हतं पण त्याच्या मात्र मनांत झालं कीं मोहनभय्याचं आणि भावीचं लग्न झालं तें काय वाईट झालं ? इतकी छान भावी मिळाली ना मला ?

मदनला पुष्कळदां वाटे, मोहनभय्या रागीट आहे खरा पण भावीला तरी गप्पांची काय कमी हौस आहे ! शिवाय भावी; सारखं "माझं माहेर, माझं माहेर" म्हणत. असे तेंही त्याला आवडत नसे. आपलं इतकं छान मोठं घर असतांना भावीला माहेर कां आवडावं कोण जाणे. एक दिवस त्यानं भावीला म्हटलं.

" तुझं माहेर इतकं आवडतं होय तुला ? "

आपल्या माहेराची एवढ्या आस्थेनं चौकशी करणारं अखेरीस घरांत कुणी तरी आहे असं पाहून भाभीनं आनंदानं म्हटलं, "माझं माहेर! ओ हो, मदन-भय्या, माझं माहेर इतकं छान आहे."

परंतु मदनाला तिचं बोलणं फारसं आवडलं नाहीं. त्यानं किंचित नाराजीच्या स्वरांत म्हटलं, "खुप छान, म्हणजे आपल्या ह्या घरापेक्षांही?" त्याच्या त्या बोलण्यावर भाभीनं आजूबाजूला पाहून कपाळाला थोड्या आंठ्या घातल्या अन् म्हटलं, "छे, हें कसलं घर! हे तर भाड्याचं. माझ्या माहेरी आमच्या दद्दांचा मोठा बंगला आहे. खुप मोठा बगीचा अन् ह्या खोलीच्या दुप्पट एकेक व्हरांडा. मला एकटीलाच तीन खोल्या होत्या, अन् ह्या घरांत पहावं तर..."

"पण भाभी, ह्या घरांत सुद्धां तुला एक खोली आहे--" भाभीनं नाक मुरडून म्हटलं, "शी! ही कसली खोली, ह्याला काय कमरा म्हणायचं! साधी चार भिंतीची खाली"—"खोली भिंतीची नसते तर आणखी कशाची असते", असं विचारावं असं एकदां त्याच्या मनांत आलं. पण भाभीनं कांचेच्या पार्टीशन वगैरेंनीं सुन्दर सुसज्ज अललेल्या खोलींचं वर्णन जेव्हां त्याच्यापुढें सुरूं केलं तेव्हां तो गप्प बसला.

भाभीचं एकदां वर्णन सुरू झालं म्हणजे ते कांही केल्या थांबत नसे. हा अनुभव मदनाला पुष्कळदां आला होता. शेजारच्या तिवारींच्या घरीं दुपारीं गप्पा करायला ती जात असे, आणि घड्याळाचा कांटा पुढें सरकला तरी घरीं यायचं भान तिला उरत नसे. अशा वेळीं मोहनभय्या कॉलेजांतून एखादे वेळीं लवकर आले तर भाभीचा घरीं पत्ता नसायचा. मोहनभय्या त्याला जितका आवडत होता तितकीच, भाभीहि आवडत होती. आपल्या मोहनभय्यानं भाभीवर रागावूं नये म्हणून तो स्वयंपाक घरांत चटकन् स्टोव्ह पेटवून सुरू करी–जणू बाहेरून आलेल्या मोहनभय्याला वाटावं भाभी आंत चहाची तयारी करते आहे—मोहनभय्याचे बुट काढून होण्याच्या आधीं तो मागच्या दारानें तिवारींच्या घरीं पळत जाऊन भाभीला म्हणे, "भाभी उठ, भय्या आले कॉलेजांतून."

आणि मग जमिनीवरचा किल्ल्यांचा जुडगा हातांत उचलून घेत तिव-रीच्या दिदीकडे पहात हंसत हंसत भावी म्हणे, " पहा, हे आले की; आलं बोला-वणं. एक दिवस स्वस्थपणानं गप्पा करीन म्हटलं तर कांहीं जमत नाहीं दिदी."

परंतु भावीच्या ह्या रोजच्या गप्पा कधीं न संपणाऱ्या असत हे मदनला पुरतं माहीत होतं. मात्र बोलवायाला तो आपण होऊन आला होता; हें मात्र तो भावीला कधीं सांगत नसे.

भावी आंत यायची; तों स्टोव्हवर आंधण उकळून चाललं आहे, साखरेचा आणि चहाचा डबा स्टोव्हजवळ तयार आहे असा थाट तिच्या दृष्टीस पडायचा. आंत आलेल्या मदननं गडबडीनं तिला म्हणावं, " भावी, आटप, आटप लवकर. आतां भय्या खालीं येतील. मी कपबश्या मांडतो टेबलावर. तोंपर्यंत चहा टाक तूं."

भावीला बोलणीं बसूं नये असा हा मदनचा खटाटोप एक दिवस व्यर्थ गेला. त्या दिवशीं अपेक्षेपेक्षां लवकरच भय्या घरीं आला. त्याचें डोकं दुखतं आहे हें ही मदनला कळलं. परंतु करायचं कसं ? भावी तर घरांत नव्हती. दिदी आणि भावी मिळून शुक्लांच्या घरीं केरम खेळायला गेल्या होत्या. आणि शुक्लांचं घर तर दूर होतं. नेहमीप्रमाणें भावी घरांत आहे असं भासविणं मदनला ह्यावेळीं अशक्य होतं, त्यामुळें भावी घरांत नाहीं हे त्याला सांगावंच लागलं. कपाळावर आंठ्या घालून मोहननं म्हटलं, " घरांत नाहीं म्हणजे गेली कुठं ?" मदननं हलकेच उत्तर दिलं ' शुक्लांच्या घरीं."

" रोजच दुपारीं ती बाहेर जाते नाहीं. ?"

" अं ऽ ?" एवढंच म्हणून मदन गप्प बसला. भावीला बोलणी बसूं नये म्हणून त्याचा सगळा खटाटोप व्यर्थच गेला होता तर एकूण.

चहा घेऊन मोहन वर जाऊन झोंपला. भावी घरीं आली; तेव्हां मदन एक-टाच खालीं वाचत बसलेला होता. मोहनभय्या मघाशींच कॉलेजांतून आला आहे आणखी त्याचं डोकं दुखतं आहे हे मदननं तिला सांगितल्यावर ती वर गेली—

परंतु मोहनभय्याचं रागारागाचं बोलणं त्याला ऐकू आलं—आणि भाचीचाही स्वर त्याच्या कानांवर पडला. मोहन म्हणत होता, " रोज दुपारीं पहावं तर तूं बाहेर असतेस. घराची शुद्ध असते कां तुला ? "

भाचीनं उलट उत्तर दिलं, " सारा सकाळ अन् संध्याकाळचा माझा वेळ तुमच्या घरीं स्वयंपाकांत जातो. दुपारीं मी बाहेर गेली तर बिघडतं कुठं ? "

" तुमच्या घरीं ! म्हणजे हें घर तुझं नाहीं कां ? "

" असं कां म्हटलं मी ! पण माझ्या माहेरीं सारी सकाळ अन् संध्याकाळ मला मोकळी मिळत असे—ह्या इथं पहावं तर..."

मदनाला नक्कीच वाटलं होतं की भाची माहेरचा उल्लेख करणार आणि भाचीनं तो केलाही—परंतु मोहनभय्या त्यामुळें इतका रागावेल अशी मात्र त्याची कल्पना नव्हती—एवढंच नव्हे तर त्यांच्या भांडणांत मोहननं; त्याला एकदम हांक मारलेली ऐकूं आली.

" मदन, एक टांगा घेऊन ये. "

मदनच्या मनांत आलं. " टांगा ? कशासाठीं ? "

" उभा काय राहलास ? टांगा घेऊन ये म्हणतो ना ! असे मोहनभय्याचे शब्द ऐकल्यावर त्यानं हळूच म्हटलं.

" पण भय्या टांगा कुणासाठीं आणायचा ? "

" तुझ्या भाचीला माहेरीं पोहचवून ये. तिला आपल्या घरापेक्षां माहेरच जास्त आवडतं. "

परंतु भाचीनं जावं अशी मदनाची कुठें इच्छा होती ? भय्याचा हा राग फार वेळ गह्याचा नाहीं हें तो जाणून होता. त्यानं भाचीकडे नजर टाकली तो तिचेही दोन्ही गाल रागानं फुगले होते.

तिथं उभं राहण्यांत अर्थ नव्हता. आपण बाहेर जातो आहे असं दाखविण्याकरतां तो समोरच्या फाटकानं बाहेर पडला आणि मागच्या दारानं येऊन स्वयंपाक घरांत भिंतीशीं पाटावर बसला.

जरा वेळानं भावी आंत आलेली त्याला दिसली. भावी त्याच्या पेक्षां तीनच वर्षांनीं मोठी होती. भावीचा गप्पा मारण्याचा स्वभाव सोडला तर सदा हंसत खेळत त्याच्याशीं वागणारी भावी त्याची अतिशय लाडकी होती. आंत येतांच भावीनं दुसरा पाट उचलला आणि समोरच्या भिंतीला टेकून बसली. तिचा राग अजूनही कमी झालेला नव्हता. तिचे अश्रूंनीं भिजलेले डोळे मदनाच्या नजरेंतून सुटले नाहींत.

त्यानं म्हटलं, " भावी, मला चहा हवा आहे. "

भावीनं उत्तर दिलं, " करून घ्या हातांनीं. "

" ठीक आहे, मी शेगडी पेटवितो. तूं आंधण तर ठेवशील ना? चहा किती टाकायचा तें मला जमत नाहीं—"

मदनच्या अपेक्षेप्रमाणं भावी अखेरीस उठली. हां हां म्हणतां चहा तयार झाला.

चहा घ्यायला मदननं मोहनभय्याला हांक मारली तेव्हां त्याचं डोकं दुखणं कमी झालं होतं. रागाची ज्वाला बरीचशी विझत आली होती. म्हणूनच चहा सर्वांनांच गोड लागला. तरीही मोहननं विचारलं, " मघाशीं टांगा आणायला गेला होतास ना? "

मदननं म्हटलं, " हो, पण स्टँडवर एकही टांगा नव्हता. " त्याचं उत्तर ऐकून मोहननं खिडकीबाहेर दृष्टि वळविली आणि बशी ओठाना लावतां लावतां भावीच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर झळकली. परंतु आपल्या माहेराचं नांव काढलं कीं नवऱ्याच्या पोटांत कां दुखतं ह्याचा सोळा वर्षांच्या अल्लड भावीला कांहीं केल्या उलगडा होईना. मोहनपेक्षां आपलंच चुकतं आहे, ह्याची जाणीव तिच्या मनाला

नव्हती. त्याचा आपल्या माहेरावर उगीचच राग आहे एवढी अढी मात्र तिच्या मनांत पक्की बसली होती. म्हणूनच चहा पितांना एक दिवस ह्या माहेरावरून मोहनचं आणि तिचं परत भांडण झालं.

भावीनं स्पष्टपणें म्हटलं, "माझ्या माहेरचें नांव एवढं कां तुमच्या पोटांत खुपतं!" मोहननं रागारागानं म्हटलं "माझ्या कशाला पोटांत खुपेल? तुझ्या माहेराची तुला एवढी घमेंड आहे तर चालती हो ह्या क्षणीं."

भावीनंही रागारागानं उत्तर दिलें, "हो, होते चालती—तुम्हांला नकोशी झालें आहे तर माझं तरी इथं राहायला काय अडलंय?"

ह्यावेळीं मात्र मोहननं टांगा आणून तिला पोचवून दिलं.

भाची गेल्यामुळें मदनला कांहीं चैन पडेना. भावीची चौकशी करावी म्हटलें तर मोहनभय्या तिला पत्र लिहीत नव्हता आणि भाचीचंही पत्र नव्हतं.

अखेरीस मदननंच भावीला एक पत्र लिहीलं. "भावी मला आणि भय्याला तुझी खुब आठवण येते. तूं केव्हां येणार परत?"

आणि एक दिवस भावीचं उत्तर आलं. "मदनभय्या, माझ्या माहेराला कंटाळले मीं, तुमच्या सारखा गोड भय्या आणि नेहमी रागावणारे तुझे मोहन भय्या नसल्यामुळें मला खुप चुकल्यासारखं वाटतं. तुझ्या भय्यांना खरंच माझी आठवण येते कां?"

भावीचं पत्र पाहून मदनला कोण आनन्द झाला. त्यानं तें मोहनला दाखविलं, आणि म्हटलं, "भावीला आणायला जाऊं ना मी?"

भावीच्या माहेरीं पोहचतांच मदननं तिला म्हटलं, "भय्या तुझी खुप आठवण काढतात. तुझ्या वांचून त्यांना करमत नाहीं म्हणून तर न्यायला आलों मी."

भावीनं उत्साहानं म्हटलं, "खरंच कां रे मदन भय्या, मला सुद्धां इथं आल्यापासून चैन पडेना; वाटतं तुझे भय्या रागवेना कां पण त्याचं रागावणच मला

गोड वाटतं. इथं माझा कांहीं केल्या वेळ जाईना—तिकडे सकाळ अन् संध्याकाळ कशी चटकन् निघून जात होती—" मदन हंसला. त्याला वाटलं आपली भावी एकूण बदलली तर—

त्यांचा टांगा जेव्हां घरांत शिरला तेव्हां मोहनभय्या बाहेर वर्तमान पत्र वाचीत बसला होता. टांग्यांतून जवळ जवळ उडी मारीत मदननं म्हटलं, "भय्या! भावी आली पहा;" आणि मग पायऱ्या चढणाऱ्या भावीकडे वळून त्यानं म्हटलं, "खरंच भावी, तुझ्या शिवाय मला अन् भय्याला बिलकूल करमत नव्हतं."

भावीनं खालीं वांकून मोहनच्या चरणांना स्पर्श केला आणि मग हंसून मदनाला म्हटलं. "खरंच मला सुद्धां तुमची फार आठवण होऊन; केव्हां येईन असं झालं होतं—"

मोहनची आणि तिची दृष्टादृष्ट झाली. मोहनचे डोळे उत्सुकतेनें विचारीत होते, 'खरं कां हें ?'

मदननं बाहेर दृष्टि टाकली तो बाहेर या निळ्या आकाशांत दोन पतंग वाऱ्याच्या लहरींवर मोठ्या वेगानं अगदीं जवळून वर चढत होते.

---

# वठलेला वृक्ष.........................७

सरलेच्या तोंडून ते शब्द ऐकताच वामनच्या हातांतला घास तसाच राहिला; आपल्या मनांतला राग आवरणं त्याला अगदीं अशक्य झालं. हात तसाच खालीं ताटांत ठेवून सरलेकडे रोखून पाहात त्यानं म्हटलं, "काय म्हणालीस?"

सरलेनं वर पाहिलं नाही. पोळी तशीच लाटत तिनं उत्तर दिलं; "परत काय बोलायचं ? अन् बोलायला भीति तरी मेली कसली ? जे दिसतं आहे तेंच बोलतें आहे–"

"मग बोल की–"

"म्हणते ना की लग्नाच्या आधी पुरुषाच्या स्वभावाचा अंदाज लागत नाही हेंच खरं !

"अस्सं !" असं म्हणून वामननं हातांतल्या घासाशीं चाळवाचाळव केली. हे असले शद्ब ऐकण्याची त्याची ही कांहीं पहिलीच वेळ नव्हती. असंच कांहीतरी घडावं, ऐन जेवणाच्या वेळीं सरलेनं तें सगळं काढावं अन् मग कांहीतरी खटका उडून वामननं पानावरून उठून जावं ! अशा वेळीं तो पुष्कळदा शांतपणानं वागे; पण एखादे वेळीं सरलेच्या वागण्याचा अतिरेक त्याला असह्य होई आणि मग विचार करायला लागलं की आपलं वागणं मुळांतच चुकलं असं वाटून त्याचं मन खिन्न होई.

त्याचा आणि सरलेचा आता चांगलाच खटका उडणार हें त्याला स्पष्ट दिसत होतं. ..पण तो प्रसंग टाळवा अन् राग शांत व्हावा म्हणून कांही वेळ तो तसाच स्तब्ध राहिला. आपल्या तोंडून भलताच शद्ब बाहेर पडणार नाही अशी खात्री झाल्यावर किंचित् उपरोधाच्या स्वरांत त्यानं म्हटलं,

"अन् बायकांच्या स्वभावाचा तरी कुठं अंदाज लागतो ? ज्याच्यावर सतत सत्ता गाजवून मुठींत ठेवायला पाहिजे असा नवरा तुला हवा होता; हें जर मला आधींच माहीत असतं, तर तुझ्याशीं कशाला लग्न केलं असतं मीं ? मला व्यक्तित्व हवं म्हणून ध्येयाशीं समरस झाल्याच्या तुझ्या दिखाऊपणाला मीहि फसलों. मी तुझ्याशीं लग्न केलं नसतं तर हे असले प्रसंग येऊन नवऱ्याच्या स्वभावाचा अंदाज लागत नाही असं म्हणायची पाळीहि तुझ्यावर आली नसती... शिवाय, तुझ्या मनासारखा नवरा मिळून तुझा संसार कसा सुखांत झाला असता !"

वामनच्या बोलण्यांतील उपरोधी खोच सरलच्या लक्षांत आली नाहीं असं नाहीं. आधींच चुलींतल्या ज्वाळांचा प्रकाश तिच्या गौरवर्ण चेहऱ्यावर पडल्यामुळे

तिचा चेहरा तांबडा दिसत होता; त्यांत वामनच्या शब्दांचा तीव्रपणा जाणवून ती आणखीच लाल झाली. हातांतलं लाटणं परातीच्या काठावर जोरानं आपटीत तिनं म्हटलं, "फसलांत हो तुम्ही माझ्याशी लग्न करून! खरंच, तुम्हाला मुठीत ठेवते मी, नाही का! जसं कांहीं तुम्हाला कुठं जातांच येत नाही! तरी बरं! दिवसभर शाळा, रात्रीं गप्पा, सभा—तुमचं तोंड मला दिसत असेल तें फक्त जेवायच्या अन् झोपायच्या वेळीं. तरी काय बाई कांगावा करणं–कुणाला वाटायचं, मीच छळते तुम्हाला, तेंच म्हणतें ना मी–"

परंतु तिचं वाक्य पुरं नं होऊ देता त्यान म्हटलं, "खरंच सरल, मीहि तेंच म्हणतों. माझ्यासारख्या मास्तराशीं उगीच लग्न केलंस तूं. तुझी सत्ता गाजविण्याची हौस माझ्यासारख्याच्या घरांत कशी पूर्ण होणार? त्यासाठीं एखादा प्रोफेसर, बडा पगारदार किंवा निदान जहागीरदार तरी शोधायला हवा होतास; म्हणजे घरांत नोकरांचाकरांवरच काय, पण नवऱ्यावरसुद्धा तुझी सत्ता गाजली असती! तुझ्यासाठीं म्हणून जहागीरदारसाहेब सतत चोवीस तास तुझा शब्द झेलायला उभे राहिले असते. अन् मग नवऱ्याची काय बिशाद होती तुझ्या म्हणण्याच्या बाहेर जाण्याची?"

सरलेचे डोळे पाण्यानं भरून आले "माझंच म्हणणं मेलं खोटं!" असं म्हणत तिनं अखेरीस डोळ्याला पदर लावला अन् डोळ्यांतून भराभर अश्रु एकामागून एक निखळून खालीं पडूं लागले.

वामनला क्षणभर तिची दया आली. पण लगेच दुसऱ्या क्षणीं त्याच्या मनांत आलं, ह्या अश्रूंच्यामुळंच माझे पाय प्रत्येक वेळीं घरांत मागं ओढले गेले आहेत. "छे, छे!" असं म्हणत ताट पुढं सरकवून तो उठला आणि हात धुवायला बाहेर गेला.

बाहेर आरामखुर्चीवर येऊन तो बसला तरीसुद्धा सरलची आंत धूसपूस चालली आहे ह्याची त्याला जाणीव होत होती. तो उठून गेल्यामुळं उरलेला राग ती इतरांवर काढीत होती. मोलकरीण, छोटी बेबी–कुणाहि तिच्या तडाक्यांतून

सुटत नसे. पण तिच्या ह्या वागण्याची सगळ्यानाच संवय झाल्यांमुळं सगळी मुद्दा-मच दुर्लक्ष करीत; पण त्याचा खरा त्रास मात्र वामनला होत असे. आईचं गाऱ्हाणं एका बाजूनं त्यामुळं तो अगदी कंटाळून गेला होता.

त्यानं उठून भिंतीवरच्या कोटांतली आगपेटी काढली अन् एक सिगरेट पेटवून समोरच्या झाडांच्या हालत्या छायाकडे तो बघत बसला. आज तसं म्हटलं तर वारा बराच जोरांत होता. एखादे वेळी वाऱ्याची झुळूक आणखीच जोरांत येई; त्याच्या अंगणांतील झाड एकाएकी खूप जोरानं हालूं लागत. त्याच्या पानांचा सळसळ आवाज होई. खूप मोठी वावटळ सुटते की काय, असं वाटूं लागे. पण हलके हलके ती झुळूक पलीकडे सरके. पानांची सळसळ कमी होत जाई अन् अखेरीस जिकडेतिकडे स्तब्ध !

त्याच्यासमोर बेबी एकटीच खेळत होती. दोन पलंगांच्या मधल्या जागेंत संसार मांडून ती बसली होती. तिच्या बाहुल्या, बोळकीं ह्या सगळ्यांकडे वामननं नजर टाकली आणि सिगरेट तशीच हातांत ठेवून बाहेर नजर वळवितांवळवितां त्याच्या मनांत आलं, " नवऱ्यानं सदा घरांत राहावं आणि बायकोमुलांनाच फक्त सुख देण्याची धडपड करावी, त्यांच्यापासून कधींहि दूर जाऊं नये अशी भावना प्रत्येक स्त्रीच्या मनांत लहानपणापासून असेल का ! बेबीला आता त्याची जाणीव स्पष्टपणानं नसेल कदाचित्; पण सरलेच्याच वळणावर बेबी कशावरून जाणार नाहीं ! बायकांच्या स्वभावाचा अंदाज लागत नाहीं हेंच खरं."

वामन कॉलेजांत खूप हुषार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता. कॉलेजच्या प्रत्येक चळवळींत त्याचा पुढाकार असे अन् हातांत घेतलेली कोणतीहि जबाबदारी त्यानं कुशलतेनं पार पाडली नाहीं असं कधीं घडलेलं नव्हतं. तो आणि सरल एकाच मंडळांत काम करीत. ओळखीचं रूपांतर सहवासांत झालं. समान आव-डीची अन् ध्येयाची व्यक्ति जवळ आलीशी वामनला वाटली. देशाकरितां कांहींतरी करावं अशी तळमळ त्याला लहानपणापासूनच होती. एम्. ए. झाल्यावर राष्ट्रीय

शाळेत त्यानं नोकरी पत्करली ज्यांच्या रक्ताच्या बिंदूबिंदूतून स्वातंत्र्याची तळमळ असेल अशी पुढची पिढी तयार करायची, अशी त्याची महत्त्वाकांक्षा.

सरलनं प्रथम त्याच्या ध्येयाला मनापासून संमति दिली पण हळूहळू तिच्यांत बदल होत गेला. वामननं जन्मभर नुसतं शिक्षकच राहावं हें तिच्या मनाला पटेना. आणि ह्या कारणावरूनच हळूहळू असंतोष पसरत गेला. वामनला दोनदा प्रोफेसरची जागा मिळण्याचा संभव होता; पण आपल्या कार्याला तिथं पुरेसा वाव मिळणार नाही असं वाटून त्यानं तो नाकारला होता. पण सरलच्या मनाला हे फार लागलं. आपल्या संसाराचा वृक्ष एवढ्या संकुचित जागेतच वाढावा ही जाणीव पुष्कळदा तिच्या मनाला तीव्र वेदना करी. पुष्कळदां कामाच्या निमित्तानं सभांच्यासाठीं, वामन रात्रीरात्री बाहेर राही. असल्या कामाचा उत्साह एकदा त्याच्या अंगी शिरला म्हणजे जेवणाची अन् घराची सुद्धा त्याला शुद्ध राहात नसे. वामनवर आपली सत्ता गाजविल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, असं त्यामुळं सरलेला वाटूं लागलं. आणि ही सत्ता गाजविण्याची सुरवात तिनं सासूबाईपासून केली ! त्या आपल्या कामांत मधेंमधें करतात अशी गाऱ्हाणीं वामनच्या कानांवर येऊं लागली. त्यामुळं एक दिवस कंटाळून त्यानं म्हटलं,

" सरल घरांतलं तुला संभाळतां नाहीं कां ग येत ! ह्या क्षुल्लक गोष्टी माझ्यापर्यंत कशाला येऊं देतेस ! मी बाहेरचीं कामं करूं की घरांत लक्ष देऊं ! घरांत तूं लक्ष द्यायला नको का ! हें सगळं तूं सांभाळायचं नाहीं, तर मग लग्न कशाला केलं मीं ! "

त्यावर सरलेनं रागारागानं म्हटलं, " अखेर तुम्ही गेलांतच कां पुरुषजातीवर ! चूल अन् मूल एवढंच बायकांचं क्षेत्र आहे असं तुम्हीहि म्हणायला लागलांत ! घरांतलं मीच तेवढं संभाळायचं--जणूं संसार माझा एकटीचाच आहे; तुम्ही त्यांत कुणीच नाहीं ! तुम्हाला जर सतत बाहेरचं कार्य करायचं होतं, तर लग्नाचा पाश कशाला अडकविला गळ्यांत ? बाहेरचं तेवढं तुमचं कर्तव्य अन् घरांत मात्र कांहीं नाहीं ? संसारी पुरुषांचीं घरासंबंधानं काय कर्तव्यं असतात ह्याची जाणीव घ्या का एकदा. "

तिच्या ह्या युक्तिवादानं तो अगदी गार झाला. जिची सहानुभूति आणि मदत त्याला हवी, तिनंच असा काढता पाय घेतल्यामुळं त्याचा अर्धा उत्साह नाहीसा झाला. तरीहि सरलेच्या सहानुभूतीची अपेक्षा न करतां त्यानं आपलं कार्य सुरू ठेवलं; पण त्यामुळं सरलेच्या आणि त्याच्यामधलं अंतर वाढत जाऊन घरांत आणखीच असंतोष पसरला.

कधींकधीं वामनच्या मनांत येई, 'घरांत वैभव हवं, आपला पति कुणीतरी असावा, आपलं स्वतंत्र घर असावं, बगीचा असावा अन् त्या चिमुकल्या संकुचित घरांतच त्यानं रमावं, बायकोला आणि मुलांना सुखी ठेवण्याचीच तेवढी धडपड त्यानं करावी, एवढीच स्त्रियांची महत्त्वाकांक्षा असते काय ? त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा वृक्ष एवढ्या संकुचित मनोभूमीत वाढतो काय ? आपली सरलीहि अखेर अशा सामान्य स्त्रियांपैकीच एक ठरली ना !'

ऑगस्टच्या आंदोलनांत प्रत्यक्ष लढ्यांत भाग घ्यायची इच्छा होती; पण सरलेनं त्याच्या बेताला मोडता घातला. सरलेचं न ऐकतां घराबाहेर पडण्याचा त्याचा निश्चय झाला; पण सरलेनं मनस्तापानं आजारीपण ओढवून घेतलं. तिची अखेरीस दया वाटून वामननं बाहेर काढलेलं पाऊल घरांत घेतलं. घराच्या ह्या पाशांतून आपली मुक्तता होणं शक्य नाहीं; संसाराचा त्रास स्वतःवर घेऊन संग्रामांत उडी घेऊं देण्याचं भाग्य नवऱ्याला लाभूं देणाऱ्या स्त्रियांपैकीं सरल नाहीं, असं वाटून तो मनाशीं खिन्न झाला.

पण आज तो आणखीच उदास झाला होता. दुपारीं शाळेंत त्याला एका मुलानं त्याच्या जिवलग स्नेह्याची चिठ्ठी आणून दिली. त्याच्याच बरोबरीचा कार्यकर्ता, पण त्यानं संग्रामांत प्रत्यक्ष उडी घेतली होती. अन् अखेरीस जेलमध्यें गेला होता. त्याच्या मागं त्याच्या पत्नीनं सारा संसार कुशलतेनं संभाळला होता. तो घरांत नाहीं ह्याची जाणीवसुद्धा होऊं दिली नव्हती ! तिच्याकडे पाहतांच वामनला नेहमी वाटे, 'सरलेनंदेखील ही जबाबदारी संभाळली असती अन् मला घराच्या बाहेर पडायची मोकळीक दिली असती तर ! माणसाचं कर्तृत्व पत्नीवर देखील किती अवलंबून असतं ! सरल मुळीं आपल्या उत्साहाचे पंखच कापीत गेली !,

हे सारे विचार मनांत येऊन त्यानं एक निःश्वास सोडला. सरलेनं आपल्याशीं लग्न करायला नको होतं. तिचा कॉलेजांतला उत्साह तेवढाच क्षणिक ठरला. तिला आपल्या ध्येयाची तळमळ होती की व्यक्तित्वाचं आकर्षण, हा प्रश्न वामनच्या मनांत उभा राहिला कीं तो त्या प्रश्नाचं उत्तर अजमावून पाहण्याचा प्रयत्न करी. आपलं व्यक्तित्व तिच्यापासून दूर जात आहे असं पाहतांच आपल्या ध्येयाचे पंख कापून, आपण सतत तिच्याजवळ राहून संसाराच्या मार्गावर व्यवस्थितपणानं तिच्याबरोबर कसे जाऊं ह्याची काळजी घेण्याची ती खटपट करूं लागली, असं त्याला वाटूं लागलं.

त्याची सिगरेट संपली होती. दुसरी सिगरेट घेण्याकरिता तो उठला अन् कोटाचा खिसा शोधूं लागला. बाहेरच्या खिशांत फक्त पेटीच होती, म्हणून आंतल्या खिशांत त्यानं हात घातला. त्याबरोबर सिगरेटचं पाकीट अन् ती चिठ्ठी एकदम बाहेर आली. ह्या खिन्न मनःस्थितींत त्या चिठ्ठीचा वामनला विसर पडला होता. ज्या चिठ्ठीनं आज त्याच्या मनांत निराश जिविताबद्दल उलटसुलट वादळ उठवून दिलं होतं, त्या चिठ्ठीची त्याला आता आठवण झाली. त्यानं लगेच ती छोटीशी घडी उकलली.—

" वामन,

दोन दिवसांपूर्वीच मी जेलमधून सुटून अखेर ह्या मोकळ्या वातावरणांत आलों बघ, तुला एकटा केव्हां भेटेनसं झालं आहे. वास्तविक पाहतां माझं स्वागत करायला तूंच यायला हवंस; पण मी इथं आज सकाळीं येऊन पोचलों तरी देखील तूं अद्याप भेटला नाहींस ! जेलमधल्या किती गमतीदार हकीकती सांगायच्या आहेत तुला ! अन् तिथले विचित्र अनुभव मी जमवून लिहून ठेवले आहेत हेंहि वाचून दाखवायचे आहेत तुला. केव्हां येतोस ? संध्याकाळीं जेवण आटोपल्यावर येशील काय ? रात्रभर गप्पा करायला सांपडतील अशी सवड काढून ये

—भय्या. "

पण जेवण, संपून तास व्हायला आला तरी देखील वामन खुर्चीवर खिन्न मनःस्थितींत बसला होता. 'भय्याला जें करतां आलं तें मला देखील करतां आलं नसतं काय? असले अनुभव अन् आनंद मलाहि उत्कटतेनं घेतां आले नसते काय?' असं त्याच्या मनांत येऊन चेहऱ्यावर विषण्णतेची आणखीच दाट छाया पसरली. भय्याला भेटायचा उत्साह त्याला बिलकुल उरलेला नव्हता.

पण तरीहि तो उठला. पायांत चपला घातल्या; कपाळावर आलेलीं केसांची झुलपं तशींच मागं सरकवून तो एक पायरी खालीं उतरला. तेवढ्यांत पलंगाच्या पायाशीं खेळत असलेल्या बेबीनं एकदम हातांतला खेळ खालीं ठेवीत म्हटलं,

"भाऽऽऊ"

पुढं पाऊल न टाकतां खांद्यावरून मागं मान वळवीत त्यानं म्हटलं,

"काय बेबी!"

"भाऊ, तुमी बाहेर चाललांत!" असं म्हणत ती जागेवरून उठून त्याच्या गुडघ्याला बिलगली. तिच्या काळ्याभोर केसांवरून हात फिरवीत त्यानं म्हटलं,

"फिरायला नको जाऊं!"

त्याच्या गुडघ्याला आपलं डोकं घाशीत ती लाडिकपणं उद्गारली, "अंऽऽ मग आमचा छंपाक कोण जेवील? माझा पण छंपाक झाला आहे ना!"

तशांतहि त्याला हसूं आलं. तिला वर उचलून तिचे केस कानांमागं सारीत त्यानं हंसून म्हटलं, "मी आतां येतो हं; तोंपर्यंत तूं पान मांड माझं. मी आलोंच!" असं म्हणत त्यानं तिला खालीं उतरवलं. पण त्याच्या धोतराचा सोगा आपल्या चिमुकल्या हातांत घट्ट धरून तिनं म्हटलं, "चलऽऽका, पण मग तुमी परत आल्यावर मग मात्त आमी कुठं ज्याऊं देणार नाही तुमाला."

त्यानं कांहीं न बोलतां तिच्या हातांतला सोगा सोडवून घेतला आणि सावकाश पावलं टाकीत तो फाटकाच्या बाहेर पडला. रस्त्यावर दूरवर कुणी नव्हतं. रस्त्याच्या टोकांशीं असलेले एकदोन पर्णहीन वृक्ष त्या अंधारांत भयाण वाटत होते. बाजूच्या घरांच्या वांकड्यातिकड्या छाया रस्त्यावरच्या दिव्यांच्या मंद प्रकाशांत हालत होत्या. आपलीं पावलं जड कां पडतात हेंच त्याला कळेना !

---

## बापू........................................८

बापूंचं मोठं तैल चित्र तयार करण्याचं काम माझ्याकडे आलं त्यावेळीं मी प्रथम नकार दिला नकार कां दिला त्याचं कारण काय सांगू ! तें फक्त मलाच कळण्यासारखं आहे. बापूंना तरी त्याची जाणीव असेल किंवा नाहीं कुणास ठाऊक. त्या रात्रींचा तो प्रसंग घडल्यापासून बापूंची आणि माझी भेट ह्या क्षणापर्यंत झालेली नाहीं आणि हें चित्र तयार करण्याचं कबूल करणं म्हणजे बापूंच्या अप्रत्यक्ष सहवासाला संमती देण्यासारखं होतं. बापूंच्या एका छायाचित्रावरून त्यांचा हा पोर्ट्रेट तयार करायचा होता. मी नकार दिला तो एवढ्यासाठींच कीं बापूंचा असा अप्रत्यक्ष सहवासच नेहमीं माझ्या वाट्याला येणार काय ! तसं असेल तर मग मला कांहींच नको. त्यांच्याबद्दल मला जें वाटलं तें नेहमीं माझ्या मनांतच राहिलेलं बरं.

बापूंनीं इथल्या एका राष्ट्रीय शाळेला दीड लाखाची देणगी दिली होती. त्या राष्ट्रीय शाळेसाठींच बापूंचं हें तैल चित्र तयार करावयाचं होतं. तिथल्या चालकांचा अखेरीस फारच आग्रह पडला तेव्हां मी हो म्हटलं. अर्थात मी संमती दिली. त्यालाहि कारण होतं. हें चित्र मी तयार केलं आहे हें जेव्हां त्यांना कळेल तेव्हां...

चित्राचं काम करायला मी सुरवात केली. बापूंची आठवण झाली कीं माझ्या डोळ्यापुढें नेहमीं त्यांची कठोरतेनें रोखून पाहणारी आकृती उभी राहते. त्यांच्या खडावांचा खड् खड् असा आवाज कानावर आल्यासारखा वाटतो, आणि मग एकामागून एक सगळ्या आठवणी भराभर डोळ्यापुढें उभ्या राहतात. बापूंचा प्रत्यक्ष परिचय होण्यापूर्वीच मला त्यांच्याबद्दल उत्सुकता वाटत होती ती किती विलक्षण. त्यांचा परिचय ज्या रात्रीं झाला, त्या रात्रीं त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू माझ्या नजरेसमोर चमकून त्यांच्याबद्दल माझ्या मनांत जी भावना निर्माण झाली अन् ह्या घटकेपर्यंत अशा अमूर्त स्वरूपांत मी तशीच तिला मनांतल्या मनांत दडपून ठेवली. बापूंची आणि माझी कधीं भेट होईल कुणास ठाऊक. कोण जाणे, कदाचित् होणारहि नाहीं–त्यांच्याबद्दलची भावना उघड करण्याचा प्रसंग कदाचित् येणारहि नाहीं पण बापूंना तरी खरोखर माझ्याबद्दल काय वाटत होतं हें कधीं मला कळेल कां ? रोखलेल्या नजरेनं माझ्याकडे ते कां पहात होते हें कधीं तरी मला कळेल का ? बापू जर सुदैवानं मला परत भेटतील तर जें धैर्य पूर्वी मला आणतां आलं नाहीं तें धैर्य आतां आणून मी ह्या प्रश्नाचं उत्तर त्यांना नक्की विचारणार, मग त्यांनीं कितीहि रोखून माझ्याकडे पाहिलं तरी हरकत नाहीं–

कीं आज अडीच वर्षांच्या अवधींत बापू माझी आठवण आणि त्या रात्रींचा प्रसंग दोन्ही विसरले असतील ? बापूंनी मला विसरावं ही कल्पनाच मला सहन होईना–मनांतल्या मनांत कुठं तरी वाटलं होतं. 'छे, छे, बापू मला विसरायचे नाहींत. हें चित्र मी केलं आहे असं त्यांना कळतांच मला शाबासकी द्यायला ते खचित भेटतील.' कीं बापू, खरंच किती विचित्र तऱ्हेनं वागत होते. त्यांच्या वागण्याचा थांग लागणं, किती कठीण होतं––हें चित्र पाहिल्यावरही तें कसें वागतील कोण जाणें––

बापूंचं चित्र जवळजवळ सगळं पूर्ण होत आलं होतं. त्या दिवशीं मी काम करायला बसले ते अशा उद्देशानं कीं सगळीकडे अखेरचे टचेस् देऊन चित्र आज पूर्ण करायचं. बाहेर जिकडे तिकडे शांत होतं, समोरच्या खिडकींतून

दिसणाऱ्या झाडाच्या डहाळीची पानंसुद्धां हलत नव्हतीं. बाहेर हवा कशी चमत्कारिक पडली होती सगी. बापूंच्या चेहऱ्यावर ब्रशनं हलके हलके काम करतां करतां बापूंच्याबद्दल माझ्याजवळ असणाऱ्या एकेक आठवणीशी खेळण्याचा चाळा मी करूं लागले आणि त्याबरोबर बापूंच्या आणि माझ्या आयुष्यांत घडलेला रात्रींचा तो एकचएक प्रसंग डोळ्यासमोर उभा राहिला—

बापूंची आणि माझी प्रथम गांठ पडली ती गाडींत. ऑगष्ट आंदोलनापूर्वी कॉंग्रेस वर्किंग कमेटीची जी बैठक मुंबईला भरली होती ती मुद्दाम बघायला बापू मुंबईला गेले होते. बापूंचं आणि माझं फारसं बोलणं झालें नाहीं. फक्त आमच्या खेड्यापासून जवळच बापूंचं मालगुजारी गांव आहे एवढंच मला कळलं. ते स्वभावतःच अबोल असावेत गाडींतला बहुतेक वेळ त्यांनीं पुस्तकं वाचण्यांत घालविला. त्यांचं वय पसतीसच्या आसपास असेल कदाचित्. खादीचे पांढरे शुभ्र कपडे त्यांनीं घातले होते. पण तरी सुद्धां त्यांच्या ताठर वृत्तीच्या वागण्यावरून मला वाटलं कीं ह्या गृहस्थाला पैशाची घमेंड खचित असली पाहिजे.

घरीं आल्यावर भाऊंच्याजवळ मी बापूबद्दल बोलतांच ते कांहींसे तुटकपणानंच त्यांच्याबद्दल बोलले. त्यांच्या वर्तनामुळें सगळे शेतकरी शेफारून गेले आहेत अन् मालगुजारीची प्रतिष्ठा त्यांना संभाळता येत नाही, एवढाच त्यांच्या बोलण्याचा मतलब होता. परंतु आईनं त्यांच्याबद्दल सांगितलेलं सगळं ऐकून बापू असे असतील ह्यावर माझा विश्वासच बसेना—बापूनीं खरंच आपल्या प्रथम पत्नीला छळलं असेल आणि त्यांच्या छळाला कंटाळून तिनं ह्या जगाचा निरोप घेतला असेल? बापूंनी आपल्या दुसऱ्या पत्नीलाहि खरोखरीच टाकून दिलं असेल कां? ह्या प्रश्नांनीं माझ्या मनांत गर्दी केली.

पण बापूंच्याबद्दल शेतकऱ्यांच्या तोंडून कितीदां प्रशंसेचे उद्गार मी ऐकले होते कितीतरी जणांना बापूनीं मदत करून कर्जाच्या आणि सावकाराच्या तडाख्यांतून सोडविलं होतं—त्यांच्या स्वतःच्या खेडेगांवांत त्यांनीं साक्षरताप्रसाराचे

वर्ग चालविले होते–त्यांच्या ह्या कार्यांमुळेंच आजूबाजूचे मालगुजार त्यांच्यामुळें सगळें शेतकरी शेफारलें आहेत असं म्हणत.

बापूंच्या जीविताच्या ह्या दोन्हीं बाजू मला माहित झाल्या, त्यामुळेंच बापूंच्याबद्दलची माझी उत्सुकता वाढली. त्याचं सगळं कार्य लक्षांत घेतां ते आपल्या पत्नीशीं असे वागले असतील ह्यावर माझा विश्वास बसेना. तर बापूंचं मन निर्दय व कठोर असावं असा विचार केला कीं बापू सगळं कार्य मनापासून करतात कीं निव्वळ मोठेपणासाठीं, ह्या प्रश्नाचं उत्तर मला कांहीं केल्या अजमावतां येईना सुट्टींत आमच्या खेड्यावर मी गेले कीं बापूंच्याबद्दल मला जेवढी माहिती मिळवितां येईल तेवढी मिळविण्याचा मी प्रयत्न करी–बापूंच्याकडे जातां येईल तर किती बरं; असं मला कितीदां वाटायचं पण भाऊ ह्या गोष्टीला कधीं संमती द्यायचे नाहींत अन् बापूंची आणि आपली गांठ पडण्याचा परत कधीं संभव नाहीं असं मी मनाशीं पक्कं ठरवून टाकलेलं होतं.

परंतु परमेश्वरदेखील माणसाच्या मनाची; आशा–निराशेची उलट सुलट आंदोलनं पहात असतो का काय कोण जाणे. ज्यावेळी बापूंना जवळून पाहण्याची संधी आपल्याला मिळण्याचा संभव नाहीं असं मला वाटलं त्याच वेळीं बापूंच्या आयुष्याशीं माझा परिचय झाला आणि......

आमच्या खेड्याला स्टेशन नव्हतं. नागपूरला जाणारी गाडी गांठायची म्हणजे तिथून आठ मैल दूर असलेल्या दाणापूर स्टेशनावर जावं लागे, आणि ती गाडी देखील रात्रीं अकरा वाजतां दाणापूर स्टेशनवरून सुटत असे. दुसऱ्या दिवशीं कॉलेज उघडत असल्यामुळें मला त्या दिवशीं निघणं अवश्यच होतं. पेरणीचे दिवस असल्यामुळें भाऊ मला दाणापूरपर्यंतसुद्धां पोचवायला येणार नव्हते. आमचा जुना गडी शिवा आणि मी, आम्हीं दोघच निघालों. रूळलेल्या वाटेनं रेंगी जात होती. बैलांच्या पळण्याचा आवाज आणि त्यांच्या गळ्यांतील घुंगरांचा तालबद्ध आवाज ऐकीत मी बाहेरच्या अंधाराकडे पहात होते. रेंगीच्या चाकांखालीं वाळलला पाचोळा चिरडला जात होता; आणि आजुबाजूंची उंच झाडं अंधारांत

अस्पष्ट दिसत होती. उद्यां बोर्डिंगमध्यें जाऊन पोचल्यावर खोली कशी लावायची ह्याचे विचार अन् रेंगीच्या गतीमुळें आलेली कांहींशी अस्पष्ट गुंगी ह्या नादांत होते मी. तेंच शिवानं रेंगी एकाएकी उभी केली.

मी भानावर आलें. तो मला हांका मारतो आहे असं वाटून मी म्हटलं, "कां रे शिवा बैल कां थांबलेत ? वाघबिघ तर नाहीना ?" खरं म्हणजे वाघाच्या भीतीनं माझ्या तोंडांतून शेवटचे शब्द अगदीं भीत भीत दबकत उच्चारले गेले. शिवानं कांहीं न बोलतां समोर क्षितीजांकडे बोट दाखविलं–सगळं आभाळ तांबडं होऊन गेलं होतं–दहा वाजण्याचा सुमार आहे हें सुद्धां माझ्या लक्षांत राहिलं नाहीं मी एकदम शिवाला म्हटलं, " अं ऽऽ ? सुर्योदय अन् ह्या वेळीं कसा ? "

शिवा हंसला. त्यानं म्हटलं, " बाई, हा सुर्योदय नाहीं, तो बत्रा धूर दिसतो आहे. ह्यापुढचं दोन मैलाचं जंगल वणव्यानं पेटलेलं दिसतं आहे. झाडं मोडण्याचा आवाज ऐकूं येत नाही कां तुम्हांला ? "

मी समोर पाहिलं तर खरंच मोठमोठे धुराचे लोट त्या अंधारांत अस्पष्टपणें वर जातांना दिसत होते. मध्येंच वीज चमकावी तशा ज्वालाही मधून मधून चमकत होत्या. पक्षांचे आर्तस्वर अस्पष्टपणें कानीं पडत होते आणि विस्तवाच्या ठिणग्या असंख्य चांदण्या चमकाव्या तशा चमकत होत्या. आमचा पुढचा सहा मैलांचा रस्ता त्याच जंगलांतून जात होता.

शिवा परत जाण्याचं म्हणूं लागला. पण मला परत जाण्याची इच्छा नव्हती. गाडी नाहींतर निदान मोटारीनं तरी मला उद्यां पोचायलाच हवं होतं. मी शिवाला म्हणालें–" नागपुरला जाण्यासाठीं मोटारी सुटतात असं एखादं गांव आहे कां जवळ ?"

त्यानं म्हटलं, " आहे, चंदेरी. "

त्याच्या तोंडून चंदेरी हा शब्द ऐकतांच मी दचकले अन् कांहीसा आनंदही झाला. चंदेरी हें गांव बापूंच्या मालगुजारीचं. चंदेरीला जायचं म्हणजे बापूंच्या-

कडे. आणि तेंही रात्रीं......भाऊंना कळलं तर...! पण बापूंच्याकडे कधीं नव्हे तो जाण्याची संधी चालून आली होती. माझं मन कांही केल्या माघार घ्यायला तयार होईना, मी शिवाला म्हटलं, " उद्याच्या मोटारनं कांहीं झालं तरी मला गेलंच पाहिजे. चंदेरीकडे वळीव रेंगी—"

चंदेरी तिथून चार मैल दूर होती. चंदेरीला जायचं म्हणजे बापूंच्याकडे हें शिवानं ओळखलं. बापूंच्याबद्दल त्याच्याचजवळ मी कितीदां चवकशी केली होती. तो स्वत: त्यांना देवमाणूस समजत होता. चंदेरीला रेंगी पोचली तेव्हां किती वाजले होते कुणास ठाऊक. खेड्यांत जिकडे तिकडे निजानीज झाली होती. फक्त गांवच्या दुकान ओळींत पेट्रोमॅक्स झगझगत होते. जवळच कुठें तरी पत्याचा अड्डा असावा. रेंगी बाजार ओळींतून जाऊं लागली तसा माझ्या कानांवर हंसण्याचा आणि बोलण्याचा आवाज आला. त्यांतला कुणी तरी शिवाला ओरडून म्हणाला ' कारे-शिवा, कुणीकडं आलास ? ' शिवानं काय उत्तर दिलं तें मला नीटसं ऐकूं आलं नाहीं. थोड्याच वेळांत बापूंच्या भव्य वाड्याशी रेंगी येऊन उभी राहिली आणि मग मात्र माझ्या छातींत धडधडायला लागलं. मला पाहून बापूंना काय वाटेल ? ते ओळखतील तरी का ? त्या दिवशीं गाडींतच आपल्याशीं किती कमी बोलले ते ! समजा ह्या वाड्यांत बाई माणूस कुणीच नसले आणि बापू एकटेच राहत असलें तर—

शेवटची शंका येतांच माझा अंगावर कांटा उभा राहिला. अशी शंका येऊं देणं म्हणजे त्यांच्यावर माझा विश्वास नाही असं समजण्यासारखं होतं पण तसंही मानायला माझं मन तयार नव्हतं. बापूंच्याबद्दल माझ्या भावना इतक्या विचित्र होत्या की त्यांच्याजवळ जाण्याचा मोह मनांतून जबरदस्त होता तर भिनीनं पावलं मागें पडत होतीं. कदाचित् आईनं सांगितलेल्या गोष्टी ऐकून माझ्या मनांत तशी शंका आली असावी पण म्हणूनच त्यांच्या जीविताचं विचित्र गूढ सोडवायची जिज्ञासा मला स्वस्थ बसूं देईना.

शिवा बापूंना जाऊन सांगेपर्यंत मी आंत रेंगींतच असा विचार करीत बसले होते. पण लगेच खडावांचा आवाज माझ्या कानावर आला, कुणीतरी जवळ

आलसं वाटलं आणि कंदिलाचा प्रकाश पडला. बापूच हातांत कंदील घेऊन उभे होते. एकच क्षण त्यांची आणि माझी दृष्टादृष्ट झाली. मी बाजूला नजर वळविली बापूंनी कंदील वर करीत म्हटलं, 'या, आंत यायचं नाही का तुम्हांला ?'

रात्रीं झोपेपर्यंत त्यांच्या व्यक्तित्वाचा अंदाज घ्यायचा प्रयत्न करात होते मी. बापू एकटेच त्या ठिकाणी नव्हते तर त्यांची विधवा बहीणही होती. माई ह्या नांवानं त्यांना सगळे हांक मारीत.

बापू अबोल असावेत असा जो एक तर्क मा मनाशीं बांधला होता तो बऱ्याच अंशीं खरा असावा. प्रत्येक वेळीं बापूंचा स्वभाव अतिशय खोल आणि गूढ असावा असा प्रत्यय मला कितीदां तरी येत होता. कित्येकदां बापू रोखून पहात. मी आंत गेल्यावर माईनीं मला दूध घ्यायचा आग्रह केला. मी आढेवेढे घेत आहे असं पाहतांच त्यांनीं बापूंना हांक मारली. बापूंनीं आंत येतांच म्हटलं, "तुम्हीं आमचा पाहुणचार असाच घेणार आहांत का ?"

"तुमचा पाहुणचार घ्यायला कुठं आले आहे मी ?" बापूंनी एक क्षण माझ्याकडे रोखून पाहिलं आणि किंचित् कठोरतेनं विचारलं, "मग !"

त्यांचीं नजर मला असह्य वाटली बापूंच्या अंतरंगाचा ठाव मी काढण्या-ऐवजीं बापूच माझ्या अंतःकरणाचा शोध घेत होते की काय कोण जाणे—

मी हंसून म्हटलं, "तुम्हीं कुठं बोलाविलं मला ? मी आपण होऊन तुमच्याकडे आले आहे—तेव्हां पाहुणचाराबद्दल तुम्हांला तक्रार करतां यायची नाहीं—"

असाच प्रसंग नंतर आला. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या मोटारनं मला जायचं आहे असं मी म्हणतांच बापूंनीं स्थिर नजरेनं माझ्याकडे दृष्टी टाकली; आणि म्हटलं, "इतक्या लवकर जातां यायचं नाहीं तुम्हांला ! "

"म्हणजे काय ? उद्या माझं कॉलेज आहे. मला वेळेवर गेलंच पाहिजे."

'मीही कॉलेजमध्यें शिकलो आहे. कॉलेज उघडायच्या पहिल्या दिवशीं अभ्यास घेत नाहींत हें माहीत आहे मला."

'ते खरं पण मला गेलं पाहिजे—'

'तुम्हांला जातां येणार नाही.'

त्यांचं तें बोलणं मला अगदी चमत्कारिक वाटलं. असा काय हा विचित्र गृहस्थ अन् ही असली जबरदस्ती तरी काय म्हणून! ते जायला निघाले होते. जातां जातां त्यांनीं म्हटलं, 'वरच्या मजल्यावर तुमची झोपायची व्यवस्था केली आहे. एकटं झोपायला भिती तर नाहीना वाटायची?' मी मानेनंच नाहीं म्हटलं. बापूंची ती ताठर वृत्ती, कठोरपणा, रोखून पाहणारी दृष्टी, जबरदस्ती, ह्या सगळ्या गोष्टीमुळें मी एकीकडे त्यांच्यावर चिडलें होतें. पण दुसरीकडे नेमक्या ह्याच गोष्टीमुळें त्यांची अधिक छाप माझ्यावर बसत चालली होती. दुसऱ्याशीं आर्जवानं, मृदूपणें वागणं त्यांच्या स्वभावांतच नसावं.

तो वाडा खूप मोठा होता. जुन्या काळचा असला तरी बापूंनी त्यांत आधुनिक तऱ्हेचा पुष्कळ बदल करून घेतलेला असावा. रात्रीं मी अंथरूणावर पडलें खरे पण बापूंच्या जबरदस्तीच्या आग्रहांतून मार्ग कसा काढावा ह्याबद्दल सारखा विचार करूं लागले. नागपूरला उद्या सकाळीं परत न जातां एक दिवस मी बापूंच्याकडे राहिले तर भाऊ मला काय म्हणतील? वणवा पेटल्यामुळें गाडीनं जातां आलं नाही हें ठीक. पण चंदेरीहून सकाळच्या मोटारनं तूं कां गेली नाहींस असं जर मला भाऊंनीं विचारलं तर मी काय उत्तर देणार होतें?

ह्या विचाराबरोबर मी चटकन अंथरुणावर उठून बसले. कांहीं झालं तरी बापूंची समजूत घालून मला उद्यां गेलंच पाहिजे. त्या वाड्याची मला कांहीं माहिती नाहीं हेंही लक्षांत आलं नाहीं; टेबलावरचं शामदान उचलून मी खोलीच्या बाहेर पडलें.

पण थोडं दूर जातांच मला भीति वाटूं लागली. एक दिवाणखाना ओलांडला, दुसरा त्यांतले गालीचे, आधुनिक तऱ्हेचं फर्निचर, भिंतीवरच्या गांधी नेहरूंच्या मोठमोठाल्या तसबिरी, कपाटांतलीं पुस्तकं, भिंतीवर लटकवलेलीं सांबरांचीं

डोकी-ती भयाणस्तब्धता पाहून माझं मन धडधडत होतं. आपल्याला सारखा घाम कां येतो आहे हेंही मला कळेना. कुणाच्या तरी पावलांची चाहूल लागल्यासारखी वाटली. भीतीनं माझं अंग शहारून गेलं. पुढेंही पाऊल उचलेना आणि मागेंही वळेना सांवली पुढें येऊं लागली त्याचरोबर भीतीनं मी डोळे घट्ट मिटले. हातांतलं शामदान गळून पडणार असं वाटलं.

पण बापूंचा एक शब्द ऐकतांच माझं मन ठिकाणावर आलं, त्यांनीं हलकेंच माझ्या हातांतला दिवा काढून घेतला; अन् म्हटलं 'केवढी घाबरली आहेस तूं! हातांतला दिवा पडून आग लागली असती म्हणजे ! काय हवं होतं तुला!"

'तुम्हीं—'

माझा तो शब्द ऐकतांच ते एकदम दचकले. आपल्या शब्दानं केवढा घोटाळा करून ठेवला आहे, हें लक्षांत येतांच मी म्हटलं, 'म्हणजे भेटायचं होतं—' आणि मग मी त्यांना कारण सांगितलं.

ते तसेंच स्तब्ध उभे राहिले. नंतर माझ्याकडे रोखून बघत एकेक शब्द उच्चारीत त्यांनीं म्हटलं, 'भाऊंच्या मनाविरुद्ध तूं तरी कशी आलीस!' त्यांच्या त्या प्रश्नाचं उत्तर मला देववेना. माझा चेहरा अगदीं गोरामोरा होऊन गेला.

मी कांहींच बोलले नाहीं. बापूंनी त्या दिवाणखान्यांतलं मोठं शामदान पेटविलं, आणि खोलींत जिकडे तिकडे प्रकाश पडला, त्याबरोबर बापूंच्याकडे मी दृष्टी टाकली. पायांत खडावा, अंगावर शाल, कपाळावर पुढें आलेले रुपेरी केस, तीक्ष्ण डोळे आणि कठोर मुद्रा; बापू खरोखरच कसे असावेत—!

ते माझ्याकडे पहात होते. त्यांनीं म्हटलं, 'मग तूं इथें कां आलीस!'

त्या प्रश्नांतून मला पळवाट शोधून काढायची होती. मी म्हटलं, 'तुम्हांला खरंच, स्त्रियांशीं कसं वागावं हें कळत नाही—किती अरेरावीपणानं तुम्हीं मला प्रश्न विचारतां आहांत! जणूं मी कुणी चोर तुमच्या घरांत शिरले आहे आणि त्याला जसं—तूं इथं कां आलास असं विचारावं तसंच मला—'

'खरंच मी तसा वागतो आहे ?'

'होय.'

परंतु 'माफकर' असं सुद्धां त्यांनीं म्हटलं नाहीं. दुसरा एखादा पुरुष असतां तर त्यानं नेमके हेच शद्ब उच्चारले असते आणि बापूंनी ते उच्चारले नाहींत म्हणूनच मला आणखी नवल वाटलं.

'ठीक आहे' एवढंच त्यांनीं म्हटलं आणि पुढें म्हणाले,' 'उद्यां जाऊं शकतेस तूं-मी दिवाणजींना मोटारची व्यवस्था करायला सांगतो,—'

त्यांचे ते शद्ब ऐकून माझ्या डोळयांत पाणी उभं राहिलं, किती कठोरतेनं आणि निर्विकारतेनं बापू माझ्याशीं वागत होते.

मी कांहींच बोलत नाहीं असं पाहून त्यांनीं म्हटलं, 'तुला झोपायच नाहीं कां ? चल मी पोचवायला येतो.'

मी एकदम त्यांच्याकडे पाहिलं. परत ह्या ठिकाणीं येतां येणं शक्य नाहीं ह्याबद्दल माझ्या मनाची खात्री झाली. बापूंच्या जीविताचं गूढ तसंच अज्ञात राहणार काय ? छे, छे, तसं घडतां उपयोगी नाहीं. शेवटीं धीर करीत मी म्हटलं,

"बापू; मला एक प्रश्न विचारायचाय तुम्हांला ?'

'मला ?' असं म्हणून ते थबकले.

'होय !'

'विचार—'

'रागावणार नाहीं—?'

'नाहीं—'

मला जी शंका होती ती मी विचारून टाकली. आणि त्यांची तीक्ष्ण दृष्टी चुकवावी म्हणून बाजूला नजर वळविली.

त्यांनीं म्हटलं, 'हा प्रश्न तूं मला कां विचारते आहेस?'

'कारण काय सांगूं?'

'मग तुला काय वाटतं?' एक प्रकारच्या कठोर निश्चयानं ते म्हणाले, 'मी माझ्या प्रथम पत्नीला छळून मारली? लोकांनीं वाटेल तें उठवावं हेंच खरं. लग्नाच्या पूर्वीच तिला क्षयाची थोडीशी भावना होती. तिच्या बरोबर येणाऱ्या बड्या हुंड्याच्या रकमेला भळी पडून वडलांनीं माझं तिच्याशीं लग्न लावून दिलं—पण लग्नानंतर ती अंथरूणाला खिळली ती मुळीं उठलीच नाहीं. तिची जेवढी शुश्रुषा करणं शक्य होतं, तेवढी मी केली; ती आजारी असतांनासुद्धां चुकून कधीं मोहाला बळी पडलो नाहीं. मी तिच्या बाबतींत जें माझं कर्तव्य म्हणून होतं तें सगळं मी केलं—'

बापूंच्या नजरेकडे मला पाहवेना. माझ्याकडे रोखून पहात त्यांनीं ही सगळी हकीगत कां सांगावी हेंही मला कळेना. पण मी ऐकत होते—

'ही झाली पहिली हकिकत. आणि दुसरीशीं लग्न केलं तर तिला माझ्या घरांतली संपत्ति माहेरीं न्यायला हवी होती. आणि मी तिच्या मुठींत राहिला तर तें तिला मनापासून पाहिजे होतं. पण दुसरी बायको म्हणून वाटेल ते लाड पुरविणाऱ्या मूर्ख नवऱ्यांपैकीं मी नव्हतो. तिचं माझं पटत नाहीं आणि घरांत भांडणाचीं सारखीं वादळं उठताहेत असं पाहतांच मी तिला कायमचं माहेरीं पोचतं केलं आणि आज सात वर्षं असा एकटा राहतो आहे.'

बोलतां बोलतां बापूंच्या डोळ्यांत पाणी चमकल्याचा मला भास झाला. कठोरतेच्या खडकाखालीं मृदु भावनांचा झरा खरंच खळखळत असेल कां असा विचार माझ्या मनांत येऊन मी त्यांना कांहीं विचारणार तोंच ते एकदम माझ्याजवळ आले, आणि माझ्या डोळ्यांत रोखून पहात त्यांनीं, 'मी सांगतो त्यावर तुझा विश्वास बसतो कीं नाहीं?' असा प्रश्न त्यांनीं कां करावा हें मला कळलं नाहीं—माझा विश्वास बसो अगर न बसो त्यांच्यासारख्या

स्वभावाच्या व्यक्तीला माझ्या विश्वासाची कशाला पर्वा हवी ? त्यांच्याबद्दल मला जें काय वाटत होतं; ते त्यांची हकीगत न कळतांही वाटत होतं–आणि ती कळली नसती तरी सुद्धां वाटलं असतं. आनंद वाटला एवढ्याचसाठीं कीं जें गूढ होतं—तें उकललं गेलं आणि बापूंच्या स्वभावाचा, कर्तव्याचा आणखी एक चमकदार पैलू माझ्या नजरेस पडला.

ते माझ्याजवळ आल्याबरोबर मला काय वाटलं तें सांगता येत नाहीं...पण ज्या पुरुषावर आपली प्रीति जडते त्याच्याबरोबर एकटं असतांना, कसल्याही भयाण परिस्थितींत, अंधारांत सुद्धां एकटं राहण्याची स्त्रीला भीती वाटत नाही हेंच खरं. बापू माझ्या विश्वासाला पात्र आहेत असाच अनुभव मला त्यावेळी आला. पण, 'बापू, तुम्ही खरोखर मला हवे आहांत' असं मी त्यांना म्हटलं असतं तर त्याक्षणीं इतक्याच कठोरतेनं अन् निर्दयपणानं माझ्या प्रेमाची संभावना त्यांनीं केली असती का ? माझं तुमच्यावर प्रेम आहे. तुमचा सहवास मला हवा आहे, मला तुम्हीं तुमच्या सर्वस्वासह हवें आहांत' असं सांगायची हिंमत माझ्याजवळ नव्हती. त्यांना माझ्याबद्दल काय वाटत होतं हें मला कसं कळणार ? पण त्यांच्या वागण्याच्या पद्धतीवरून ते स्वतःच्या मनाची दारं खुली न करतां तितक्याच गर्विष्ठतेनं वागले असते का ? कोण जाणे—

बापूंच्याबद्दलचीं प्रीतीची भावना तशीच माझ्या मनांत राहिली–त्याला कधी मूर्त स्वरूप आलंच नाहीं. पुढें त्याला कसं स्वरूप मिळेल ह्याची कधीं कल्पना करण्याचं अगर त्याला विकसित स्वरूप देण्याचं धैर्य मला झालं नाहीं–

बापूंच्याकडे परत कधीं जाण्याचा प्रसंग मला आला नाहीं. बापूही मला कुठे भेटले नाहीत. माझं मन कितीदां त्यांच्याबद्दल विचार करीत राही–त्यांच्या बद्दलच्या किती विलक्षण आठवणी माझ्या मनांत होत्या-गूढ-की ज्याचं खरं स्वरूप मला अजमावतां आलं नाहीं.

त्या प्रसंगाला आज दोन अडीच वर्षाचा काळ लोटला होता. ह्या विचित्र आठवणी परत दृष्टीसमोर नकोत म्हणूनच बापूंचा पोर्ट्रेट करण्याचं मी टाळीत

होते. बापूंच्या त्या भव्य आकृतीचा एकेक भाग जसजसा कॅनव्हासवर चित्रीत करीत होते तसतसा माझ्या मनांत एकच विचार येई. बापूंच्या बद्दलच्या माझ्या ह्या भावना अपुऱ्या कां राहिल्या, त्याची दुसरी बाजू मला केव्हां कळेल ? बापूंना माझ्याबद्दल नक्की काय वाटत होतं बापूंचं मी केलेलं हें चित्र पाहून त्यांना काय वाटेल ? हे असले विचार करीतच बापूंच्या डोळ्यांतील रंगाला मी अखेरचे 'टचेस्' देत होते. दुसऱ्यांच्या अंतरंगाचा पुरा पुरा ठाव काढणारी बापूंची ती रोखून पाहणारी नजर मला पुरतीं साधली होती काय ?

तेवढ्यांत माझ्या मागे असलेल्या पार्टीशनचं दार धाड्दिशीं उघडल्याचा आवाज आला. दोन वर्षांपूर्वीं कानावर पडलेला खडावांचा तो परिचित आवाज मला परत ऐकायला आल्यासारखा वाटला. मी दचकून उठले. हातांतला ब्रश आणि पॅलेट खालीं ठेवलं—बापू इथे कसे येतील ? कीं भास होतो आहे—

पण बापू खरोखरीच माझ्या मागे उभे होते, स्टॅन्डवर ठेवलेल्या त्यांच्या भव्य तैलचित्राकडे त्यांची नजर होती. आज अडीच वर्षांनीं बापू खरोखरीच माझ्या-समोर उभे होते; आणि तें सुद्धां माझ्या ब्रशांतून उतरलेली त्यांची प्रतिमा बघायला...

त्यांनीं आपली नजर माझ्याकडे वळविली—कधीं नव्हे ते बापूंच्या मुद्रेवर हास्य झळकल्यासारखं मला वाटलं. अभिमानानं माझं मन भरून आलं—

'कसं झालं आहे चित्र—?'

'फारच सुंदर. पण इतकं सुंदर तें कां निघालं आहे ह्याचं कारण सांगू?'

त कांय बोलतात कोण जाणे असं वाटून त्यास रोखून मी म्हटलं, 'हं सांगा—'

"कारण तुझ्या हृदयांत मी आहे—ज्या रात्रीं भाऊंच्या मनाविरुद्ध, स्वतःच्या जबाबदारीवर तूं माझ्याकडे आलीस त्याच रात्रीं मी जें ओळखायचं तें ओळखलं पण तूं बोलून दाखवशील म्हणून वाट पहात होतो"

आश्चर्यानं मी जागच्याजागी गोंधळून उभी होते. बापू काय बोलताहेत ह्याकडेसुद्धां माझं लक्ष नव्हतं—तें बोलत होते आणि मी ऐकत होतें.

मी हलकेंच म्हटलं, 'पण तुम्हीं किती कठोरतेनं माझ्याशीं वागत होता. मी माझी भावना उघड केली असती; आणि तुमच्याकडून नकार मिळाला असता तर -'

'ज्या वेळीं तू पूर्णपणें माझ्यावर विश्वास टाकलास, एकांतातसुद्धा तुला माझी भिनी वाटली नाहीं, माझ्याबद्दल अनेक खरे खोटे समज माहीत असतांना त्याबद्दल शंका न धरतां मला ज्यावेळीं तुझ्या अंतःकरणांत जागा दिलीस त्याच वेळी तुझ्या ह्या सगळ्या गुणांवर मोहित होऊन मी तुझा झालो. विधीपूर्वक तूं खरोखरच माझी व्हायला तयार आहेस असं मला कळलं असतं तर कशाही परिस्थितींत मी तुला माझी केली असती आणि तें कळावं म्हणून मी वाट पहात होतो. पण...' त्यांचा आवाज कमालीचा मृदू झाला. ते माझ्याकडे पहात होते. त्या नजरेंत स्निग्धपणा, आर्जवता प्रीति—जी नजर दोन अडीच वर्षांपूर्वी मला हवी होती तीच आज—ते पुढें काय बोलत होते ह्याकडे माझं लक्ष नव्हतं—बापूंचं सुद्धां माझ्यावर प्रेम आहे ह्या जाणीवेनं माझं मन आनंदानं फुलून गेलं होतं. मी त्यांना माझे म्हणूं शकेन अशी परिस्थिती त्या घटकेला होती. भाऊंच्या विरोधाला न जुमानता बापूंच्याबरोबर सात पावलं चालण्याची हिंमत आज ह्या घटकेला माझ्यांत खचित होती.

मी एकदम अत्यानंदानं म्हटलं, 'बापू, ह्या क्षणाला मी तुमची व्हायला तयार आहे.'

मी दोन पावलं पुढें सरकलें तसें बापू दोन पावलं मागें झाले. 'नको, तो मोह आतां आवर. ते शक्य नाहीं. फार उशीर झाला' असं म्हणत त्यांनीं माझ्याकडे दृष्टी टाकली क्षणभर पायापासून वर मस्तकापर्यंत न्याहाळलं; जणूं आपल्या हृदयांत ते मला सांठवून घेत असावे आणि लगेच दार धाड्दिशी लोटून ते बाहेर गेले—-

बापू असं म्हणून एकाएकी कां निघून गेले हें मला कळलं नाहीं. त्याचं वागणं नेहमींच असं विचित्र नव्हतं काय! त्यामुळें उघडपणें बोलण्याचा मला

कधीं धीर झाला नाही. आणि आज एकमेकांच्या भावना परस्परांना कळूनही बापू असे परत कठोरतेनं माझ्याशीं वागत होते. 'बापू ऽ ऽ थांबा' असं म्हणत दार उघडून मी बाहेर धांवले. पण छे, त्यांची ती भव्य आकृती दूरवर सुद्धां कुठें दिसेना.

मी बाहेर व्हरांड्यांत आले; तेव्हां संध्याकाळचं वर्तमानपत्र टाकणारा पोऱ्या सायकलवरून बांधलेल्या गठ्यांतून एक पेपर काढीत होता. 'ह्या बाजूनं कुणी गलं काय!' असं मी त्याला विचारलं, त्यानं नकारार्थी मान हलाविली आणि पेपर माझ्या हातांत दिला-तो हातांत घेण्याकडेसुद्धा माझं लक्ष नव्हतं. माझ्या हातांतून गळून तो जमिनीवर पडला. आणि वाऱ्यानं त्याचीं पानं फडफडली तो वाचण्या-करतां मी उचलणार तेवढ्यांत-तेवढ्यांत त्या ठळक वाक्यांवर माझे डोळे खिळले—

'इथल्या राष्ट्रीय शाळेला दीड लाखांची देणगी देणारे चंदेरीचे मालगुजार बापूसाहेब हे काल रात्रीं हृदयाच्या विकारानं मृत्यू पावले. ते इथल्या सगळ्या शेतकऱ्यांचे कैवारी होते. सगळ्यांचं त्यांच्यावर अपूर्व प्रेम होतं. त्यांच्या मृत्यूमुळें शेतकऱ्यांची जी हानी झाली आहे ती ...!'

ती बातमी मी कशी वाचली कोण जाणें. घामानं माझं सगळं अंग डबडबून निघालं. मी आंत खोलींत कशी पोचलें तें माझं मलाच माहिती.. नर्श उचलण्याचं सुद्धां सामर्थ्य माझ्याजवळ उरलेलं नव्हतं. मी तशीच स्टॅन्डजवळच्या स्टुलावर बसले अन् ज्या ठिकाणीं चित्रांत बापूंचे पाय होते त्या ठिकाणीं नकळत डोकं टेकविलं. माझे डोळे आपोआप मिटले गेले आणि आजूबाजूला काय आहे ह्याबद्दलची शुद्ध हलके हलके अस्पष्ट होत गेली.

# खरेदी ........................................ १

जार्ज आणि शरका यांचा मे महिन्यांत प्रीतिविवाह झाला. त्यावेळीं हवा मोठी सुरेख होती. नुकतेंच लग्न झालेलं ते तरुण जोडपं रजिस्ट्रेशन ऑफिसमधून बाहेर रस्त्यावर आलं. बाहेर उभा असलेल्या मित्रानीं त्याचं अभिनंदन केलं. हा सगळा अभिनंदनाचा सोहळा आटोपल्यावर शांत, रोड आणि छाती कांहींशी खोल गेलेल्या जार्जनं शरकाकडे पाहून विचारलं.

" आता कुठं जायचं आपण ?"

उंच, देखण्या, परंतु विस्तवासारख्या तापट अशा शरकानं त्याच्या कोटाच्या बाहीला हात घासत आणि नागपुड्या फुगवीत म्हटलं.

अर्थात् दुकानांत ? खरेदी करायाची नाहीं काय ?"

" म्हणजे, फर्निचर घ्यायचं होय ? "—असं म्हणून तो हसला; आणि, चालतां चालतां आपल्या डोक्यावरची टोपी त्यानं नीट केली.

बाज़ारांत जिकडे—तिकडे धुळ होती. दुकानाच्या पुढं मांडून ठेवलेल्या फक्या रंगाच्या शाली कोरड्या हवेच्या झुळकीनं मागे पुढे होत होत्या. दोन दुकानांतल्या ग्रामोफोनची, अधिक कर्कश कोण वाजवितं, या बाबतींत जणूं स्पर्धा चालली होती ! दुकानांत टांगलेल्या आरशांत वर सूर्याचीं किरणं चकाकत होतीं. दुकानांत ठेवलेल्या सगळ्याच आकर्षक आणि सुरेख वस्तु गिऱ्हाईकाचं अंतःकरण वेधून घेणाऱ्या होत्या.

शरकाचे गाल गुलाबी झाले, कपाळावर घाम आला आणि केसांतून फुल खाली गळलं. तिचे टपोरे डोळे आणखीच मोठे झाले. जार्जचं कोपर आपल्या हातानं घट्ट पकडीत, खालचा ओठ दाबीत तिनं जवळ जवळ त्याला रस्त्यांतून ओढत नेलं.

गुदमरलेल्या आवाजांत ती म्हणत होती, " पहिल्यांदा रग घ्यायचा, प्रथम रग. " त्यांनीं दोन चौकोनी रग खरेदी केले. ते चांगले जाडजूड होते; परंतु खूप रुंद आणि लांबीला त्या मानानं कमी होते. एक अगदी भडक लाल होता, आणि दुसऱ्यावर फुलांची नक्षी होती.

नंतर आवढा गिळीत नवऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहत तिनं म्हटलं, " आता चप्पल खरेदी करूं या. तिला लाल टाच हवी; म्हणजे कुणी चोरल्या, तर चटकन् ओळखायला येईल. "

त्यांनीं दोन चपलांचे जोड खरेदी केले. दोन पुरुषांचे आणि दोन स्त्रियांचे. त्या सगळ्यांना खाली लाल टाचा होत्या. शरकाचे डोळे विलक्षण उल्हासानं चमकूं लागले !

नंतर नवऱ्याच्या खांद्याला डोकं घाशीत तिनं म्हटलं, ' आता टॉवेल्स ! त्याच्यावर विणलेले कोंबडे हवेत ! " टॉवेल्सच्या जोडीला त्यांनीं दोन ब्लँकेट खरेदी केले, एक गजराचं घड्याळ, एक आरसा, कुठल्यातरी जनावराचं चित्र असलेली एक सतरंजी, दोन सुरेखशा खुर्च्या आणि खूपशी लोकर, त्यांना पलंगा-वर घालायची एक मोठी चादर आणि आणखी पुष्कळच गोष्टी खरेदी करायच्या होत्या; परंतु त्यांच्याजवळ फारसे पैसे नव्हते. हातांत मोठमोठीं पुडकीं घेऊन तीं दोघेही परत आलीं. जॉर्जनं दोन्ही खुर्च्या आणि खुर्च्यांनंतर गुंडाळी केलेला रग धरला होता. घामानं त्याचे केस ओले चिंब होऊन कपाळावर चिकटले होते आणि घामाचे ओघळ त्याच्या खप्पड गालांवरून खाली वाहत होते त्याच्या डोळ्यांखालीं काळीं वर्तुळें होतीं. अर्धवट उघड्या असलेल्या त्याच्या तोंडांतून घाणेरडे दांत दिसत होते आणि मधून मधून त्याला खोकल्याची उबळ येत होती !

घरीं पोचल्यावर सुटकेचा निःश्वास टाकून त्यानं डोक्यावरची टोपी काढली आणि तो खोकूं लागला. तिनं आपल्या हातांतलं सगळं सामान एका पलंगावर टाकलं आणि खोलींत चारी बाजूला नजर फिरविली. आणि, प्रेमानं अल्लडपणें त्याचं मनगट दाबीत म्हटलं.

"चल, चल, फार खोकूं नकोस असा. असा खोकायला लागलास तर लवकरच क्षयानं मरशील ना ? आतां माझी सुद्धां तूं काळजी घ्यायला हवीस, नाहीं कां ?" असं म्हणत तिनं आपले गाल त्याच्या गोड खांद्याशी घांसले.

संध्याकाळीं पुष्कळसे पाहुणे जमले आणि लग्नाची मेजवानी झाली. त्यांनीं खरेदी केलेल्या सामानाचं सगळ्यांनीं कौतुक केलं, स्तुति केली, त्यांच्या लग्नानिमित्त ते व्होडका नावाची दारू प्याले, त्यांनीं मिठाई खाल्ली, ते नाचले आणि लवकरच निघून गेले. जसं व्हायला हवं होतं तसंच सगळं घडलं !

पाहुणे निघून गेल्यावर जॉर्ज आणि शरका यांनीं मोठ्या अभिमानानं त्या वस्तूंच्याकडे नजर टाकली. शरकानं मोठ्या काळजीपूर्वक वर्तमानपत्रांनीं खुर्च्या झाकून टाकल्या, बाकीच्या वस्तु कुलुपांत बंद केल्या व रग ट्रंकेंत जपून ठेवले. मध्यरात्रीच्या सुमारास शरका एकाएकीं दचकून उठली. आणि तिनं नवऱ्यालाही उठवलं.

"हें, बघ, जॉर्ज, ए जॉर्ज ऊठ ना" त्याला हलवीत तिनं पुढं म्हटलं, "उठ रे ! मला वाटतं, आपण खूप मोठी चूक केली. आपण तो पिवळ्या रंगाचा रग घ्यायला हवा होता. तो याच्या पेक्षाही जास्त सुरेख होता. आणि, चप्पल सुद्धां भलत्याच खरेदी केल्या, खरं म्हणजे, आपण विचारच केला नाहीं ! त्याला काळ्या रंगाची टाच हवी होती; तर मग ते ... अहा ! त्या लालपेक्षा सुद्धां छान दिसले असते—खरं म्हणजे, आपण नीट निरखून खरेदी केलीच नाहीं."

सकाळीं जॉर्ज आपल्या कामावर निघून गेला. शरका सैंपाकघराच्या मागच्या बाजूस उभी राहून शेजारणीशीं गप्पा करूं लागली. पाच मिनिटं नवऱ्याच्या प्रकृतीबद्दल गप्पा केल्यावर तिनं त्या बाईला आंत खोलींत आणलं, ट्रंक उघडून सगळ्या वस्तु दाखविल्या आणि खरेदी केलेला रग हातांत घेऊन सुस्कारा सोडीत तिनं म्हटलं, "खरं म्हणजे, आम्ही फार मोठी चूक केली ! तो पोपटी रंगाचा रग या पेक्षा अधिक छान होता पण तो खरेदी करण्याचं लक्ष्यांतच राहीलं नाहीं——खरंच केवढा मूर्खपणा केला !

तिचे डोळे आणखीच टपोरे होऊन त्यांत पाणी चमकलं.

प्रोफेसरची पत्नी असलेल्या त्या प्रेमळ म्हाताऱ्या शेजारणीनं सगळ्यांचा स्तुति केली आणि म्हटलं, " सगळं कसं छान आहे; पण तुझा नवरा पुष्कळच खोकतो. आमच्या घरीं सुद्धा त्याचं खोकणं एक येतं. तूं त्याची काळजी घ्यायला हवीस नाहीं तर–तुला माहीत आहे ना.... ." शरकानं जरा उडतच उत्तर दिलं.

"अं, त्यांत काळजी करण्यासारखं कांहीं नाहीं. तो मरत खास नाहीं; आणि जरी मेला, तरी बिघडतंय कठे ! मी दुसरा नवरा पाहीन !"

परंतु दुसऱ्याच क्षणीं तिचं मन चरकलं.

तिनं आपल्या मनाशी म्हटलं, " अर्थात् मी त्याला पौष्टिक अन्न खायला घालीन. त्यानं खूप खायला हवं."

*　　　　*　　　　*

महिन्याच्या अखेरपर्यंत त्यांनीं कसेबसे दिवस काढले. जॉर्जचा पगार होतांच ते बाजारांत गेले. आणि पोपटी रंगाचा रंग व घरांतील इतर वस्तूंची त्यांनीं खरेदी केली. रात्री अंधारांत दिसणारं घड्याळ, बीव्हरच्या फरचे दोन तुकडे, फुलं सजविण्याचा मोठा फ्लॉवरपॉट, अगदी आधुनिक तऱ्हेच्या चपला, प्लॅस्टरचा एक सुरेखसा कुत्रा, एक लोकरीची शाल, हिरव्या रंगाची एक छोटीशी ट्रंक आणि त्याला पितळेचं एक सुरेखसं कुलूप.

घरीं आल्यावर शरकानं त्या सगळ्या वस्तु नीट व्यवस्थित नव्या ट्रंकेत ठेवल्या.

रात्रीं ती परत दचकून जागी झाली. घामानं चिंब झालेल्या नवऱ्याच्या कपाळावर हात ठेवीत तिनं म्हटलं,

" जॉर्ज, झोपलास काय ? हे बघ झोपूं नकोस. ए जॉर्ज, ऐकतोस ना ?... तिथं आणखी एक निळ्या रंगाचा रंग होता. तो सुद्धा आपण घ्यायला हवा होता. खरंच मोठा सुरेख रंग होता तो... .."

*　　　　*　　　　*

एक दिवस शरकानं आपल्या शेजारणीला म्हटलं, "माझ्या नवऱ्याला सुट्टी मिळते आहे पंधरा दिवसाची घेणार आहे तो; आणखी अर्धा पगार सुद्धा. आम्ही लवकर अगदी तावडतोब एक लोखंडी पलंग घेणार आहोंं—अगदी नक्की!"

उकडलेले बटाटे थंड पाण्यांत टाकीत त्या शेजारणीनं म्हटलं, "तुला एक सूचना करूं कां? तूं तुझ्या नवऱ्याला एखाद्या चांगल्या सॅनिटोरियम्मध्ये पाठीव नाहीं तर मग फार उशीर होईल पहा!"

रागारागानं शरकानं उत्तर दिलं, "त्याला काय होणार आहे? एखाद्या सॅनिटोरियम् पेक्षांहि मी त्याची चांगली काळजी घेईन. मी त्याला तळलेल्या शेवया देणार आहे खायला. खाऊं दे त्याला हव्या तितक्या.

तेव्हां त्या दिवशीं संध्याकाळीं बाजारांतून खूपशी खरेदी करून तीं दोघेंहि परत आलीं. त्यांनीं खरेदी केलेल्या पितळेच्या भांड्यांत आपल्या उत्साही चेहऱ्यांचं प्रतिबिंब पडलेलं जेव्हां शरकानं पाहिलं, तेव्हां तिला मनापासून आनंद झाला. जॉर्ज मात्र खूप थकलेला होता. छातीशीं त्यानं निळ्या रंगाची मोठी जाड गुंडाळी धरली होती; त्यावर आपली चिंचोळी हनुवटी टेकवली होती. त्याच्या कपाळाच्या टोकांवर घामाचे मोठमोठाले थेंब जमा झाले होते.

त्या रात्री शरका परत जागी झाली. तिच्या मनांतले विचार तिला कांहीं केल्या झोप घेऊं देईनात!

तिनें हलकेंच म्हटलं, ए जॉर्ज, तिथं जांभळ्या रंगाचा एक···ऐकतोस ना रे? काय मूर्ख आहोंत आपण! तोच घ्यायला हवा होता. किती छान होता. अगदी जांभळा—जांभळा, आणि गुलाबी रंगाचे सुरेख काठ. जॉर्ज! या सगळ्यापेक्षां तोच खूप छान होता रे!"

*　　*　　*

शरदृतूंत एका सकाळीं जॉर्ज, अखेरचा बाहेर पडतांना दिसला. त्या छोट्याश्या गल्लींतून जातांना त्याच्या शरीराचा तोल जात होता. त्याचं लांब अण-

कुर्चीदार पातळ नाक त्यानं घातलेल्या जाकिटाच्या कॉलरमागं दडलेलं होतं. त्याच्या रुंद पैजाम्यांतून रोडके पाय सहज दिसत होते. त्याची छोटीशी टोपी डोक्याच्या मागच्या बाजूला बसली होती. घामानं ओले चिंब झालेले केस कपाळावर चिकटून बसले होते.

झोकांड्या खात जातां जातां बूट ओले होऊं नयेत, म्हणून रस्त्यांतील पाण्यानं भरलेले खड्डे तो मोठ्या काळजीपूर्वक टाळींत होता. अशक्त परंतु आनंदी, समाधानाचं हास्य त्यच्या फिक्या चेहऱ्यावर झळकत होतं. परंतु घरीं आल्याबरोबर त्याला एकदम अंथरुणावर पडावं लागलं; मग शेजारचा एक डॉक्टर आला. शरकानं इन्शुरन्स कंपनीकडे धाव घेतली. ती एकटीच दुकानांत गेली. पण येतांना जांभळा रंग घेऊन आली आणि तिनं तो व्यवस्थित ट्रंकेमध्यें ठेऊन दिला.

जॉर्जची स्थिति हळूंहळूं खालावत गेली. बर्फ पडायला सुरुवात झाली. हवा सगळी दमट होऊन गेली. प्रोफेसर आणि त्याची बायको एकमेकांच्या कानाशीं लागलीं आणि लगेच दुसरा डॉक्टर आला. त्यानं रोग्याला तपासलं आणि मग तो हात धुण्याकरतां सैपाकघराच्या मागच्या बाजूस आला. धुराच्या वर्तुळांत अश्रु भरल्या डोळ्यांनीं शरका उभी होती. स्टोव्हवर ती शेवया तळीत होती. त्या प्रोफेसरच्या बायकोनं आश्चर्यानं म्हटलं." तुला वेड नग लागलं नाही ! तूं त्याला खरोखरच मारशील ! तो तळलेल्या शेवया पचवूं शकेल, असं तुला वाटतं तरी कसं ! '

हाताच्या बाहीनं डोळे पुशीत रडत शरकानं उत्तर दिलं, " शेवया खाऊन काय होणार आहे त्याला ? कांहीं होत नाहीं ! "

हात धुतां धुतां डॉक्टरांनीं म्हटलं, " यापुढे आता तो कांहींहि खाऊं शकतो"

संध्याकाळच्या सुमारास पांढरा शुभ्र युनिफॉर्म घातलेला दवाखान्यांतला एक माणूस आला. त्यानं सगळं घर जंतुनाशक द्रव्यानं साफ केलं. तो वास

घरांत जिकडे–तिकडे दरवळला. रात्रीं शरका दचकून जागी झाली. तिचे डोळे विलक्षण करुण दिसत होते !

तिनं ओढवलेल्या आवाजांत म्हटलं, "जॉर्ज, जॉर्ज, उठ ना! मला कांहीं सांगायचं आहे तुला–ए जॉर्ज......"

परंतु जॉर्जनं उत्तर दिलं नाही.तो अगदी थंड होता. ती अंथरुणावरून उठली आणि अनवाणी पायानं हॉलमध्यें फेऱ्या घालूं लागली. पहाटे तीन वाजण्याचा सुमार होता, पण तिला कांहीं केल्या झोप येईना.

"तो गेला ! गेला ! " असं म्हणत तिनं भीतिलं किंकाळी फोडली. "गेला! अरे देवा ! मेला की तो–जॉर्ज ! बिचारा जॉर्ज ! "

तिनं रडायला सुरवात केली. शेजारी त्यांच्या दारांतून डोकावूं लागले. हिंवाळ्यांतील चांदण्या त्या अंधारांत चमकूं लागल्या.

सकळीं शरकाचं लाडकं मांजर तिच्या खोलीच्या दाराशीं आलं. दार ढकलीत त्यानं आंत तोंड घातलं; आणि त्याच्या अंगावरचे केस ताठ उभे राहिले. त्या खोलीच्या मध्यभागीं शरका बसली होती. तिचा सगळा चेहरा आसवांनीं भरून गेला होता. ती रागारागानं शेजारणींना म्हणत होती, " मी त्याला म्हणत होतें, तूं शेवया खा ! परंतु तो खात नव्हता. मी केलेल्या सगळ्या शेवया पहा तशाच पडलेल्या आहेत ! मी आतां काय करूं त्याचं ? आणखी गाढवा ! मला एकटीला सोडून कशाला गेलास ! माझ्या शेवया खाल्ल्या नाहीं आणि एकटाच चालला गेला !…… बिचारा जॉर्ज ! "

त्यानंतर शरका कांहीं दिवस दुःखी दिसत असे. नंतर हळू हळू सगळं पूर्वासारखं घडूं लागलं. शरकानं परत नोकरी धरली. हिंवाळ्याच्या सुमारास तिला पुष्कळांनीं मागणी घातली परंतु तिनं नकार दिला. शांत स्वभावाच्या माणसाची ती वाट पहात होती. बाकीचे सगळे जणूं तिच्या जवळ ज्या वस्तू होत्या, त्याच्या लोभानं तिला मागणी घालीत होते !

हिंवाळ्याच्या अखेरसि ती फार रोड झाली आणि काळ्या लोकरीचा गरम झगा घालूं लागली. परंतु तो तिला छान दिसत असे. तिथल्या एका गॅरेजमध्यें इव्हान नावाचा एक ड्रायव्हर होता. मोठा शांत, विचारी आणि दयाळू. तो शरकाच्या प्रेमांत पडला आणि वसंत ऋतुच्या सुमारास तीहि त्याच्यावर प्रेम करूं लागली.

हवा मोठी छान होती. रजिस्ट्रारच्या ऑफिसमधून बाहेर आल्यावर तिथं जमलेल्या मित्रांनीं त्यांचं अभिनंदन केलं आणि नुकतंच लग्न झालेलं तें तरुण जोडपं रस्त्यावर आलं.

किंचित् लाजत शरकाकडे पाहत तरुण इव्हाननं विचारलं, " आता कुठं जायचं आपण ? "

ती त्याच्या जवळ सरकली. आपल्या केसांतल्या फुलानं त्याच्या कानाला तिनं गुदगुल्या केल्या. नाकपुड्या फुगवीत तिनं अखेरसि म्हटलं, " अर्थात् दुकानांत खरेदी करायची नाही काय ? "

—आणि, क्षणांत तिचे टपोरे डोळे उत्साहानं चमकले !

# दोन जिवांची कहाणी........................१०

सिनेमा सुरू व्हायला सात आठ मिनिटांचा अवकाश होता. थिएटर जवळ जवळ " फुल " होतं. रिकाम्या राहिलेल्या जागा भरत होत्या आणि ज्यांच्यासाठीं जागा शिल्लक नव्हती ते परत जात होते.

मी हातांतलं मासिक उगीचच चाळल्यासारखं केलं, पण माझं कांहीं लक्ष लागेलसं दिसेना. किंबहुना मी सिनेमाला आले होते ते सुद्धां माझ्या मनाला त्रास देणारे विचार थोडावेळ तरी बाजूला ठेवण्यासाठीं. आपल्या मनाची ही परिस्थिती किती काल टिकणारी आहे हे माझं मलाच समजण्यासारखं नव्हतं.

मी उगीचच इकडे तिकडे नजर टाकली. मी ज्या क्लास मध्यें बसलें होतें तो तर पूर्णपणें भरलेला होता. स्त्रिया, पुरुष, सगळेच होते. किंमती अत्तराचा सुगंध सुटलेला होता, आणि जॉर्जेट, बनारसी साड्या इत्यादी मृदू वस्त्रांची हलकेच होणारी सळसळ अस्पष्टपणें ऐकूं येत होती. ते सगळेजण कदाचित् आनंदांत असतील. चित्रपटापासून मिळणारा आनंद अगदीं मनमुराद लुटायचा त्यांचा बेत असेल. माझ्यासारख्या मनस्थितींत असलेली स्त्री ह्या क्लासांतच काय पण सबंध थिएटर मध्यें मीच असेन.

माझ्या मागच्या खुर्च्यांत् वर दोन गोरे ऑफीसर येऊन बसले. मी क्षणभर मागे मान वळवून त्यांच्याकडे पाहिलं. लालबुंद गाजरासारखे चेहरे—दोघंही परस्परांची चेष्टा करून मोठमोठ्यांदा हंसत होते. त्यांच्याकडे पाहतांच माझ्या मनांत आलं— घरच्या आठवणीं ह्यांना कधीं त्रास देत नसतील ? ह्यांची पत्नी, प्रिया, कुणाचाच विरह जाणवत नसेल ? इतक्या लांब येऊनही— ?

माझ्या हाताला सुयांचा स्पर्श झाल्यामुळें मी दचकून बाजूला नजर टाकलीं. माझ्या शेजारची गौरकाय तरुणी लोकरीचं शिवण करीत होती. तिच्या हातांतल्या त्या सुयांचा माझ्या हाताला स्पर्श झालेला होता. माझं दचकणं तिच्या चटकन् लक्ष्यांत आलेलं असावं. क्षणभर दोन्हीं सुयांची हालचाल थांबवून तिनं म्हटलं "माफ करा हं–"

मी तिच्याकडे नजर टाकली आणि हंसून म्हटलं—" हरकत नाहीं. " तिचे डोळे परत खालीं वळले पण माझे डोळे मात्र अजूनही तिच्याकडे खिळले होते. मानेपर्यंत कापलेले सोनेरी रंगाचे केस, खुप विपूल केस होते. कानाच्या जवळ पिन्स लाऊन तिनं ते कानामागून वळविलेले होते. गालांवर अन् ओठांवर रंग होता. स्कंध आणि गळ्याजवळचा भाग जवळ जवळ उघडाच होता. फ्रॉकवरच्या निळ्या फूलपाखरांच्या रंगाशीं आणि तिच्या डोळ्यांशीं साम्य होतं खरं. दोघांचाही रंग गडद निळाच होता; आणि उघड्या असलेल्या गळ्यांतही निळया मण्यांची माळ होती. एवढंच नव्हे तर तिच्या हातांत असलेल्या लोकरीचा रंगही निळाच होता. ती रंगसंगती

पाहून मला जरा हंसायलाच आलं. तिची बोटं झर झर मागं पुढं होत होतीं त्या बोटांच्या मधून सुया फिरत होत्या—

मी तिच्या शिवणांकडे पहात आहे हे तिच्या लक्ष्यांत आलं असावं. तिनं वर पाहून म्हटलं, " कसं झालं आहे ? "

मी त्याचा एक कोपरा हातांत घेतला आणि म्हटलं, " छान आहे. विण तर फारच सुरेख आहे. कशी करतेस तूं ही ? "

ती हंसत होती. तिच्या भिंवया तिनं कापलेल्या नसाव्यात. कदाचित् त्या मुळच्याच इतक्या बारीक असतील. तिच्या निळसर डोळ्यांतले ते भाव पाहून— आपल्याशीं कुणाची तरी ओळख झाली ह्याचा तिला आनंद झाला होता की काय कुणास ठाऊक. कदाचित् तिच्या झबल्याचं माझ्यासारख्या परक्या मुलीनं केलेलं कौतुक तिला अभिमानास्पद वाटलं असावं म्हणूनही कदाचित्—

ती माझ्या बाजूला वांकली. तिच्या सोनेरी केसांचा मला ओझरता स्पर्श झाला. तिच्या केसांचा सुगंध मला स्पष्टपणें जाणवला. आपल्या हातांतलं शिवण माझ्या अगदी जवळ आणीत ती म्हणाली, " हे बघ. अगदी सोपी आहे. हे चार उलटे, नंतर दोन सुलटे, मग जिथे उलटे तिथं सुलटे करायचे अन्..."

तेवढ्यांत दिवे विझले. दारावर पडदे सरकवल्या गेले आणि पडद्यावर **Vfor Victry** झळकली.

ती माझ्यापासून दूर झाली. तिच्या बोटांची हालचाल आतां थांबली होती. आणि डोळे पडद्यावर खिळले होते. माझं मात्र मुळींच लक्ष लागेना. ब्रिटीश मुव्हीटोन न्युजचा एकेक भाग पडद्यावरून सरकत होता. कुठल्याशा शहरावर बॉम्बचा हल्ला झाला होता त्यांतले भाग दाखवित होते. त्या शहरांतली बायका मुलं गोंधळून इकडे तिकडे पळत होते. इमारती एकामागून एक कोसळल्या होत्या. त्यांच्या मागून शिपायांची पलटण, नंतर ऑफीसरनीं भरलेल्या ट्रकस पडद्यावरून हळके हळके सरकत होत्या. ते पाहतांच ज्या विचारांना मी इतका वेळ बाजूला सारण्याचा प्रयत्न

करीन होते त्याच विचारांनीं परत उचल घेतली मी डोळे मिटून घेतले. नाहीतरी चित्रपट पाहण्यांत माझं लक्ष लागणार नव्हतं हे उघड होतं. ती पडद्यावरची बातमी संपेपर्यंत डोळे उघडायचेच नाहीं. पण मी डोळे मिटले म्हणून माझ्या मनांतले विचार दूर झाले होते अशांतला कांहीं भाग नव्हता. उलट एकेक विचार माझ्या मना-पुढू न सरकून जाऊं लागला. बादशाही कमीशन घेण्यासाठीं जयंतनं माझी परवानगी मागीतली तेव्हां मी त्याच्या बेताला ! मोडता घातला होता. शेवटी त्याचा आग्रह पाहून जवळ जवळ नाखुषीनेच कां होईना पण परवानगी दिली होती. जयंतला नोकरी नसल्यामुळें आम्ही दोघंही लग्न करण्याचे थांबलो होतो. परंतु त्यानं हे कमीशन स्विकारणं म्हणजे आमच्यापासून किती तरी काळ दूर राहण्याचा निश्चय करण्यासारखं होतं. जयंत जवळ होता त्यावेळी नोकरी नव्हती, आणि आतां नोकरी होती त्यावेळी जयंत नव्हता. एकूण मनुष्य सुखाचा पाठलाग करतो आणि ते त्याला हुलकावणी देऊन दूर पळतं हेच खरं होतं काय ?

सुट्टी घेऊन परत आल्यानंतर आम्ही लग्न करायचं ठरविलं होतं पण ट्रेनिंग संपल्यावर जयंत एकदम हिंदुस्थानच्या बाहेरच गेला. किती दिवस त्याची पत्र येत होती, त्यावेळी तो उत्तर आफ्रिकेंत आघाडीवर होता. नंतर त्याचं पत्र नव्हतं. त्याच्या वडिलांनीं खुप चौकशी करून पाहिली, पण कांहींच बातमी कळली नाही. शेवटीं पंधरा दिवसांपूर्वी त्याच्या खिशांतले कागद व त्याचं नांव असलेलं एक पुस्तक त्याच्या पलटणीतल्या लोकांना सांपडलेलं होतं; ते त्याच्या वडिलांच्या-कडे पाठविण्यांत आलं. त्यावरून एकतर तो कैदी म्हणून तरी पकडल्या गेला असावा किंवा......

दुसरी कल्पना मनांत येताच माझं मन दुःखानं गोंधळून जाई. जयंत ह्या पुढे आपल्याला दिसणार नाही आणि आपल्या जीवितांतलं सगळं सुख संपलं असं मानायची पाळी आपणांवर कधीनां कधीं तरी येणार ही कल्पनाच मुळी माझ्या मनाला सहन होईना. त्या गेल्या पंधरा दिवसांपासून एक प्रकारच्या विचित्र मन-स्थितींत माझं मन सांपडलेलं होतं, आणि त्यांतून जरा तरी विरंगुळा मिळावा म्हणून अलिकडे रोज चित्रपटाला येण्याचा कार्यक्रम मी चालू ठेवला होता.

मी डोळे उघडले. ती माझ्या खांद्यांवर हात ठेऊन हलकेच म्हणत होती, "तूं फार थकली आहेस काय ?"

मी मान हलवून म्हटलं, हं थोडीशी पण आंता बरं वाटतं आहे, मुव्हीटोन न्युज संपलेली होती. आगामी चित्रपटांचे ट्रेलर्स संपल्यानंतर M. G. M. Presents, Joan Fontaine and Tyron Power, in This above all" असं पडद्यावर झळकूं लागलं, आणि मग मी देखील हळूं हळूं चित्रपटांत रमूं लागले.

मध्यंतराच्या वेळी माझं मन बरंच हुषार झालेलं होतं. थिएटर मध्यें दिव्यांचा चकचकाट होऊन दारावरचे पडदे दूर सरकल्यावर ती माझ्याकडे वळून म्हणाली, "बाहेर येतेस काय ? आपण कांहींतरी पेय घेऊं या."

मी तिला चटकन् होकार दिला. माझ्या ह्या अनोळखी मैत्रीणीबद्दल माझं कुतुहल खुपच वाढलेलं होतं, ह्यापुढें निदान तिचं नांव तरी मी विचारायला हवं होतं. नांव विचारल्याखेरिज ही ओळख मी तशीच राहूं दिली असती तर माझाच वेडेपणा झाला असता.

रासबेरीचे घुटके घेतां घेतां मी तिला प्रश्न प्रथम विचारला. तिनं आपलं ख्रिश्चन नांव प्रथमच सांगितलें, आणि म्हणाली, " तूं मला नुसतं मायरा म्हणून हांक मारलंस तरी चालेल." हळूं हळूं ती कुठून आली ह्याची हकिगत मी काढून घेतली. ती झेकोस्लोव्हेकियन् होती. तिथल्या एका शाळेंत अध्यापिकेचं काम करीत होती. झेक् लोकांवर जर्मनांचे आक्रमण झाल्यावर ती तेथून पळाली; आणि हिंदुस्थानांत अनेक निर्वासित लोकांच्या बरोबर आलेली होती. फक्त ती आणि तिची आई दोघीच इथें होत्या. भाऊ लढाईवर होता आणि......सांगता सांगता तिचे डोळे पाण्याने भरून आले होते. ती एकाएकी का अडखळली हेच मला समजेना. कुणाची तरी आठवण तीव्रतेनं तिच्या मनांत दाटलेली असावी. छोट्याश्या रूमालानं तिनं आपले निळे डोळे पुसले आणि म्हणाली,

" ह्या सगळ्यांच्या आठवणी कांहीं काल दूर ठेऊन मी माझं मन दुसरीकडे वळवूं शकते पण रोनॉल्ड ची आठवण झाल्याबरोबर मात्र माझ्या मनाचा सगळा तोल नाहींसा होतो. अन् कांहीं सुचत नाहीं. त्याच वेळी आपण आपला देश सोडून दूर कुठंतरी परक्या देशांत येऊन पडलों आहे ही जाणीव तीव्रतेनं होते आणि मग जर्मन लोकांचा येणारा संताप कसा आवरावा ते कळत नाही— " असं म्हणून ती कांहीं वेळ स्तब्ध ऐकली.

ती स्तब्धता दोघांनाही असह्य झाली होती. कांहीं तरी बोलायचं म्हणून मीच म्हटलं, "रोनॉल्डची आणि तुझी भेट होण्यासारखी नाही कां ? केव्हां तरी अशी वेळ येईलच की तुम्ही सर्व एकत्र चाल." तिनं मान हलवून म्हटलं, "अं ऽऽ हं. ती आशा आंता उरलेली नाही. रोनॉल्ड मला कधींच भेटायचा नाही हीच कल्पना मी मनाशी धरून चालावं हे ठीक. अर्थात त्याचं दुःख मी मानीत नाही माझ्या इतकाच आमचा देशही रोनॉल्डला प्रिय आहे, मग आपल्या आईची सुटका करण्याकरतां जर तो झगडत असला तर मी त्यांत आनंदच मानला पाहिजे. त्यानं आपलं सर्वस्व माझ्याच करतां खर्च करावं असा हट्ट मी धरला तर तो कदाचित् स्वार्थीपणाचा ठरेल. "

ती स्तब्ध झाली. माझ्या मनांत आलं, आमच्या दोघींच्याही भावनांत किती विलक्षण अंतर आहे. ज्या कल्पनेवर ती सुख मानीत होती ती कल्पना आनंद-दायक होती खरी पण तीच कल्पना माझ्या बाबतींत किती विलक्षण होती ! जयंत मला सोडून स्वतः च्या आईची सुटका करण्याकरतां गेलां होतां काय ?

ग्लास मधल्या उरलेल्या पेयांकडे पहात ती म्हणाली, " आमचा देश जर्मन आक्रमणाखाली चिरडल्या गेल्याबरोबर शत्रूंचा सूड उगविण्यासाठीं रोनॉल्ड दोस्तांच्या फौजेंत कमीशन घेऊन दाखल झाला. त्याचा ध्येय पूर्ण झाल्याखेरीज जीवितांत एकत्र यायचं नाही असं आम्ही ठरविलं. पण आज कित्येक दिवस झाले मला त्याची बातमी कळलेली नाही, अन् मी कुठं आहे हे त्याला माहित नाही. मी

चौकशी करते आहे—-अजून तपास लागलेला नाही. कुठल्या तरी आघाडीवर असावा असं वाटतं.

माझं पेय संपलं होतं पण तिचा ग्लास अजून पुष्कळच रिकामा व्हायचा होता. ती पेय घेऊं लागली तेव्हां मी तिला जयंतची हकिगत सांगितली अन् म्हटलं, " हे युद्ध मोठं दुष्ट आहे ह्यांत शंका नाही. "

तिनं रिकामा ग्लास खालीं ठेवला आणि म्हटलं,

" तुझा अन् जयंतचा विरह झाला म्हणून तूं असं म्हणतेस कां ! पण मला एकीकडून वाटतं, ह्या युद्धामुळें फार मोठा फायदा होणार आहे. नाहीपेक्षां परक्या देशांतल्या दोन समदुःखी व्यक्ती इतक्या मोकळेपणाच्या भावनेनं बोलतांना दिसल्या असत्या काय ? ही परस्परांबद्दल आपुलकी निर्माण होतानां दिसते आहे ती निर्माण झाली असती काय ? आपल्या प्रियजनांचा विरह असाच सहन करावा लागेल. संकटांशी झगडावं लागेल, आणि दीर्घकाल फक्त एकमेकांच्या आठवणींतच सुख मानावं लागेल. ह्या सगळ्यांतून कदाचीत् जागतिक् प्रेमाची भावना निर्माण होईल, त्यांतूनच गुलामगिरीची भावना नष्ट होऊन प्रत्येक देशांत स्वातंत्र्याचा दीप चमकूं लागेल. "

आम्हीं दोघीही थोडावेळ स्तब्ध बसलो. पाहिली घंटा झालेली होती. आमच्या बाजूचीं टेबलं हलके हलके रिकामीं होत होतीं. आम्हीं बिल चुकतं केलं आणि आंत शिरलों.

त्यानंतर मायराची आणि माझी चांगलीच ओळख झाली. हिंदुस्थानी स्त्रियांची ओळख करून घेऊन त्यांच्या चालीरीती माहिती करून घ्यायची तिला खुपच हौस दिसली. मी तिला आग्रहानं माझ्याकडे बोलविलं आणि ती आलीही.

एकदां मी तिला जयंतचा फोटो दाखविला त्यावेळीं ती हंसून म्हणाली, "मोठा उमदा अन् देखणा पोरगा निवडला आहेस हं तूं. तुझं अभिनंदन करते मी."

मी हंसून तिचे thanks मानले अन् म्हटलं, रोनॉल्डचा एखादा फोटो नाहीं काय तुझ्याजवळ ?

माझा प्रश्न ऐकतांच तिनं मान फिरवुन बाजूला पाहिलं अन् क्षणभर खालचा ओठ दांताखालीं दाबून धरला. दुसऱ्याच क्षणी किंचित् हंसून ती म्हणाली,

"अंऽऽहं आम्ही पळालो तेव्हां सामानाची कुठं शुद्ध होती ! रोनॉल्डच्या फोटोचा अल्बम् घ्यायला सुद्धां सवड मिळाली नाही. पण हे बघ, आपल्या प्रिय व्यक्तिच्या ज्या आठवणी आपल्या मनांत जपून ठेवलेल्या असतात त्याचं महत्व फोटोच्या अल्बम् इतकंच आहे नाही कां !"

बोलतां बोलतां तिनं गळ्यांतलं लॉकेट उघडलं. आंत छोटसं पिवळटसर रंगाचं पान होतं. ते लॉकेट हातांत घेत मी तिला आश्चर्यानं विचारलं "हे काय ?"

"माझी अन् रोनॉल्डची सगळ्यांत ताजी आठवण आहे ही त्याची आणि माझी अखेरची भेट झालीं ती ह्या ऑलिव्ह वृक्षाच्या खालीं. त्या वृक्षाचं एक पान मी माझ्याजवळ ठेवलं आणि दुसरं रोनॉल्डनं ठेवलं. ह्या छोट्याश्या पानांत आमच्या सहवासाच्या आठवणी सांठविल्या आहेत. आम्हीं दोघं पुढं भेटूं, अगर ती आमची अखेरचीच भेट होती की काय हे मला सांगता यायचं नाही; पण रोनॉल्ड माझाच आहे ह्याची जाणीव हे पान माझ्या जीविताच्या अखेरच्या क्षणापर्यंत खास देईल."

असे किती दिवस लोटले कुणाला माहित. त्यानंतर मी राशनिंग ऑफिसांत नौकरी धरली. दिवसभर ऑफीस मध्यें माझा वेळ गुंतलेला असे पण रात्री अंथरूणावर पाठ टेकतांच खिडकींतून निळ्या आकाशांतल्या चांदण्याकडे पाहतांना माझ्या मनांत येई, "जयंत खरंच आपणाला भेटणार नाहीं !"

मात्र आमच्या दोघांच्याही परस्परांबद्दलच्या भावना अतिशय दृढ असल्या पाहिजेत. मी त्याची अतिशय काळजी करते आहे हे त्याला कदाचित् मनोमन भावनेनं कळलेलं असावं. एक दिवस ऑफिस मधून मी घरी आलें. तो त्या दिवशीच्या टपालांत परदेशांहून आलेलं एकपत्र माझी वाट पहात होतं.

होय ! जयंतचच पत्र होतं ते. ‘ Prisoner of war ’ म्हणून तो जर्मनींत होता. आज किती दिवसांनीं मी त्याचं हस्ताक्षर पहात होतें. त्यानं लिहीलं होतं.

“ तूं खूप काळजांत असशील म्हणून इथं आल्याबरोबर प्रथम तुझी काळजी दूर करण्याचं काम करतो आहे. आफ्रिकेंत पळतां पळतां माझ्या खिशां-तली कागद पत्रं कुठं हरवलींत त्याचा पत्ता नाही. तीं जर कदाचित् तुमच्याकडे आलीं असतील तर माझा निकाल लागला असं समजून तुम्हीं सगळे दुःखांत असाल. त्या कागदपत्रांत तुझाही फोटो हरवला. पण रोज मी तुझा चेहरा डोळ्या-समोर आठवतो ह्या वर्षांत तूं फार बदलींस काय ग ? माझ्या सुखसोयींत कस-लीही कमतरता नाही अगदी आनंदांत आहे मी. दुःख फक्त एवढंच कीं तुम्हां सर्वांपासून अगदी दूर आहों, अन् तुम्हीं केव्हां भेटाल ते कांहीं सांगतां येत नाही— पण लढाईच्या धामधुमींतून मोकळा झालों हे मात्र फार बरं झालं तुझं चिंतन करायला भरपूर वेळ सांपडतो आहे हे काय थोडं झालं ? मला लगेच पत्र पाठीव हं.”

जयंतचं ते पत्र पाहतांच मला क्षणभर कांहीं सुचेना. ज्यावेळीं त्या आनं-दाच्या भरांतून मी जागी झाले त्यावेळी माझ्या मनांत प्रथम मायराचा विचार आला. जयंतचं पत्र पाहून तिलाही माझ्या इतकाच आनंद झाला असता.

मी मायराकडे गेले तेव्हां बाहेरच्या बाजूला सामसूम होती. तिची म्हातारी आई बाहेरच्या व्हरांड्यांत झुलत्या आरामखुर्चीवर बायबल वाचीत बसलेली होती; त्यांचा रोव्हर पुढच्या दोन्हीं पायांत डोकं खुपसून पडला होता. मी व्हरांड्यांत जातांच मायराच्या आईनं वर मान केली आणि मायरा आंत आहे असं खुणावून परत बायबल डोळ्यासमोर धरलं.

मी आंत गेलें. मायरा तिच्याच खोलींत पाठमोरी बसली होती. तिचे खांद्या-पर्यंत कापलेले पिंगट केस वाऱ्यानं उडत होते. मी मागून जाऊन तिचे डोळे झांकले आणि लगेच माझ्या हातानां अश्रूंचा स्पर्श झाला—

म्हणजे ? मायरा रडत होती ? कशासाठीं ? मी चटकन् तिचा चेहरा माझ्याकडे वळविला. आसवांनीं तो सगळा भिजलेला होता. मी सगळा माझा उत्साह विसरले आणि तिच्या खांद्यावर हात ठेऊन हलकेच विचारलं "मायरा ! काय झालं ?" तिनं कांहीं न बोलतां बाजूचा पिवळा कागद माझ्या हातांत दिला. मायराच्या दुःखाची मला कल्पना आली. किती विलक्षण दुःखाचा हा प्रसंग ! जो दिवस माझ्या आयुष्यांत आनंदाचा ठरला होता तोच दिवस मायराच्या आयुष्यांत अति दुःखाचा ठरला होता.

मायराचा रोनॉल्ड आघाडीवर ठार झालेला होता. हातांतला कागद टेबलावर ठेवित मी सात्वनाच्या स्वरात म्हटलं, " मायरा ! तुझ्या दुःखांत मी सहभागी आहे. "

तिनं चटकन् वर मान करून हंसण्याच्या प्रयत्न करीत म्हटलं " दुःख ! छे ? मला दुःख झालं आहे असं तुला वाटतं काय ? माझ्या देशाच्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत माझा शूर रोनॉल्ड मारला गेला तर त्याचं मी दुःख काय म्हणून करावचं उलट मला अभिमान वाटण्यासारखी ही गोष्ट आहे "

होय ! अभिमान वाटण्यासारखीच गोष्ट होती खरी. मायराच्या दुःखांत अभिमानाचा भाग केवढा मोठा होता ! माझा रोनॉल्ड देशासाठीं मेला असं ती अभिमानानं म्हणू शकत होती—

आणि मी ? माझा जयंत दुसऱ्यांच्यासाठीं तिसऱ्यांच्या कैदेत पडलेला होता.

मी खिडकींतून समोर पाहलं—समोरच्या आंब्याच्या फांदीवर बसलेला चिमुकला पक्षी दोन्ही पंख उंचावून झेप घेत—निळ्या आभाळांत भुर्र दिशी उडाला--

---

# पन्नास मिनीटें ........................................ ११

फिलॉसफीचा तास संपताच खास मुलींच्या आणि प्रोफेसरांच्या करतां राखून ठेवलेल्या जिनावरून उषा सावकाश खालीं आली. पिरीयड नुकताच संपला असल्यामुळें ठिकठिकाणीं मुलांचे घोळके उभे होते. कुणी पुढच्या पिरीयड करतां जाण्याच्या गडबडींत होते तर कुणी आतां सुट्टी आहे; चला हॉटेल मध्ये जाऊं अशा विचारांत कॉलेजच्या बाहेर पडण्याचा विचार करीत होते. त्यांच्या हंसऱ्या आणि आनंदी चेहऱ्याकडे पाहून उषा क्षणभर मनांत खिन्न झाली. खिन्न झाली अशासाठीं कीं तिला जसा ह्या सगळ्या गोष्टींचा कंटाळा आलेला होता; तसा ह्या मुलांना नसेल का कधी येत ?

प्रिन्सीपॉलच्या ऑफीसला वळसा घालून ती मुलींच्या कॉमनरूमकडे वळली. एकंदर मुलींचा नंबर कॉमनरूम मध्यें किती होता कुणाला ठाऊक पण त्या मानाने गडबडीचं स्वरूप मात्र जास्त होतं. पन्नास मुलं मिळून जितकी गडबड करणार नाहींत तितकी गडबड पांच मुली करतात असं कुठल्याशा प्रोफेसरनं मुलींच्या गडबडीला कंटाळून म्हटलेलं तिला आठवलं. पांच सहा मुलींचा घोळका नोटीसबोर्ड समोर होता. तर आणखी कांहीं जणी समोरच्या विहीरीवर बसलेल्या होत्या. 'ह्या विहरींत उडी टाकली तर आपल्याला काढायला कोण कोण येईल आणि ह्या विहरींत पोहायला परवानगी कां देत नाहीं' असा बहुधां त्यांच्या बोलण्याचा विषय असावा. कुणी कुणी दुसऱ्या पिरीडला जाण्याच्या गडबडींत होत्या तर बऱ्याच जणी प्रोफेसरांच्या आणि मुलांच्या वागण्यावर टिंगल करीत उभ्या होत्या.

तथापि त्या सगळ्यांचे चेहरे अगदीं प्रसन्न आणि हंसरे होते. प्रत्येकीचा उत्साह नुसता ओसंडत होता. पोटावर डावा पंजा पालथा धरून त्यांच्यापैकीं किती तरी जणी मोठमोठ्यांदा हंसत होत्या. आपल्यालाच असं कां व्हावं हे

उषाला कळेना. पॉलिटीकसचा पिरीयड असल्यामुळें तिच्या मैत्रीणी आपआपल्या वर्गाकडे जाण्याच्या गडबडींत होत्या पण उषाला पिरीयड नसल्यामुळें ती आतां पन्नास मिनीटें कॉमनरूम मध्येंच घालविणार होती.

तिनं आपली पुस्तकं टेबलावर टाकली अन् एक आराम खुर्ची ओढून ती बसली. तिथें बसलेल्या एका मुलीनें पंखा चालू केला. बाहेर ऊन कोण तापलं होतं, पण त्या पंखाच्या कृत्रीम वाऱ्याचा स्पर्श होतांच उषाला किंचीत बरं वाटलं. दुसरी बेल होतांच बाहेर व्हरांड्यांत जमलेल्या मुली वर्गाकडे गेल्या. ज्यांना सुट्टी होती. त्यांच्यापैकीं कांहीं जणी बगीच्यांत हिरवळीवर बसून आम्रवृक्षाच्या छायेंत गप्पा करूं लागल्या.

बसल्या बसल्या उषानें कॉमनरूम मध्ये चारी बाजूला नजर फिरविली. तिच्या समोर बसलेली मुलगी टाईम्स वाचीत होती; तर तिकडे कोपऱ्यांत दोन पारशी मुली कोरींव भुवयांवर कांहींसं बोलत होत्या. त्यांच्यापैकीं एकीनं झटकन् डिसेक्शन बॉक्स काढले अन् त्यांतल्या चिमट्यानं दुसऱ्या मुलीच्या भुवयां कोरायला सुरवात केली. त्यांच्याकडे पाहतांच उषाला किंचीत् हंसू आलं. फॅशनूचा केवढा हा षौक असंही तिच्या मनाला वाटलं. तिनें स्वतः लांब वेणी घातली होती अन् त्याची चार पांच पेडं गोवून बाकीचे केस मोकळे सोडले होते. पांढरे तलम पांचवार पातळ आणि फुगीर बाह्यांचा ब्लाऊझ तिनें घातलेला होता. गळ्यांत एक चेन आणि हातांवर रिस्टवॉच खेरीज दुसरा कसल्याही दागिना तिच्या गळ्यांत नव्हता. साधा पण स्वच्छ पोशाख केलेली व्यक्ति आकर्षक आणि प्रसन्न दिसते असं तिचं आवडतं तत्व होतं; आणि त्या तत्वानुसार ती वागत होती. कितीतरी मुली जणूं काय आपण लग्नाला जातो आहे अशा भावनेंत कॉलेजमध्यें सजून येत. त्यांची भावना कदाचित् तशी नसेल पण त्यांच्या कपड्याकडे पाहून तरी इतर मुली तसं मानीत.

मग त्या वारंवार आपल्या साडीकडे पहात. पाठीवरचा शेपटा मागे पुढे करीत अन् इकडून तिकडे जातांना आपल्या साडीची घडी थोडी सुद्धां मोडूं नये

म्हणून काळजी घेत. ह्या मुलींचं अभ्यासाकडे कसं लक्ष लागत असेल कुणास ठाऊक असा विचार उषाच्या मनांत कितीदां तरी आलेला होता.

ती खरोखरच कंटाळली होती. तेच कॉलेज, तेच प्रोफेसर, तीच पुस्तकं अन् तोच अभ्यास. रोज पहिली घंटा झाली की पुढच्या बाकांवर जाऊन बसायचं. प्रोफेसर सांगतील ते शब्द भराभर वहीवर उतरवन घ्यायचे; आणि तास संपला की वर्गाच्या बाहेर पडायच. प्रोफेसर जे सांगत असे ते त्याचं त्यालाच कळत होतं कीं नाहीं कुणास ठाऊक. त्यानं भरभर बोलायला सुरवात केली की मागची मुलं, "कुठून लेकाचा पाठ करून यतो कुणास ठाऊक" असं कुजबुजत. त्या पन्नास मिनीटांच्या अवधीत उषाचं लक्ष हजारदां तिच्या मनगटावरील घड्याळाकडे जाई. तिच्या बाजूच्या मैत्रिणाही पेनन लिहितां लिहितां मध्येंच थांबून "किती वेळ आहे ग उषा ?" असा कंटाळल्यासारखा चेहरा करून विचारीत.

ती शाळेंत असतांना कॉलेज म्हणजे कांहीतरी विलक्षण आकर्षणीय वस्तू आहे असं तिला वाटलं होतं. तिलाच काय पण प्रत्येक मुलीला तसंच वाटत असेल. मॅट्रिक पास होतांच, 'आतां आपण कॉलेज मध्यें जाणार ' ह्या विचारानं तिला केवढा आनंद झाला होता, तथापि पहिल्या वर्षी ती बुजलेल्या पांखरासारखी वागली. पहिल्या वर्षाच्या शेवटीं ती थोडी फार धीट झाली खरी. तीच काय पण तिच्या वर्गांतील बहुतेक सगळ्याच मुली ह्या भावनेनं वागल्या नव्हत्या काय ? दुसरे वर्ष, अभ्यासाचे असूनही तिनें आनंदात घालविले. सपाटून टेनिस अन् बॅडमीन्टन् खेळायचं. कॉलेजच्या प्रत्येक गोष्टींनं उत्साहानं भाग घ्यायचा अशा वृत्तींनं ती वागली होती. तिसऱ्या वर्षाला मात्र तिचा हा उत्साह हळूं हळूं थंड पडत गेला कॉलेज मधल्या त्याच त्याच गोष्टींचा तिला कंटाळा आला. पण बी. ए. ची डिग्री घेतलीच पाहिजे असा तिच्या मनाचा निश्चय असल्यामुळें ती कॉलेज मध्यें येत होती एवढंच. आणि चवथ्या वर्षाला तर जणूं एखाद्या यंत्राप्रमाणें तिचा अभ्यास अन् वागणं चाललं होतं. सगळ्या गोष्टी करायच्या म्हणून करायच्या त्यांत उत्साह

असा नाहीच. तिच्याच काय पण तिच्या वर्गातील प्रत्येकच मुलीच्या बाबतींत हेच घडलेलं होतं.

कॉलेज मधल्या मुली म्हणजे आनंदी फुलपाखरं असतात. कॉलेजमध्यें जावं अन् मजा करावी ह्या खेरीज दुसरं त्यांना माहित नसतं; गैरसमज कसा पसरला आहे कुणास ठाऊक—कॉलेज मध्यें येणाऱ्या कितीतरी मुलींची स्थिती समाधानकारक असली तरी, घरी त्यांना काम करावं लागतं, अभ्यास संभाळावा लागतो; संध्याकाळचा वेळ फिरण्यांत जात असेल तेवढाच. अगदी थोड्या अपवादात्मक मुली सोडल्या, तर बाकीच्या मुली आपण बरं अन् आपला अभ्यास बरा अशा भावनेनं वागत नव्हत्या काय? अन् ज्या बाकीच्या अपवादात्मक मुली मुलांच्या पुढे पुढे करीत; त्यांच्या पैशावर चैन करीत अन् आपल्यावरून सगळ्याच कॉलेजच्या मुलींबद्दल तसा गैरसमज पसरूं देत—त्या मुलीच्या वागण्याची तऱ्हाच तशी म्हटली पाहिजे. तो त्यांचा एक विलक्षण स्वभावच असावा. मग त्या कॉलेज मध्यें असल्या, शाळेंत असल्या तरी त्यांनी तेच केलं असतं नाही का?

कॉलेजच्या ह्या चार वर्षांच्या आयुष्यांत उषानं मैत्रीणी अनेक जोडलेल्या होत्या. तथापि मित्र असा एकही नव्हता. तशा तिच्या ह्याना त्या निमीत्यानें अनेक मुलांशी ओळखी होत्या. एक दोघांशी तर ती मोकळेपणानें वागतही असे पण तो मोकळेपणा तिनें मर्यादीतच ठेवलेला होता. आपल्या वागणुकीचा भलताच अर्थ घेऊन एखाद्या मुलाची निराशा व्हायला नको असं तिला सतत वाटत आलेलं होतं. आपल्यामुळें एखाद्या मुलाच्या आयुष्याचा सहारा व्हावा; असं कुठल्या समंजस आणि शहाण्या मुलीला वाटेल?

तिच्या एका मैत्रिणीच्या बाबतींत असंच घडलेलं होतं. आपलं वागणं मर्यादित ठेऊन तिनें एका मुलाशी मैत्री केलेली होती तथापि तिच्या मित्राचं एवढ्यानें समाधान होईना. त्याला जे पाहिजे होतं ते प्रेम देण्याची तिच्या मैत्रीणीची इच्छा नव्हती. "तूं मला मित्र म्हणून आवडतोस पण आयुष्याचा प्रवास तुझ्याबरोबर करावा असं मला वाटत नाहीं", असं तिनं त्याला उत्तर दिलेलं होतं. मुलाशीं

ओळखी होण्यानें जर असे परिणाम होणार असतील तर त्यापेक्षां ती ओळखही नको अन् ती मैत्रीही नको; असं तिला वाटत आलेलं होतं.

त्यानंतर मैत्री करतांना, " we like you as a friend and not as a compantion, ह्या गोष्टीचं understanding प्रथमच करावं " असा उषाच्या मैत्रीणींनी आणि तिनें वाद केलेला होता. मैत्रीचं रूपांतर, दोघांचेंही परस्परांच्या बद्दलचं आकर्षण वाढून प्रेमांत झालं तर ठीकच आहे पण एकाच बाजूनं प्रेम उद्भवलं म्हणजे दोघांचीहीं मनं दुखवली जातात. पण हे understanding द्यायचं कसं ? ओळख झाल्याबरोबर परस्परांना ते दोघेही असं थोडंच सांगणार आहेत ? त्या पेक्षां आपणच प्रथनपासून सावध राहावं असा त्या वादाचा निष्कर्ष काढून त्यांनी तो वाद संपविलेला होता.

उषा किंचित हंसली. मुलांमुलींचें संबंध कसे असावेत ह्यावर ती आणि तिच्या मैत्रीणी अनेकदां वाद करीत असत. पण सहशिक्षण असूनही मुलं मुली परस्परांच्यापासून चार हात लांब राहत. मुलामुलींच्या मध्यें मोकळेपणा असावा असं त्यांनी अनेकदा प्रतिपादन केलेलं होतं पण तो मोकळेपणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न मुलांच्या कडूनही होत नव्हता किंवा त्यांनीं केला असेल तर "नकोरे बाबा ! तेवढ्या पुरतच ठीक", अशा वृत्तीनं मुली त्यांना उत्तेजन देत नव्हत्या.

मग कॉलेच मधली मुलंमुली परस्परांशीं बोलतात, त्यांच्या ओळखीचं प्रेमांत रूपांतर होऊन त्याचे विवाह होतात असं चित्र लेखक कादंबऱ्यांतून रेखा-टतात, ती सगळी भास उत्पन्न करणारी नव्हेत काय ? खरी परिस्थिती किती वेगळी आहे. ओळख झाली तर त्या ओळखीची पुढची पायरी चढायला मुलीं नाखूष असतात. उषाने आणि तिच्या वर्गातील एका मुलानें 'मित्रमंडळ' नांवाच्या कॉलेजच्या छोट्याशा संस्थेचं काम मिळून केलेलं होतं, तथापि जरूरी पुरतं अगर तो मुलगा कुठे भेटला तर त्याच्याकडे पाहून हंसण्या इतकीच त्यांची ओळख होती. काम संपल की आपण बरें नी आपले उद्योग बरे ह्या वृत्तीनें उषा वागत होती. एखादा लेखक असता तर त्यांच्या ओळखीचं प्रणयांत रूपांतर करून त्यानें त्यांचे लग्नही लाऊन टाकले असते.

पण उषाच अशी वागत नव्हती तर कॉलेजमधल्या प्रत्येकच मुलीची जवळ जवळ नीच स्थिती होती. कॉलेजचा शिक्षणक्रम संपला की प्रत्येक मुलगी आयुष्यांत स्थिर झालेल्या तरुणाशीं लग्न करणार होती. प्रेम वगैरे कथा कादंबऱ्यांत ठीक आहे पण प्रत्यक्षपणें कॉलेज मध्यें तसं थोडच घडतं ?

उषाच्या समोर जी खिडकी होती त्यांतून बॅडमीन्टन् कोर्ट वर खेळणाऱ्या मुली उषाला स्पष्ट दिसत होत्या. उल्हासांत रॅकेटवर उचलून पलीकडची ती निळ्या पातळाची मुलगी शॉट मारण्यांत गुंतली होती. उषाच्या मनांत आलं, 'हीच काय पण प्रत्येकच मुलगी उद्यां लग्न करणार आहे.' पण कां ? कारण त्या शिवाय दुसरा मार्गच नाहीं.

परवां ती एका इंग्रजी चित्रपटाला गेली असतांना रशियांतील स्त्रिया मोठ्या कारखान्यांत अगर सगळ्याच विभागांत कशा काम करतात ह्याचा एक छोटासा चित्रपट दाखविला होता. तो पाहून तिच्या मनांत आलं होतं—आमच्याही पुढे असेच मार्ग असते तर कॉलेजचं शिक्षण सोडून देऊन आम्हीं तेव्हांच आनंदानें ने काम करायला तयार झालो असतो पण आतां दुसरं कांहीं नाहीं म्हणून कॉलेज मध्यें शिकायचं, ज्या विषयाचा आयुष्यांत कधीही उपयोग होत नाहीं अशा फिलॉसफी, पॉलीटिकसारख्या विषयाचा अभ्यास करायचा अन् पुढे जो आयुष्यांत स्थिर झाला आहे; अशा एखाद्या तरुणाशीं लग्न करायचं. संसार करायचा—तेच घर-मुलं; आणि त्याच गोष्टी प्रत्येक मुलगी आजपर्यंत तेच करीत आली आहे आणि तेच तिला करावं लागणार आहे. कुठचा त्याग—आणि त्या पासून मिळणारा आनंद ? कॉलेजचं शिक्षण संपलं की लग्न करायचं, संसार करायचा, ती अपुरी सुखं आणि दुःखं—छे ! किती कंटाळवाणं

सारंच कांही कंटाळवाणं, असं वाटून उषानं एक लांब निश्वास सोडला आणि हाताचे दोन्ही तळवे मागे खुर्चीवर एकमेकांत अडकवून तिनें त्यांवर आपलं मस्तक टेकवलं. तितक्यांत तिच्या समोर बसलेल्या मुलीनें हातांतला टाईम्स खाली टाकला आणि उषाकडे पाहून ती हंसली.

किंचीत हंसून उषानें विचारले, "any news!"

"no news. Same thing. damn it" असं काहींसं ती पुटपुटली. ही देखिल एकूण कंटाळली आहे तर! असं वाटून उषानें विचारलं "Shirin, aren't you tired of all these things?"
"of what things?" तिनें आश्चर्यानें विचारले.

"I mean, this same college, Same professors, same topics and......"

"Oh, yes" तिनें एकदम म्हटले, "मला वाटलं, मीच काय कंटाळले आहे पण तूं सुद्धां कंटाळली आहेस उषा?"

उषानें मान हलविली. प्रत्येकच मुलगी कंटाळली आहे. हा सारा उल्हांस आणि आनंद उसनाच म्हणायचा। प्रत्येक मुलगी मनांतल्या मनांत कुठे तरी म्हणत असेल, "छे बुवा हे सारं किती कंटाळवाणं. तेच-तेच-"

हिरवळीवर कुणी तरी मुलगी गात होती. ती कोण होती हे उषानं तेव्हांच ओळखलं. त्या मुलीचा आवाज मधुर अन् मोठा गोड होता.

'न जाने किधर आज मेरी नाव चलीरे' ह्या तिच्या सुरवातीच्या ओळी उषाला स्पष्ट ऐकूं आल्या. अन् मग उच्चस्वरांत तिला ऐकूं आलं.

"कोई कँहे यहां चली। कोई कँहे वहां चली। मनने कँहा ...उषानें बाजूला मान फिरविली. तिच्या मनांत आलं," आमच्याही आयुष्याची नाव अशीच चालली आहे. किती निष्क्रीय मनानं आम्हीं ती चालवितो आहे. कुणास ठाऊक कुठल्या तीराला जाऊन लागणार आहे. आम्हांला काय हवं आहे ते आमचं आम्हांलाच कळत नाहीं.

उषाचे विचार तिथेंच थांबले. पहिली घंटा झाल्यामुळे जिना उतरण्याचे आवाज गडबड आणि मुलींच्या हंसण्याचे आणि बोलण्याचे आवाज जवळ जवळ

ऐकूं येऊं लागले. तिच्या मैत्रीणी आल्या की मनाची ही सारी खिन्नता विसरून ती उल्हासानें त्यांच्या गप्पांत सामील होणार होती. तिच्या मैत्रीणींपैकी अनिता जोशी धांवत धांवतच आंत शिरली. टेबल वर पुस्तकं फेकून फरदिशी खुर्ची पुढें सरकवीत तिनें विचारलं,

" कोण गात होतगं उषा ! "

उषानें नांव सांगितलं अन् म्हटलं, "वर तुम्हांला ऐकूं आलं म्हणायचं" अनिताने मान हलावित म्हटलं, "तर काय ! पिरीयडचा असा कंटाळा आला होता. कधी तास संपतो असं झालं होतं—प्रोफेसर सांगत होते म्हणून ऐकत होतो एवढंच, पण ते गाणं ऐकतांच असं कांहीं छान वाटलं, क्षणभर पेन थांबवून सगळ्यांचं लक्ष तिकडे गेलं--प्रोफेसरांचं सुद्धां " अनिताचं बोलणं ऐकून उठतां उठतां उषाच्या मनांत आलं, " आयुष्य कंटाळवाणं व्हावं अशी परिस्थितीच आहे की मनुष्याचं मनच नेहमीं नाविण्याकडे धांव घेतं कुणास ठाऊक "

तिनें चटकन् खुर्ची खालच्या चपला पायांत सरकविल्या आणि पुस्तकं घेऊन ती बाहेर पडली

---

# एका रात्रीने गुंफलेली गोष्ट ❀ ............१२

त्यानें कागद वर सरकवला आणि टाईप करायला सुरवात केली. मघाशीं आंत चाललेला पोरांचा कल्ला अगदी असह्य होऊन त्यानें बोटं थांबविलीं होतीं आणि दरडावणीच्या सुरांत म्हटलं होतं, " काय त्रास देतां रे ! काम करायला बसलों तर सुचूंदेखील देत ना लेकाचे. "

त्याचा दरडावणीचा आवाज आंत जाऊन पोचला. कुणीतरी त्या पोरांना दटावलं. थोडी कुजबुज झाली. आणि मग हळुहळू शांत व्हायला लागलं. तसा त्यानें कागद सरकावला आणि टाईपराइटरवर त्याचीं बोटं फिरूं लागलीं.

पण तीं मध्येंच थांबलीं. पुढें टाईप करायचा त्याला अगदी कंटाळा आला होता. तेंच, तेंच. हें संपायचं तरी कधी ? की ज्या क्षणीं आयुष्याची अखेर होईल त्याच क्षणीं नोकरीच्या गुलामगिरींतून मुक्तता होऊन ह्या साऱ्या कटकटी कायमच्या मिटतील ? रोज दहा ते चार ऑफिस, संध्याकाळीं त्याच ठरलेल्या जेलरोडनं फिरणं. रात्रीं ऑफिसचं घरीं करायला आणलेलं काम—नंतर जेवण आणि मग ती झोप. अंथरुणावर पडल्यावर त्याची पत्नी दिवसभर घडलेल्या गोष्टींचा आढावा त्याला देत असे आणि त्रासिकपणानें ' हं, हं ' करीत असतांनाच त्याला झोप लागे.

पण आज मात्र ह्या कार्यक्रमाचा त्याला मनस्वी कंटाळा आला होता. त्याच्या बरोबरीचे लोक तें सारं कसं सहन करीत होते कुणास ठाऊक. त्यांना नसेल का कधी कंटाळा येत ! की आपलीच वृत्ति अशी आहे ? छे, छे, हें आता मुळींच सहन होत नाहीं.

" जेवायला चलायचं ना ? " ह्या पत्नीच्या शब्दांनीं तो भानावर आला. " आलों हं " असं म्हणत त्यानें टाईपराइटरवर झाकण घातलं नि आंत गेला.

मधल्या खोलींत अंथरुणावर त्याचीं चार मुलं एकमेकांना बिलगून झोपलीं होतीं. मघाशीं आरडाओरड करून त्यानीं सगळं घर डोक्यावर घेतलं होतं. पण आता एकेकाचा चेहरा अगदी शांत होता. चौघांच्याहि पायावरचं पांघरूण अगदी अस्ताव्यस्त झालं होतं आणि बंडू तर लोळत अंथरुणाच्या टोकापर्यंत जाऊन पोचला होता.

त्यानें तिकडे नुसतं पाहिल्यासारखं केलं; आणि तो स्वयंपाक घरांत आला. त्यांचीं पांघरुणं नीट करावीं आणि लोळणाऱ्या बंडूला मध्यें ठेवावं असंहि त्याच्या मनांत आलं नाहीं.

तो पाटावर जाऊन बसला. फुलपात्रांतून हातांत पाणी घेऊन तें पाना-भोवतीं फिरवलं. वाटींतली आमटी भातावर ओतली; पण पहिलाच घांस त्याच्या हातांत तसाच राहिला. त्याला जेवायचाहि जणूं कंटाळाच आला होता. त्यानें समोर नजर टाकली.

त्याची पत्नी चुलीजवळ पोळ्या करीत होती. विस्तवाचा मंद लालसर प्रकाश तिच्या चेहऱ्यावर आला होता, अन् त्यामुळें चेहऱ्यावरच्या प्रौढत्वाच्या छटा उठून दिसत होत्या. पोळ्या लाटतांना तिच्या हातांतल्या बांगड्या मागे-पुढें होत-त्या बांगड्या बारा वर्षांपूर्वी त्यानें लग्नांत तिला दिल्या होत्या. तेव्हांपासून झिजत झिजत त्या अजूनहि तिच्या हातांत होत्या.

त्या बांगड्यांकडे लक्ष जातांच त्यानें हातांतला घांस तसाच परत पानांत ठेवला आणि तिच्याकडे पाहात म्हटलं,

" आपल्या आयुष्यांत कांहींतरी नवीन असावं अशी इच्छा तुला कधींच होत नाहीं का ग ?"

त्याचा प्रश्न तिला जरा चमत्कारिक वाटला. तव्यावरची पोळी निखाऱ्यावर शेकीत तिनें हंसून म्हटलं,

" कसलं नाविन्य ?"

पण तिचं उत्तर त्यालाच उलट चमत्कारिक वाटलं. रोज सकाळीं उठायचं. चहा, अंघोळ, स्वयंपाक, मुलांचं करणं, मधल्या वेळेची व्यवस्था, निवडणं, आणि परत रात्रीचा स्वयंपाक. असा रोजचा तोच कार्यक्रम असूनहि आपल्या पत्नीला तेंच तेंच करायचा कंटाळा कसा येत नाहीं ?

आपण तर आपल्या मनांत किती कुरकुरतों. पण आपल्या पत्नीनें मात्र आपल्याला कांहींतरी नाविन्य हवं अशी तक्रार केल्याचं आपल्याला चुकूनसुद्धा आठवत नाहीं.

त्यानें आपले विचार तिला बोलून दाखविले.

ती हंसली आणि गरम गरम पोळी त्याच्या पानांत टाकीत म्हणाली, "त्यांत कशाला नाविन्य हवं ? संसारांतल्या हरतऱ्हेच्या रोजच्या गोष्टी उत्साहानें केल्या म्हणजे त्यांत नाविन्यच भासतं नाहीं का ?" पण नंतर लगेच त्याच्या पानाकडे दृष्ट टाकून ती म्हणाली, "हें काय ? आज पहिल्या भातालासुद्धा हात लावला नाही. पोळी तरी खावी." प्रथम तो कांहींच बोलला नाहीं. तिचं म्हणणं त्याच्या मनाला मुळींच पटलं नव्हतं. हातावर पाणी घेतलं आणि तसाच उठला तो पत्नीनं त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहतांच त्रासल्यासारखं करून तो म्हणाला,

"नको ग. आज मुळीं भूकच उरली नाही मला."

आचवून तो बाहेर आला. चांदणं कसं चक्क पडलं होतं समोरच्या झाडा-झाडांच्या शेंड्यावर आणि घरांच्या कौलांवर रुपेरी उजळा दिल्यासारखं वाटत होतं. समोरच्या रस्त्यावर जणूं काय चांदीचा रस ओतला होता. आभाळांत असलेल्या मेघांच्या तुकड्यांवरील चंदेरी प्रकाश पाहून मोठमोठे चांदीचे तुकडे इकडे तिकडे फेकले आहेत असं भासत होतं. पलीकडच्या देवळाचा घुमट आणि शिखर जणूं चांदीनें मढविले होते.

तो क्षणभर तें दृश्य पाहात राहिला. नंतर त्याच्या मनांत आलें, आंत जाऊन झोपण्यापेक्षां आज जरा फिरायला जावं. त्यानें कोपऱ्यांतली काठी उचलली आणि "मी जरा बाहेर जातो हं. कडी घालू नकोस" असं पत्नीला सांगून तो बाहेर पडला. कुठे जायचं तें कांहीं त्यानें ठरविलं नव्हतं. काठी फिरवीत तो निघाला. एकामागून एक अशीं अनेक घरं मागे गेलीं. मध्येंच कुठल्यातरी घरांतून प्रकाशाचा झोत रस्त्यावर आलेला दिसे. रस्त्यावर विशेष रहदारी अशी नव्हतीच कठेतरी पानपट्टीवाल्याच्या दुकानावर चारचौघांचा घोळका झगझगीत गॅसच्या प्रकाशांत बसलेला गप्पांचा आणि चर्चांचा अड्डा.

ओळखीची वस्ती मागे टाकून अनोळखी वस्तींत त्याचे पाय केव्हां शिरले त त्याचं त्यालाच कळलं नाहीं. पाय नेतील तिकडे जायचं हाच जणूं काय त्याचा

विचार टरलेला होता. पण आता पाय दुखायला लागले होते; आणि भारावलेलं त्याचं मन! त्या मनाचा जडपणा अजूनहि कायम होता. थोडी विश्रांति घ्यावी म्हणून फाटकाच्या कठड्याशीं तो टेकला.

वरून झगझगीत दिव्याचे झोत खाली रस्त्यावर आलेले होते. कुठल्यातरी वाद्यांचा सूर जुळविल्यासारखा त्याला वाटला. तबल्याची थाप पडली आणि पैंजणांचा झंकार होऊन त्याचा मधुर नाद त्याच्या कानांवर पडला. "झण् ऽ ऽ णू ण् ण् ऽ ऽ पायल मोरी बाजे," अशी मधुर शद्वांची फेर, त्याच्या मागोमाग पैंजणांचा छुम्, छुम्, छुन्, छुम् असा तालबद्ध आवाज आणि उच्च स्वरांत घेतलेल्या ताना ऐकून त्याला दचकल्यासारखं झालं. तान संपल्यानंतर मागाहून स्पष्टपणे ऐकूं येणारे सारंगीचे सूर त्याच्या हृदयापर्यंत जाऊन पोचले.

त्यानें मान वळवून चटकन् वर नजर टाकली. त्याच्या लक्षांत आलं, तो ज्या घराच्या फाटकाशीं टेकला होता तें घर एका वेश्येचं होतं. एकामागुन एक होणाऱ्या तानांचा फेर ऐकून त्याला वर जाण्याची उत्कट इच्छा झाली. जें आज-पर्यंत ऐकलं नव्हतं असं नाविन्य त्यांत होतं खचित, आणि त्या नाविन्याच्या मोहावरच लुब्ध होऊन त्याचं मन वर जायला उत्सुक होतं, पण त्याचे पाय घुट-मळले. असलं कांहीं करायची ह्या क्षणापर्यंत त्याच्या पायांना संवय नव्हती; म्हणून तसाच गोंधळून जाऊन तो स्तब्ध उभा राहिला.

त्या फाटकाच्या रोखानं येणारी एक आकृति त्याच्या जवळ जवळ येऊं लागली आणि जवळ येतांच त्यानें चटकन् ओळखलं—त्याच्याच ऑफिसमधले प्रभाकरपंत.

त्या दोघांची दृष्टादृष्ट झाली.

त्याला तसा उभा राहिलेला पाहून प्रभाकरपंत आश्चर्यानें चकित झाले. जवळ जाऊन त्यांनीं हलक्या स्वरांत म्हटलं, "अरे! तुम्हीदेखील आमच्याच माळेंतले असाल अशी कल्पना नव्हती."

त्यानें रोखून त्यांच्याकडे पाहिलं आणि म्हटलं, "आयुष्यांत पहिल्यांदाच अकस्मात्‌पणें इथें आलोंय मी."

प्रभाकरपंत वरमले पण लगेच चेहरा सांवरून त्यांनीं म्हटलं, "असं होय ! मला माहित नव्हतं. पण इथं उभे कां ? या न, वर चला." त्याचे पाय क्षणार्ध घुटमळले; पण वरच्या नाविन्याचा मोह न आवरतां येण्यासारखा होता. लगेच मनाचा निश्चय करून जिना चढून तो त्यांच्याबरोबर गेला.

माडीवर गॅसच्या दोन बत्त्या झगझगत होत्या. खोलीभर किंमती जाजम पसरलेला होतों. मध्यें विड्यांचं तबक होतं. पलीकडे सारंगीवाला, त्याच्या बाजूला तबलेवाला, आजुबाजूला बरीचशी मंडळी 'वाहवा, वाहवा' असं म्हणत एकमेकांच्या गळ्यांत हात घालून डोलत होती. त्यांच्यासमोर मद्यपात्रें होतीं आणि मद्याच्या बाटल्या......

त्यानें बसतां बसतां जिच्या कंठातून त्या स्वर्गीय ताना बाहेर पडल्या होत्या तिच्याकडे नजर टाकली. '

लालभडक साटीनचा घागरा. तंग चोळींतून उठून दिसणारीं वक्षस्थलं आणि तीं अर्धवट झांकलीं जातील न जातील अशी त्यावर घेतलेली झिरझिरीत ओढणी. तिनें तोंडाला रंग लावलेला असावा. दिव्याच्या प्रकाशांत दुरून तिचा चेहरा त्याला अत्यंत आकर्षक आणि नाविन्यपूर्ण वाटला. पान खाल्ल्यामुळें ओंठ अगदी लालभडक दिसत होते.

तिची आणि प्रभाकरपंताची नेत्रपल्लवी झाली. तिनें त्याच्याकडे वळून कुर्निसात केला. स्वर वर चढले, तबल्याचा ताल वाढला आणि तिचीं पावलं जलदीनें पडूं लागलीं.

गीत मघाचंच होतं. कृष्णाला भेटायला जाण्याची राधेला उत्कट तळमळ लागलेली होती. तिचा कृष्ण, तिनं यावं म्हणून खुणेसाठीं खडे मारीत होता. पण घरांतले सगळे लोक जागे होते. तिची नणंद जागत होती. आपण जाऊं लागलों तर आपल्या पायांतील पैंजणांचा आवाज होऊन सगळे लोक जागे होतील.

" मोहे मारत कंकरिया
जाग रहे घरके लुगवा
अब कैसे घर जाऊं
पायल मोरी बाजे. "

मधुर शब्दांच्या मागोमाग आलाप आणि आलापांच्या मागोमाग पैंजणांच्या छुम् छुम् ह्या नादमधुर झंकारांत " झग् ण् ण् ऽ ऽ पायल मोरी बाजे. झग् ग् ण ऽ ऽ झण्, झण् ऽ ऽ ऽ झण्, झण् ऽ ऽ झण् झण् झण् मोरी पायल बाजे. नणंदिया मोरी जागे ऽ ऽ झण् ऽ ण् ऽ ण् ऽ ऽ ऽ मोरी पायल बाजे."

तो अगदी मंत्रमुग्ध होऊन तिच्याकडे पाहात होता. जणुं असलं कांहीं आयुष्यांत तो प्रथमच पाहात होता; आणि म्हणून भुकेलेले त्याचे अतृप्त डोळे जितकं सांठवितां येईल तितकं सांठविण्याचा प्रयत्न करीत होते.

मागच्या बाजूच्या खोलींत निळसर मंद प्रकाश होता. त्या प्रकाशांत पलीकडच्या मोठ्या पलंगावरची मच्छरदाणीची लालसर झालर चमकत होती. तें पाहून कसली तरी विलक्षण भावना त्याच्या मनांत सळसळून गेली. कसल्या तरी नाविन्याचा प्रत्यय आल्याची ती साक्ष.

त्या गाण्याचा आणि धुंदीचा कैफ त्याच्या मनावर चढूं लागला. त्याच्या आजूबाजूची मंडळी हळूहळू मद्याच्या कैफांत चढत जाऊन त्यांची अक्षरशः ब्रह्मानंदी टाळी लागलेली होती. एकमेकांच्या गळ्यांत हात टाकून ते एकमेकांच्या अंगावर रेलले होते. त्यांच्यापैकीं कांहींजण कसले तरी अचकट विचकट शब्द उच्चारून विनोद केल्याच्या आविर्भावानं हासत होते. गाणं थांबल्यावर तिनें स्वतः मद्याचा आग्रह करायला सुरवात केली. मद्यपात्रं ती स्वतःच्या हातानें भरून देत होती. आग्रह करीत होती. शवटीं आग्रह घेण्याची पाळी त्याच्यावर आली. मद्याचा पेला घेऊन ती पैंजणाच्या छुम्, छुम् ह्या तालबद्ध आवाजांत त्याच्याकडे आली.

तिच्या हातांतून पेला घेतां घेतां त्यानें तिच्या दृष्टींत दृष्टी मिसळली. ओढलेला चेहरा, भुकलेले पण उन्मादक डोळे, त्या रंगाच्या मधूनहि उठून दिसणाऱ्या

प्रौढत्वाच्या छटाः मघाशीं दुरून पाहिलेला तिचा चेहरा झगझगीत प्रकाशांत त्याला अत्यंत नाविन्यपूर्ण आणि आकर्षक वाटला होता. पण आता......

तो दचकला. आणि हातांतला पेला ओठाला लावण्याऐवजीं त्यानें नकळत खालीं ठेवला. त्याच्या आजूबाजूचे लोक लोळायला लागलेले होते आणि ती स्वतःहि कसला तरी विनोद करीत होती.

ते पाहतांच त्याच्या डोळ्यावर चढलेला कैफ आणि धुंदी एकदम उतरली.

पहाटे तीनच्या सुमारास तो घरीं परतला.

घरीं जातांना अनेक विचारांनीं त्याचं मन भारावलं होतं. तो परत आपल्या मनाशीं विचार करीत होता कीं, "आपण पाहिलं त्यांत नाविन्य होतं खरं, पण तें क्षणिक टिकणारें. आयुष्यांतील दुःखांकडे पाठ वळवून तीं भित्रेपणानं टाळूं पाहणाऱ्या लोकांनाच त्या नाविन्याचा मोह पडायचा! मद्य, मनाला क्षणभर धुंद करणारा तो पैंजणांचा आवाज, त्यांत लोळत पडणारे हे लोक; खरोखर ज्याचं मन जिवंत आहे तो असल्या नाविन्याला, कंटाळा आला तरी सुद्धां, बळी पडणार नाही."

असेंच कांहीसे विचार करीत त्याची स्वारी घराच्या दारापर्यंत येऊन पोंचली. टक् टक् करण्यापूर्वी दाराशीं तो क्षणभर उभा राहिला. 'कडी लावूं नकोस' असं आपण पत्नीला सांगितलं होतं. आपली वाट पाहात एवढ्या रात्री पर्यंतहि ती जागत असली पाहिजे.

डाव्या बाजूच्या खिडकींतून मंद प्रकाश बाहेर आलेला होता. पण झगझगीत दिव्याचा झोत डोळ्यावर येऊन ते क्षणभर मिटले जावे अशी प्रखरता त्यांत खचित नव्हती. उलट, मंद आणि शांत असा कंदीलाचा बाहेर आलेला तो अस्पष्ट प्रकाश पाहून त्याच्या मनाला एक प्रकारचें समाधान झालं; आणि आतापर्यंत मनावर असलेला सगळा भार नाहीसा होऊन मन अगदी हलकं झाल्यासारखं त्याला वाटलं.

त्यानें दारावर टक् टक् केली. आंतली कडी काढली गेली. दाराच्या आंत होत त्यानें पत्नीला म्हटलं, "तूं अजून जागीच!" तिनें हसत म्हटलं, "आपण

यायचे होता आज किती दिवसांनीं रात्रीं फिरायला गेलांत. त्यांतून असं सुंदर चांदणं."

तो तिच्याकडे पाहून हासला. तिचं निष्पाप मन पाहून त्याला कौतुक वाटलं तर उलट आपल्या स्वतःच्या मनाची......

अंथरुणावर पडतां पडतां तिच्याकडे वळून तो म्हणाला, "संसारांतल्या रोजच्याच गोष्टी तूं नेहमीच उत्साहानें कां करतेस ते कळलं मला."

तिच्या दृष्टीत त्याची दृष्टि मिसळली. प्रौढत्वाकडे झुकणाऱ्या तिच्या चेहऱ्यावरचा शांत स्वाच्या भाव चटकन् लक्षांत आला. आणि जें आजपर्यंत आपल्याला कळलं नव्हतं तें नाविन्यानंच आपल्या प्रत्यास आलं आहे असं त्याला वाटलं. एक प्रकारच्या नवीन दृष्टीनें त्यानें तिच्याकडे पाहिलं लग्नानंतरचा तोच आकर्षक चेहरा अजूनहि आपल्यासमोर आहे असं त्याच्या मनांत आलं.

आपली पाहण्याची दृष्टि बदलली आहे नव्हे का असं वाटून तिच्याकडे पाहात मंद स्वरांत तो म्हणाला,

"मुलांच्या अंगावरचं पांघरूण नीट केलेंस का? बंडू लोळत अंथरुणाच्या टोकापर्यंत गेला असेल, त्याला नीट निजवलंस का?"

---

* सौ. कुसुमावती देशपांडे ह्यांचा "गवतांतील पातें ह्या गोष्टींतील मध्यवर्ती कल्पनेचा आधार घेतला आहे.

# शंका आणि समाधान ........................ १३

खरे नगर,

'अंबाझरी' व्हिला'

संपादक साफल्य यांस,

स. न. वि. वि. माझं हे पत्र पाहून आपल्याला फार आश्चर्य वाटेल. आपलं साप्ताहिक माझ्या फार आवडाचं आहे. त्यांतले सगळे लेख मी नेहमींच उत्सुकतेनं वाचते. आपल्या साफल्याची मी एकनिष्ठ वाचक आहे हे कळल्यानंतर आपणाला माझ्या ह्या पत्राचं आश्चर्य खास वाटणार नाहीं.

मात्र आज आपणाला पत्र लिहिण्याचा माझा हेतु वेगळाच आहे. साफ-ल्यच्या गेल्या अंकांत क्रमशः प्रसिद्ध झालेली "मृणाल कांती" ह्यांची "अर्पण" कादंबरी मला फार आवडली. पण ज्या मूळ घटनेवर कादंबरीकारानं संबंध कादंबरीची रचना केली आहे त्या घटनेबाबतींत माझा मतभेद असल्यामुळें कादंबरीकारांचा पत्ता आपल्याकडून मिळाल्यास मला फार आनंद वाटेल, माझं त्यांच्याशी थोडसं काम आहे.

त्रास दिल्याबद्दल माफ करा. आपल्याकडून उत्तर लवकर येईल अशी आशा आहे.

आपली नम्र,

मृदुला केतकर

× × ×

स. न. वि. वि.

आपले पत्र पोहचले. आपला निरोप सुप्रसिद्ध कादंबरीकार ' मृणाल कांती ' ह्यांना कळविला. त्यांनी पत्ता न देतां अशी इच्छा प्रदर्शित केली आहे की साफल्य ऑफिसच्या पत्त्यावर आपण त्यांना पत्र घालावींत. आम्हीं ती परस्पर त्यांच्याकडे पोहचती करूं—क. लो. अ. ही विनंती.

आपला नम्र.

संपादक ' साफल्य '

× × ×

खरे नगर

अंबाझरी व्हिला

श्री. ' मृणाल कांती ' यांस

स. न. वि. वि. माझं हे अनपेक्षित पत्र पाहून आपणाला आश्चर्य वाटणं सहाजिक आहे. तुमची आणि माझी ओळख नाही, पण तुमच्यासारख्या कादंबरीकाराशीं आधी ओळख असावी लागते असं मला वाटत नाहीं. कादंबरीकार आणि डॉक्टर ह्यांच्याशीं कुठल्याही व्यक्तिनं मोकळेपणानं वागलं पाहिजे असं मी कुठेसं वाचलं आहे तेव्हां ओळख नसतांना माझ्यासारखी अपरिचित मुलगी तुम्हांला पत्र पाठविण्यांत कांहीं धाडस करते आहे असं समजू नका.

हे पत्र पाठविण्याचा कांही विशिष्ट हेतु आहे हे तर खरंच पण तुम्हांला कांहीं सल्ला विचारायचा आहे, किंवा कुठल्या दुःखानं माझं मन व्यग्र झालेलं आहे आणि मला ते तुमच्या पुढं उघडं करावसं वाटतं आहे म्हणून मी तुम्हांला पत्र घालते आहे अशांतला भाग नाही; अर्थात मला कांहीं उद्योग नाहीं असंही समजूं नका.

साफल्य साप्ताहिकांतील तुमची अर्पण कादंबरी मी मोठ्या आवडीनं आणि उत्साहानं वाचली. मला ती फार फार आवडली. तुमच्या मधूर, रसाळ आणि मोहक लेखनशैलीचं कसं कौतूक करावं हेच मला समजत नाहीं. तुमचं मी मनापासून अभिनंदन करते. पण हे पहा, ज्या मूळ घटनेवर तुम्हीं कादंबरीचं सगळं कथानक उभारलं आहे त्या संबंधीं माझे थोडे मतभेद आहेत. अन त्यासाठीं तुम्हांला थोडेसे प्रश्न विचारायचे आहेत. त्या प्रश्नांची तुम्हीं मोकळेपणानं उत्तर दिली पाहिजेत. मी अगदी तुमच्या समोर बसून तुम्हांला ते प्रश्न विचारते आहे असं समजा. अर्थात पत्रांतून, तुमच्याशीं ह्या गप्पा करतांना मी तुमचा वेळ घेते आहे ह्याची मला जाणीव आहे; कदाचित् अशी संधी मी आपण होऊन घेते आहे म्हणून वाजवीपेक्षा मी धीट आहे असं आपण कदाचित् समजाल, तुमचा तसा समज (गैर, अर्थात) होणं शक्य आहे नाहीं; असं नाहीं. कदाचित् तुम्हांला वाटेल आमच्या दक्षिणी मुली एवढ्या धीट कधीपासून झाल्यात? तसा तुमचा जर समज झाला तर मात्र माझ्या धीटपणाबद्दल माफ करा.

तुम्हीं माझ्या प्रश्नांचीं उत्तरं द्याल किंवा नाहीं ते कळवावे.

आपल्या पत्राची वाट पहणारी.

मृदुला केतकर

× × ×

साफल्य ऑफिस,

शहर.

श्रीमती मृदुला केतकर यांना सप्रेम नमस्कार;

साफल्य कचेरीच्या पत्त्यावर आलेलं तुमचं पत्र संपादकांकडून सुखरूप मिळालं. आपले हे अनपेक्षित पत्र पाहून आपण म्हणतां त्याप्रमाणें थोडं फार आश्चर्य वाटलं हे तर खरंच पण आपल्या धीटपणाबद्दल कौतुकही वाटलं. आपल्या

आवडत्या लेखकाला मुद्दाम पत्र पाठवून त्याच्या लेखनाबद्दल चर्चा करण्याच्या तुमच्या उत्साहाबद्दल मला खरंच फार आनंद झाला. माझ्या वाङ्मयावर प्रेम करणारे तुमच्यासारखे वाचक असतील ही कल्पनाही मला नव्हती. तुमच्या ओळखीबद्दल—अर्थात पत्ररूपाच्या—मी मनापासून आनंदित झालों आहे.

तुमच्या धीटपणाबद्दल मला कौतुक वाटतं ह्याचा वर मी उल्लेख केलाच आहे, तेव्हां तुमच्या प्रश्नाचीं उत्तरं मी अवश्य देईन हे निराळं लिहायला नकोच, नाही कां ? तुम्हांला वाटतील ते प्रश्न खुशाल विचारा—

तुमचा
मृदुला कांती

× × ×

खरे नगर,
अंबाझरी व्हिला. ५

मृणाल कांती यांस,
सप्रेम नमस्कार—

ज्या पत्राची उत्सुकतेनं मी वाट पहात होते ते तुमचं पत्र मिळालं. Thanks हं ! तुम्हीं माझ्या धीटपणाबद्दल आणि मोकळेपणाबद्दल जे चांगले उद्गार काढलेत त्यामुळें मला बराच उत्साह आला आहे. असो आता मी मुद्या-कडे वळते.

तुमच्या कादंबरीची मूळ घटना अत्यंत मनोवेधक आणि नाविन्यपूर्ण आहे ह्यांत शंका नाही. परंतु सत्यसृष्टींत ती कितपत उतरूं शकेल हा एक मोठाच प्रश्न आहे. अर्थात माझ्या मतानं हं. तुम्हीं असं दाखविलं आहे की अर्पण साप्ताहिकांत नायकाच्या वारंवार येणाऱ्या आकर्षक टीकात्मक लेखांवर मोहित होऊन नायिका त्याच्याशी ओळख करून घेते अन् पत्र रूपानं त्यांची ओळख वाढत जाऊन शेवटी त्याच प्रणयांत रूपांतर होतं आणि नायक व नायिका एकमेकांना आपली हृदयें

अर्पण करतात. अर्थात घटना अत्यंत नाविण्यपूर्ण आहे हे कोण नाकबूल करील पण ती कितपत वास्तव्यतेला धरून आहे असा प्रश्न माझ्यासारखा वाचक सहज विचारेल.

प्रत्यक्ष ओळख झाल्याशिवाय दोन व्यक्ति परस्परांच्या प्रेमांत पडूं शकतात हे मला तरी शक्य वाटत नाहीं. तुमच्या कादंबरींतील नायक आणि नायिकेनं त्याच परस्परांवरील प्रेम उघड करून दाखवेपर्यंत परस्परांना पाहिलेलं नसतं, दोंडशें मैल लांब असलेल्या व्यक्ति परस्परांना न पाहतां केवळ बौद्धिक आकर्षणामुळें एकमेकांच्या प्रेमांत पडतात ही घटना आश्चर्यकारक तर खरीच! (बाकी तुम्हीं कादंबरीकार काय वाटेल ते लिहाल हेच खरं.)

निदान माझ्यासारख्या वाचकाला तरी असं वाटतं; की एकमेकांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या व्यक्तिची प्रथम प्रत्यक्ष ओळख व्हायला हवी, नंतर सहवास घडायला-हवा. दोन व्यक्ति परस्परांच्या प्रत्यक्ष सहवासांत आल्याशिवाय एकमेकांवर प्रेम करूं शकतील ही कल्पनाच मनाला पटत नाही. अर्थात ही आपली माझी बाजू झाली. हं. माझं म्हणणं तुम्हांला कितपत पटेल कोण जाणे. मला त्याची कांहींच कल्पना नाहीं.

पण एवढं सोडलं तर तुमची कादंबरी मला फार आवडली. तुमची ओळख व्हावी असं मला मनापासून वाटत होतं. पत्र रुपानं कां होईना पण तुमचा परिचय होण्याचा योग आला हे पाहून मला फार समाधान वाटलं. कदाचित् तुम्हीं म्हणाल सुद्धां, "ही बुवा अजबच पद्धत आहे ओळख करून घेण्याची पण तुमच्यासारख्या गुणी माणसाशीं ओळख करून घ्यायची नाहीं तर कुणाशीं!

असो पत्र फार लांबलं. तुमचा माझा नुकताच कुठं परिचय झाला, तेव्हां फार लांब पत्र लिहीली तर तुम्हीं कदाचीत् गोंधळून जाल; म्हणून पुरे करते.

आपली
मृदूला केतकर.

ता. कः—तुमचं ह्यापूर्वीच लिखाण मी कांहींच वाचलेलं नाहीं. कादंबरी तुम्हीं पहिलीच लिहीली काय ? आमचा दादाही चांगला लेखक आहे. कदाचित् तुम्हांला माहित असेल तो.

मृदूला,

× × ×

श्रीमती मृदूला केतकर यांना,

आपले पत्र मिळालें. आभारी आहे, आपला प्रश्नही समजला. कादंबरीतील अनुभव माझे स्वतःचे आहेत असं म्हणतां येणार नाही, त्यांत थोडे फार काल्पनिक अनुभव आहेत हे तर खरंच, पण हे अनुभव सत्यसृष्टींत उतरूं शकणार नाहींत असं मात्र मला म्हणतां येणार नाहीं. शारीरिक प्रेमा प्रमाणेंच बौद्धिक प्रेमही असूं शकते आणि बाह्य सौंदर्याप्रमाणेंच बुद्धीमत्तेच्या सौंदर्यावरहि मनुष्य आकर्षित होऊं शकतो असं माझं मत आहे. अर्थात तुम्हांला ते कितपत पटेल ह्याबद्दल मी जरा साशंकच आहे.

तुम्ही लेख वगैरे कांहीं लीहीत नाही काय ? लिहीत असाल तर कळवा म्हणजे मी आवडीनं वाचेन. तुमच्या पत्र लिहीण्याच्या पद्धतीवरून तुम्हांला लेखन सहज साधू शकेल असं मला वाटतं.

क. लो. असावा हि विनंती.

आपला

मृणाल कांती,

× × ×

खरे नगर

अंबाझरी व्हिला.

मृणाल कांती यांस

सप्रेम नमस्कार,

तुमचं पत्र मिळालं. आपल्या अत्यंत आवडत्या लेखकाचे पत्र आले म्हणजे माणसाला किती कल्पनेबाहेर आनंद होतो त्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला. तुमचं पत्र मी फार जपून ठेवलं आहे.

तुमचा मुद्दा मला अजूनही पटत नाहीं. बौद्धिक प्रेमावर मनुष्य आकर्षित होतो खरा पण त्याला प्रत्यक्ष सहवास आणि ओळख हवी असं मला अजूनहि वाटतं.—पण माझी बुद्धीमत्ता आपल्या इतकी प्रगल्भ नाहीं. माझा मुद्दा कदाचित् चुकीचा ही असूं शकेल.

मी थोडं फार लिहून पाहण्याचा प्रयत्न केला आहे, पण लेख साभार परत यायाला लागल्यापासून निराश होऊन सोडून दिलं.

तुम्ही माझ्या मागं श्रीमती लिहितां ते मला फार आवडतं. विशी ओलांड-लेल्या मूलीच्या मागं 'कु' लावलं म्हणजे त्यांत पोरकटपणा आहे असं मला वाटतं. स्त्री जसजशी मोठी होत जाईल तस तसं गांभीर्य आणि प्रौढपणा तिच्या स्त्रीत्वाला उठाव देतात असं माझं मत आहे. श्रीमती हा हिंदी लोकांत वापरला जाणारा शद्व मोठा सुरेख आहे नाही? अविवाहीत आणि वैधव्य ह्या तिन्ही स्थितींत स्त्रीच्या आयुष्यांत सतत सोबत करणारा हा शब्द मोठा आदरणीय आणि अर्थगर्भित आहे. तेव्हां असला हा शब्द माझ्या मागे लावल्याबद्दल तुमच्या बद्दलच्या माझ्या आदरांत आणखीच भर पडली आहे.

पण मी तुम्हांला एक विनंती करूं कां? कदाचित् ही विनंती ऐकून तुम्हांला खास वाटेल की ह्या मुलीला विनयाची मर्यादा अगदीच कशी नाही. पण ज्या व्यक्तिबद्दल आपल्याला अतिशय आदर वाटतो त्या व्यक्तिनं आपल्याला आपले-पणाने हांक मारावी असं कुणाला वाटत नाही. तुम्हीं बहुधा आतांपर्यत मला काय म्हणायचं हे ओळखलंच असले.

आणखी काय लिहूं? तुमची पुढची कादंबरी केव्हां लिहीणार आहांत?

आपली,
मृदुला.

× × ×

प्रिय मृदुला,

तुझं पत्र मिळालं. तुझ्या म्हणण्याप्रमाणं तुला एकेरी नांवानं हांक मारण्याचा तुझा हट्ट मी लगेच पुरवित आहे, पण एका अटीवर, Don't you think you too must change that hurting सप्रेम नमस्कार.

हे पहा, तुला माझा मुद्दा पटत नाहीनां? मग आपण त्यावर वाद घालण्याच सोडून देऊं. उगीच वादविवादाच्या भांडणांत आपल्या पत्रांतील माधुरी घालविण्यांत कांहीं अर्थ आहे असं मला नाही वाटत, पण हे बघ तुला जर तो मुद्दा पटला तर मला कळवायला विसरूं नको हं.

तुझं श्रीमतीचं विवेचन मला फार आवडलं, आणि त्यामुळें तुझ्या बद्दलच्या कौतुकांत आणखीच भर पडली आहे. विवेचन करण्याची तुझी पद्धत किती गोड!

संपादकांवर चिडून तूं तुझा प्रयत्न अर्धवट टाकला आहेस नाही कां? तेव्हां असं कर, तूं काय लिहींतेस ते माझ्याकडे पाठीव. शुद्धलेखनाच्या चुका फार करूं नकोस हं. तुझं अक्षर मला वाटतं छान आहे. निदान मला तरी आवडतं.

तूं सध्या कुठल्या वर्गात आहेस? काय उद्योग करतेस ते सारं मला कळलं पाहिजे. मी माझ्या कादंबरीची जुळवाजुळव करतो आहे. तुला हवं असेल तर माझ्या नव्या कादंबरीचं हस्तलिखीतच मी तुला भेट म्हणून देईन—माझ्या सारख्या गरीब लेखकांकडून असली भेट घ्यायला आवडेल नां तुला?

उत्तर पाठीव मी वाट पहातो हं--

तुझा मृणाल.

× × ×

खेरे नगर.
अंबाझरी जिल्हा.

प्रिय मृणाल,

तुमचं पत्र वाचतांना मला फार वार आनंद होत होता. मनुष्याला आनंद देणारी एखादी गोष्ट घडली म्हणचे त्याला किती मनापासून आनंद होतो त्याचा अनुभव मी क्षणभर घेतला एवढं खरं.

खरंच तुमची पत्रं इतकी गोड शैलीनं लिहिलेली असतात की ती कितीदां वाचलीं तरी देखील पुरेशीं वाटत नाहीं. तुम्हांला खरं सांगू,—खरं म्हणजे तुमच्याशीं मोकळेपणानं बोलायला हरकत नाहीं. (आणि खरं म्हटलं तर पहिल्या पत्रांपासूनच मी मोकळेपणा स्विकारला नाहीं कां ?") कारण परकेपणाच्या मर्यादा आपण केव्हांच ओलांडल्या आहेत—तेव्हां, हो काय सांगत होते मी—विसरलेंच की—हं तर असं म्हणत होते, तुम्हांला न पाहतांच तुमच्याबद्दल मला फार आदर वाटत होता—म्हणजे अजूनही वाटतोच आहे—पण एखाद्या व्यक्तिला न पाहतांही तिच्या केवळ बुद्धीमत्तेवर मनुष्य आकर्षित होऊं शकतो, हे तत्व बहुधा खरं असावं. निदान मला तरी असं वाटतं. आतां माझच पहानां, तसं म्हणजे मी तुम्हांला अजून पाहिलेलं नाहीं, पण तुमचा केवळ एक मुद्दा पटत नव्हता म्हणून मी तुमची ओळख करून घेतली—आणखी कांही मला लिहीतां येत नाहीं—

तुमच्याबद्दल तुम्हीं कद्धीच लिहीत नाहीं. साफल्य ऑफीसच्या पत्त्यावरून तुमची पत्रं परस्पर येत असल्यामुळें तुमचा पत्ताही कळायचा मार्ग नाही. किती कडक बंदोबस्तांत ठेवलं आहे तुम्ही आपल्याला—खरंच तुमच्या घरी कोण कोण आहेत ? तुमच्या पत्नी तुम्हांला साजेशाच असतील नाही कां ? तुम्हां दोघांनाही मला फार भेटावसं वाटतं आहे—मी आमंत्रण दिलं तर तुम्हीं आमच्याकडे याल काय ?

तुमची मृदूल.

ता. क.—मागं आमच्या दादाबद्दल मी तुम्हांला लिहीलं होतं. तो ही नांवाजलेला लेखक आहे. तुमची अन् त्याची ओळख आहे. तो तुम्हांला ओझरतं ओळखतो असं म्हणत होता.

मृदूल.

× × ×

प्रिय मृदुल,

तुझं छानसं पत्र मिळालं. अलिकडे तुझ्या पत्रांची मी फार फार उत्सुकतेनं वाट पहात असतो, अन् पत्र आलं की ते किती वाचू आणि किती नको असं मला वाटतं. खरंच मोठी गोड पत्र लिहीतेस तूं—

आमच्या घरी फक्त मी एकटांच आहे; आणि माझा लाडका दोस्त व्हाईस-राय ( मोठा देखणा, उंच अन् लांब केसांचा, काळाभोर असा हा कुत्रा आहे. ) माझं घर संभाळतो. तुला तो नक्की आवडेल आणि त्याला ही तूं फार फार आवडशील.

तुला भेटायचा योग केव्हां येणार आहे कोण जाणें. त्याची मी ही तुझ्या इतक्याच उत्सुकतेनं वाट पहातो आहे—

तुझा
मृणाल.

ता. कः—तुझा दादा मला ऐकून माहिती आहे परंतु प्रत्यक्ष ओळख अजून झालेली नाही.

अर्थात तुझ्यामुळें त्या भेटीचा योग आला तर मला फार आवडेल. माझ्या चंदोबस्ताचा तुला हेवा वाटतो काय !

मृणाल.

× × ×

खरे नगर.
अंबाझरी व्हिला.

प्रिय मृणाल,

तुमचं अति गोड पत्र मिळालं. दुसऱ्याना मुग्ध करण्याची जादू तुमच्या पत्रांत खरंच आहे.

पण आतां एक विचारूं कां ?

मला तुमच्या बंदोबस्ताचा हेवा वाटतं नाही पण थोडासा राग येतो खरा. कुणी टोपण नांव घेतलं की मला नाही आवडत. स्वतः इतकं गुणी असून मग स्वतःचं नांव लपवून ठेवण्यांत काय अर्थ आहे ? चांगलं पुढं यावं—तुम्हांला भीती तर वाटत नाही नां की लोक आपल्यावर टीका करतील म्हणून ( बाकी एवढ्या बंदोबस्तांत ही तुमच्यावर प्रत्यक्ष टीका करणारी माझ्यासारखी निघालीच. ) अर्थात तुमचं मृणाल हे नांव मला आवडतं पण तुमचं खरं नांव जाणण्याची मला फार उत्सुकता आहे.

मागच्या पत्रांत तुम्हांला कांहीं सांगायचं होतं—ह्या पत्रांत सांगितलं तर चालेल कां ? खरंच तुम्हांला वाटत असेल ह्या मुलीला एवढं सांगायचं तरी काय आहे ! कदाचित् माझं लिहीणं तुम्हांला वेड्यासारखं ही वाटेल; पण जे सांगावसं वाटतं ते सांगायला विनय कशाला हवा—शिवाय तुम्हीं सुद्धां किती गोडपणानं वागतां. खरंच मृणाल, मला वाटतं, मला तुमच्याबद्दल फक्त आदरच वाटत नाही तर— तर—मला वाटतं मला आणखी कांहीं स्पष्टपणें सांगतां येत नाही. तुमच्यासारख्या चतूर अन् बुद्धिमान कादंबरीकाराला मी आणखी कसं सांगणार ?

तुम्हांला फार भेटावं असं मला वाटतंय. तुम्ही आमच्याकडे कां येत नाही ? माझ्या खोलींतून अंचाझरीची टेकडी, त्याच्यामागं तलावाचा दिसणारा तो निळा कांठ आणि वर पसरलेलें विस्तीर्ण क्षितीज, सगळंच किती सुरेख दिसतं. तुम्हांला फार फार आवडेल—मग येतां ?

तुमचा ' व्हाईसरॉय ' न पाहतांच माझाही लाडका बनला आहे. मी त्याची आठवण केली म्हणून त्याला सांगा हं—"

तुमच्या पत्राची अत्यंत उत्कंठतेनं वाट पहाणारी—

तुमचीच मृदूल

× × ×

प्रिय मृदूल,

तुझं अति गोड पत्र मिळालं. हे पत्र मी तुला छोटसंच लिहीतो आहे म्हणून माफ कर. परवां सकाळी आठ वाजतां मी तुला साफल्य ऑफीस मध्यें भेटेन—तूं येशील नां तिथं, मग आपण बरोबरच तुझ्या 'अंबाझरी व्हिला' कडे जाऊं, तुझ्या खोलीचं वर्णन फार आवडलं.

व्हाईसरॉय म्हणतो, तुमची ही आवडती मैत्रिण मला केव्हां भेटणार आहे—

मृदूल, पत्रांत तूं जे लिहीलं आहेस ते पाहून मला फार फार आनंद झाला. ह्याच क्षणाची मी इतके दिवसांपासून वाट पहात होतो. आतां प्रत्यक्ष भेट झाल्यावर—

तुझाच

मृणाल—

× × ×

खरे नगर

अंबाझरी व्हिला.

प्रिय मृणाल,

परवां तुमचं पत्र आलं तेव्हां उत्सुकता, आनंद, धडधडत्या अंतःकरणांतील भिती—(पण ती आनंददायक) ह्यामुळें एक दिवस मी अक्षरशः अस्मानांत तरंगत होते.

पण आज तुम्हांला पत्र लिहीतांना निराशेनं माझं अंतःकरण भरून गेलं आहे. मी भेटले नाही म्हणून तुमची केवढी निराशा झाली असेल–किती उत्सुकतेनं तुम्हीं तिथं आला असाल–आणि मी नाही असं पाहतांच—

कदाचित् तुम्हीं म्हणलां असाल बरीच थापेबाज पोरगी आहे ही–पण Please मृणाल रागावूं नका हं—खरी हकिगत तुम्हांला कळली तर तुम्हीं खास रागावणार नाही—

तुमच्या सांगण्याप्रमाणें पावणे आठलाच मी घरून निघाले पण माझ्या लागोपाठ दोन्ही बसेस चुकल्या. अखेरीस रिक्शा करून साफल्य ऑफीस जवळ

मी आले तर घड्याळांत पावणे नऊ झाले होते. तरीहि तुम्ही वाट पहात असाल म्हणून घाईघाईनं जिना चढून ऑफीसच्या खोलींत पाऊल टाकलं–अन्—

साफल्यचे ते रडक्या चेहऱ्याचे संपादक आणि आमचा दादा ह्या दोघांना पाहून तुम्हांला 'पाहण्याकरतां' आलेल्या माझा चेहरा मात्र 'पाहण्यासारखा झाला. दादा समोर असल्यामुळें संपादकांच्याजवळ मला तुमची चौकशीही करतां येईना. खरंच इतकी चरफडले मी मनाशीं—

आणखी त्यांत, मला तिथं पाहतांच दादा आश्चर्यानं म्हणाला, "अं, तूं कशाला आलीस ग इथें ?"

तेव्हां चेहऱ्यावरची सगळी निराशा लपवून मी हंसून म्हटलं, (आणि ते खोटं हास्य आणतांना मला केवढ्या यातना झाल्या) "खाली 'हर्षल' बुक डेपो मध्यें पुस्तकं घ्यायला आले होते मी, तहान लागली म्हणून वर आले." आणि असं म्हणून काठ फुटलेल्या कांचेच्या ग्लासांतून कसं बसं घशाखाली पाणी ढकलून हाय ! चा निश्वास सोडून घरपडत खाली आलें. दादा खास मनांत म्हणाला असेल की साफल्य ऑफीस म्हणजे पाणपोयी आहे की हॉटेल आहे— असो.

मात्र आतां ही ऑफीसची भानगड नको. उद्यां सकाळपर्यंत माझं हे पत्र तुम्हांला पोहचेल तेव्हां उद्यां चार वाजतां तुम्ही माझ्याकडे चहालाच या—नक्की या हं—पहा नाही आलांत तर खूप रागवेन मी—आणि तुमच्याशी ज्या गोष्टी बोलायच्या ठरविल्या आहे त्या पण बोलणार नाही—मग येणार ना ?

तुमचाची
मृदूल.

ता. क.—येतांना 'व्हाइसरॉयला' पण आणा हं—

मृदूल.

× × ×

खरे नगर
अंचाक्षरी व्हिला.

मृदुला बाई, नमस्ते,

वा! कशा पण बनलांत, तुला माझा मुद्दा अखेरीस पटवलांच की नाही?

साफल्य साप्ताहिकांत 'मृणाल कांती' ह्या टोपण नांवाखाली मीच ती कादंबरी लिहीली होती... कादंबरी पूर्ण झाल्यावर मी तुला सांगणारच होतो पण—

साफल्यच्या संपादकांनीं तुझं पत्र देतांच मी तुझी गंमत करायची ठरविली. कां बाईसाहेब! प्रत्यक्ष ओळख नसतां नुसत्या बौद्धिक आकर्षणावरून मनुष्य प्रेमांत पडूं शकत नाहींना? ज्या क्षणी मी तुला मुद्दा पटवून देईन म्हटलं तो क्षण अखेरीस आलाच की नाहीं? तुम्ही बायका मोठ्या लबाड असतात. नाहीं नाहीं म्हणतां पण मनांतल्या मनांत तुमचे लपंडाव चाललेच असतात आणि अशा वेळी तुम्हांला नेमकं पकडायला असलीच लबाडीची शस्त्र उपयोगी पडतात. आतां तूंच सांग नायिकेचं वागणं अगदी स्वाभाविक होतं कीं नाहीं? स्वानुभव हाच जगांतील सर्व श्रेष्ठ गुरूं असं म्हणतात नां?

तुझा पाहण्यालायक झालेला चेहरा पाहयला मीच साफल्यच्या ऑफीसमध्यें बसलो होतो. कां कशी झाली 'मृणाल' ची भेट? बाकी खरंच मृदूले, तुला मृणाल सारखाच नवरा पाहून देऊं. आणि तुझ्या लग्नांत एक भला मोठा कुत्रा मी तुला प्रेझेन्ट देईन त्याचं नांव 'व्हाईसरॉय' अवश्य ठेव.

मृदूल तुझ्या लाडक्या दादांवर खास. रागवणार नाहींस नां? तुझी थट्टा करण्याखेरीज दुसरा कोणताही माझा हेतू नव्हता. शिवाय लाडक्या धाकट्या बहिणीची थट्टा करण्याचा अधिकार प्रत्येक भावाला आहे नाहीं?

आज चार वाजतां चहा घ्यायला येऊं नां? चहांत 'मीठ' न घालतां 'गोड खडीसाखर' घालशील अशी आशा करणारा

तुझाच लाडका
**दादा**

× × ×

ग्रा. क्र. २८२५ ता. दि.
वि.